# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०६/ २०१४** **दिनांक २३.०५.२०१४**
**स्थळ- शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शुक्रवार दिनांक २३.०५.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ८८६/ २०१४, दिनांक २१ मे, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दि.२३.०५.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

मा.श्री.आप्पासाहेब शिंदे,
उपकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दि.१२.०४.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.२९०** दिनांक १२.०४.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली-

**निर्णय क्र. २८९ मध्ये-**

**(१)** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडील पी.आय.एल. २७/ २०१२ मध्ये मेजर फायनान्शीयलकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची पुर्वमान्यता घेण्यात यावी, असा आदेश झालेला आहे. परंतु त्यामध्ये मेजर फायनान्शीयल म्हणजे नेमकी किती रक्कम, याचा उल्लेख नाही.

त्रिसदस्य समितीमार्फत तात्पुरते धोरण म्हणून रु.१० लाख मात्र पर्यंतचे प्रस्तावास मान्यता देऊन संस्थानची कामे करुन घेतली जात आहेत. त्यापुढील रकमेचे खर्चाकरीताचे प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे पाठविले जातात. असे प्रस्तावास त्यांची मान्यता घ्यावी लागते व त्यानंतर कार्यवाही करावी लागते. या सर्व प्रक्रियेसाठी बराचसा कालावधी लागतो. याकरीता मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करुन मेजर फायनान्शील म्हणजे नेमकी किती रक्कम ती मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडून निश्चित करुन घेण्यात यावी.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**(१)** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडील पी.आय.एल. २७/ २०१२ मध्ये मेजर फायनान्शीयलकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची पुर्वमान्यता घेण्यात यावी, असा आदेश झालेला आहे. परंतु त्यामध्ये मेजर फायनान्शीयल म्हणजे नेमकी किती रक्कम, याचा उल्लेख नाही.

त्रिसदस्य समितीमार्फत तात्पुरते धोरण म्हणून रु.१० लाख मात्र पर्यंतचे प्रस्तावास मान्यता देऊन संस्थानची कामे करुन घेतली जात आहेत. त्यापुढील रकमेचे खर्चाकरीताचे प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे पाठविले जातात. असे प्रस्तावास त्यांची मान्यता घ्यावी लागते व त्यानंतर कार्यवाही करावी लागते. या सर्व प्रक्रियेसाठी बराचसा कालावधी लागतो. **याकरीता संस्थानचा वाढता व्याप व वार्षिक आर्थिक उलाढाल लक्षात घेता रु.५०,००,०००/- मात्र पेक्षा जास्त रक्कम ही मेजर फायनान्शीयल रक्कम गृहीत धरणेत यावी, याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करणेत येऊन त्यांचेकडून ती मेजर फायनान्शीयल रक्कम निश्चित करणेत यावी.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०२ दिनांक २६.०४.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.२९१** दिनांक २६.०४.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाद्वारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटीद्वारे निर्णय होणेबाबत. (रु.१०,००,०००/-)**

समाधी मंदिर परिसरातील महाव्दारालगत सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा मोर्चे उभारणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.१२/१२/२०१२ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र. ११०५ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*" प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंदिर परिसराचे चारही महाव्दारांचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा मोर्चे उभारणीकरिता पोलिस उपअधिक्षक यांचेकडून सुरक्षा मोर्च्यांचे डिझाईन देण्यात येईल. त्यानुसार संस्थानमार्फत सुरक्षा मोर्चांची उभारणी करण्यात यावी. उपरोक्त कामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. "*

मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी यांचेकडील दि. १४/०२/२०१३ रोजीचे पत्राव्दारे सी. आय. एस. एफ. मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेणेत आलेल्या सुरक्षा मोर्चाचे डिझाईन व स्पेशिफीकेशन प्रमाणे मंदिर परिसराचे चारही महाव्दारांवर सुरक्षा मोर्चाची उभारणी करणे प्रस्तावीत आहे. याकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे दि. १८/१०/२०१३ रोजीच्या सभेपुढे सादर करण्यात आला. सदरहु सभेतील निर्णय क्र. ८०८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*" श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाव्दारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी विहित मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, सदरकामी प्रस्तावात नमुद केलेल्या पाचही ठेकेदारांकडून फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले."*

त्यानुसार इकडील विभागाचे दि.२१/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये खालील पाच ठेकेदारांना सिलबंद निविदा सादर करणेस कळविणेत आले होते.

०१) मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर ०२) गायत्री एन्टरप्राईज, नाशिक
०३) पुजा आर्क्रिट्रेक्चरल सिस्टीम प्रा.लि.सांताक्रुझ, मुंबई ०४) बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पूर्व) मुंबई
०५) साई इंडस्ट्रीज, कोपरगांव

उपरोक्तपैकी विहित मुदतीत खालील ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा / वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् अँण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ११,४०,०००/- | १०,४९,०००/- |
| ०२ | साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | १०,५०,०००/- | अनुपस्थित |
| ०३ | बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पुर्व) मुंबई | अपात्र | -- |

यावर सविस्तर चर्चा होऊन सदरहु सभेतील निर्णय क्र. २ (१) खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाव्दारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी अंदाजे रु. १०,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित होता. परंतू निविदा उघडलेनंतर त्यामध्ये रु. १०,४९,०००/- मात्र निम्नतम दर आलेला आहे, त्यामुळे या खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे*

*तसेच, उपसमितीला रु. दहा लाख मात्र खर्चापर्यंतची मर्यादा आहे व प्रस्तावित कामासाठी फक्त एकच निविदाधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यामुळे सदरहूकामी फेर जाहिरात देण्यात यावी, अशी शिफारस मान्य करण्यात आली."*

त्यानुसार याकामी फेर निविदा मागविणे करीता दि. ०५/०३/२०१४ रोजीच्या दैनिक पुढारी व दैनिक देशदुत वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील सात ठेकेदारांनी कोऱ्या निविदा अर्ज विकत घेतले होते.

०१) रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅबीकेशन, श्रीरामपूर ०२) श्री चंद्रशेखर मलीक पेटकर, अहमदनगर.
०३) अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद. ०४) श्री मंगेश आर. लझेढा, शिर्डी.
०५) श्री एस. जी. गायकवाड, राहाता. ०६) बोरकर पॉलीमर्स, ठाणे
०७) एस.एस. इंटरप्रायझेस, नाशिक.

सिलबंद निविदा सादर करणेचे दि. २४/०३/२०१४ पर्यतचे अंतीम मुदतीत खालील दोन निविदा धारकांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रोडक्टस ॲण्ड फॅबीकेशन, श्रीरामपुर | २१८३२ | २४/०३/२०१४ |
| ०२ | अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद | २१८४० | २४/०३/२०१४ |

याकामी विहीत मुदतीत दोनच निविदा प्राप्त झाल्याने कोरी निविदा घेतलेल्या इतर ठेकेदारांना सिलबंद निविदा दि.१५/०४/२०१४ अखेर वाढीव मुदत देवून जमा करणेस इकडील विभागाचे दि.०४/०४/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील जा.क्र.१३९/ २०१४, दि.०८/०४/२०१४ चे पत्रान्वये ठेकेदार यांना दि.१५/०४/२०१४ अखेर सिलबंद निविदा जमा करणेस कळविणेत आले.

सदरहू मुदतीत खालील दोन ठेकेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री एस. गायकवाड, राहाता | ००९८५ | १५/०४/२०१४ |
| ०२ | श्री चंद्रशेखर एस. मलीक पेटकर, अहमदनगर | ००९८३ | १५/०४/२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रोडक्टस ॲण्ड फॅबीकेशन, श्रीरामपुर | ११,००,०००/- | १०,८९,०००/- |
| ०२ | अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद | **८,२१,०००/-** | अनुपस्थित |
| ०३ | श्री चंद्रशेखर एस. मलीक पेटकर, अहमदनगर | १२,३२,०००/- | अनुपस्थित |
| ०४ | श्री एस. गायकवाड, राहाता | ९,६०,०००/- | ९,६०,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाद्वारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी मे.अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरीता रिपोर्टीगसाठी व्हीजार्ड/ Extra Dicom Viewer खरेदीकामी प्राप्त कोटेशनवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.२,५०,२१५/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाने दि.१४/०६/२०१३ रोजीचे मागणी पत्रान्वये रुग्णांचे सि.टी स्कॅन व एम.आर.आय केल्यानंतर रिपोर्टीगसाठी एक अदयावत व्हीजार्ड/ Extra Dicom Viewer ची ०१ नगाची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे Siemens कंपनीचा व्हीजार्ड आहे, परंतु त्याची क्षमता कमी असल्यामुळे सर्व रुग्णांचे स्कॅन त्यावर साठवुन ठेवता येत नाही. तसेच ३ ते ४ दिवसांनंतर रुग्णास डुप्लीकेट फिल्मची आवश्यकता भासल्यास फिल्म देण्यासाठी साठवुन ठेवलेला डाटा आपल्याकडे उपलब्ध नसतो. रिपोर्टीग फिल्मवर करताना चुक होण्याची शक्यता असते. अशा अनेक अडचणींमुळे त्यांनी नवीन अदयावत Extra Dicom Viewer ची मागणी केलेली आहे.

सदर Extra Dicom Viewer खरेदीकामी M/s. Airox Technologies Pvt. Ltd., Aurangabad यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार सदरचे खरेदीकामी रक्कम रु.२,५०,२१५/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Extra Dicom Viewer- Computer 27” latest model. 3.2 Ghz quad core intel core i5 processor (Turbo boost upto 3.6 Ghz), with 6 MB L3 cache (two 4GB) of 1600MHz DDR3 memory, 1TB (7200 rpm) hard drive, NVIDA Geforce GTX675MX Graphic Procesoor with 1 GB of GDDRS memory & Latest software like OSIRIX V5.0.2. | 01 | 2,50,215.00 | 2,50,215.00 |

दि.०८/१०/२०१३ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.७२४ अन्वये वरील मागणीप्रमाणे Extra Dicom Viewer ०१ नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,५०,२१५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र.४३८८

दि.०८/११/२०१३ अन्वये एकुण ०६ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन दि.२३/११/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१) M/s. Airox Technologies, Aurangabad (ई-मेल कोटेशन प्राप्त दि. २०/०२/२०१४)

२) M/s. Action Engineering, Mumbai (ई-मेल कोटेशन प्राप्त दि. २०/०२/२०१४)

३) M/s. Mednet AGS, Vasai (W) (ई-मेल कोटेशन प्राप्त दि. २०/०२/२०१४)

वरीलप्रमाणे ३ कोटेशनधारकांना दि.१०/०४/२०१४ रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, परंतु सदर सभेसाठी एकही कोटेकशनधारक उपस्थित नव्हते, त्यामुळे सदरचे खरेदीकामी निर्णय घेणेकामी सदरहू कोटेशनधारकांना पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले आहे. कोटेशनधारकांनी दिलेल्या मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खाली नमुद केलेला आहे.

उपरोक्त तीनही कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Airox Technologies, Aurangabad (Model- Apple imac Core - I5) | 2,45,501/- | Absent |
| 2 | M/s. Acton Engineering, Mumbai (Model- Core - I5) | 1,99,500/- | **1,90,000/-** |
| 3 | M/s. Mednet AGS, Vasai(W) (Model- Core - I5) | 2,18,400/- | Absent |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरीता रिर्पोटींगसाठी आवश्यक असलेला ०१ नग Extra Dicom Viewer खरेदीकामी M/s. Acton Engineering, Mumbai यांचे रु.१,९०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०३ **श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वार्डकरीता Non Stress Test Machine with Probe खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.१,२३,७५०/-)**

श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्डमध्ये अत्यवस्थ रुग्णांकरीता त्यांनी दि.०३/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये Non Stress Test Machine with Probe एक नगाची मागणी केलेली आहे. कारण सध्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारचे मशिन उपलब्ध नाही. सदर मशिनचा उपयोग गर्भवती महिलांमध्ये त्यांची Stress Test (हृदयाचे काम व्यवस्थित चालु आहे किंवा नाही हे पहाणे) ची तपासणी करणेसाठी होतो त्यामुळे उपचार व प्रसुती व्यवस्थित करणे सोईचे होते. विशेषत: High Risk Obsteric patient साठी याचा जास्त फायदा होईल. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. no. | Description | Qty. |
|---|---|---|
| 1. | Non Stress Test Machine with Probe (NST Machine) with all Standard Accessories | 01 No. |

वरील प्रमाणे Non Stress Test Machine with Probe खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार वरीलप्रमाणे मशिन खरेदीकामी अंदाजे १,२३,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१३/१२/२०१३ रोजीचे मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय क्र.९५६ अन्वये उपरोक्त १ नग Non Stress Test Machine with Probe विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२३,७५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ६४११ दि. ०८/०१/२०१४ अन्वये एकुण ०६ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि.३१/०१/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१. M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar (कोटेशन प्राप्त दि.०५/०३/२०१४)
२. M/s. G. G. Medicaid, Ahmednagar (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०५/०३/२०१४)
३. M/s. BMV Meditech Pvt. Ltd., New Delhi (टपालाद्वारे उघडून प्राप्त कोटेशन दि.२८/०२/२०१४)

वरीलप्रमाणे बंद कोटेशन दि.१०/०४/२०१४ रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडुन त्याच दिवशी तीनही कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, परंतु सदर सभेसाठी एकही कोटेशनधारक उपस्थित नव्हते, त्यामुळे सदरचे खरेदीकामी निर्णय घेणेकामी सदरहू कोटेशनधारकांना

पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले आहे. तीनही कोटेशनधारकांनी देऊ केलेल्या मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खाली नमुद केलेला आहे.

उपरोक्त तीनही कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Description | M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar (Model- BPL FM 9853) | | M/s. G.G. Medicaid, Ahmednagar (Model- BPL FM 9853) | | M/s. BMV Meditech Pvt. Ltd., New Delhi (Model- FEMO 730) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | **Non Stress Test Machine with Probe** (NST Machine) with all Standard Accessories | 112500.00 | Absent | 123750.00 | Absent | 156450.00 | 94500.00<br>for single Probe only |
| | | | | | | Additional Probe Price Rs. | 15000.00 |
| | **Warranty** | | 1 year | | 1 year | | 1 year |
| | **Payment** | | | | | | 100 % Advance |

**उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता M/s. BMV Meditech Pvt. Ltd., New Delhi यांनी एक Probe चा दर रु.९४,५००/- मात्र तर अतिरिक्त Probe घेतल्यास त्यासाठी प्रती नग रु.१५,०००/- मात्र वेगळी किंमत दिलेली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वार्डकरीता Non Stress Test Machine with Probe खरेदीकामी M/s. BMV Meditech Pvt. Ltd., New Delhi यांचे अतिरिक्त Probe सह रु.१,०९,५००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०४ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.-१ करिता Shadowless Lamp खरेदी व जुना Shadowless Lamp Buyback करणेकामी प्राप्त निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.९,००,०००/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी- १ करिता शस्त्रक्रिया करणेकामी ०१ नग Shadowless Lamp (LED) आहे. सदर Shadowless Lamp हा सन २००५ मध्ये रु.२०,४२,४७०/- इतक्या रुपयात खरेदी केलेला आहे. सध्या सदर Shadowless Lamp हा व्यवस्थित चालत नाही. मागील एक वर्षात सी.व्ही.टी.एस ओ.टी - १ मध्ये एकुण ८७६ शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यामुळे सदर Shadowless Lamp वर कामाचा अतिरिक्त भार पडल्यामुळे सदर Shadowless Lamp ची प्रखरता कमी झालेली आहे व त्याचा दुरुस्तीचा खर्च हा फार जास्त आहे त्यामुळे सदर Shadowless Lamp परत (Buyback) करणे योग्य राहील अशी शिफारस बायोमेडीकल विभागाने त्यांचे मागणी पत्रकावर केलेली आहे. जुने Shadowless Lamp ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१३ अखेर किंमत रु.३०१५०४/- इतकी आहे. तर सदर ०१ नग Shadowless Lamp खरेदीकामी अदांजे रक्कम रु.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०८/०१/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी- १ करिता Shadowless Lamp खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात प्रहार, मुंबई व संध्यानंद, पुणे या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण २१ उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र.७५८१ दि.०४/०३/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.०५/०३/२०१४ ते १८/०३/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०३/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन मुंबई येथील कार्यालयात ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Unimmedss, Kolkata | 19/03/2014 |
| 2. | M/s. Matrix Medical Pvt. Ltd., Thane (W) | 20/03/2014 |

| | | |
|---|---|---|
| 3. | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai | 20/03/2014 |
| 4. | M/s. Sairam Biomedics, Mumbai | 20/03/2014 |
| 5. | M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. | 20/03/2014 |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Description | Rate Per in Rs. | AMC | CMC | Rate After Negotiation | AMC | CMC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **M/s. Unimmedss, Kolkata** (Model- Alfa 5 + Alfa 5 + Alfa 3) Warranty- 2 Year | 891000.00 | N.Q | | Absent | | |
| 2 | **M/s. Matrix Medical Pvt. Ltd., Thane (W)** (Model- Prism Luminox) Warranty- 1 Year | 701250.00 | after warranty 2nd Year 2% 3rd Year 2.25% 4th Year 2.50% 5th Year 3% 6th Year 3.50% 7th Year 3.75% | after warranty 2nd Year 4% 3rd Year 4.5% 4th Year 4.75% 5th Year 5% 6th Year 5.50% 7th Year 5.75% | 600000.00 | after warranty 2nd Year 2% 3rd Year 2.25% 4th Year 2.50% 5th Year 3% 6th Year 3.50% 7th Year 3.75% | after warranty 2nd Year 4% 3rd Year 4.5% 4th Year 4.75% 5th Year 5% 6th Year 5.50% 7th Year 5.75% |
| 3 | **M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai** (Model- sim LED 7000+ 7000+ 4500) Warranty-2 Year | Euro 22270 @ Rs.86=1915220 + C.D. 12%= 229826 + Clearance Charges 25000 Total Rs. 21700046 | 2% + 5% Esclations | 7% + 3% Esclations | Euro 20478 @ Rs.85=1740630 + C.D. 11.7%= 203653 Total Rs. 1944283 | 2% | 6% |
| | sim LED 5000+5000+5000 offer given during the negotiation Warranty-2 Year | Euro 22270 @ Rs.86=1915220 + C.D. 12%= 229826 + Clearance Charges 25000 Total Rs. 21700046 | 2% | 7% | Euro 20478 @ Rs.85=1740630 + C.D. 11.7%= 203653 Total Rs. 1944283 | | |
| | sim LED 5000+5000+4500 offer given during the negotiation Warranty-2 Year | Euro 20270 @ Rs.86=1743220 + C.D. 12%= 209186 + Clearance Charges 2% = 25000 Total Rs. 1977406 | 2% | 7% | Euro 17838 @ Rs.85=1516230 + C.D. 11.7%= 177398 Total Rs. 1693628 | | |
| | SD Camera | | | | Euro 4130 @ Rs.85=351050 + C.D. 11.7%= 41073 Total Rs.392123 | 2% | 6% |
| | HD Camera | | | | Euro 5694 @ Rs.85=483990 + C.D. 11.7%= 56627 Total Rs.540617 | 2% | 6% |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | **M/s. Sairam Biomedics, Mumbai**<br>1) Surgirise SASX2ST+ X2ST+X1 Warranty-2 Year | Euro 18320 | N.Q | | Euro 16488 @ Rs.84=1384992 + C.D. 33%= 457047+Clearance Charges 2% =27699 Total Rs. 1869738 | 2% | 5% |
| | 2) Surgirise SASX2ST+X2ST+X2ST | 20098 Euro | | | Euro 16000 @ Rs.84=1344000 + C.D. 33%= 443520+Clearance Charges 2% =26880 Total Rs. 1814400 R/O Rs. 1800000 | 2% | 3% |
| | 3) Surgirise SASX2MT+X2MT+X2MT | 20688 Euro | | | Not Negotiated | | |
| | Video Camera SD Sony Zoom 36+control box | 1500 Euro | | | Euro 1500 @ Rs.84=126000 + C.D. 33%= 41580+Clearance Charges 2% =2520 Total Rs. 170100 | 2% | 3% |
| | Monitor 19" | 4000 Euro | | | Euro 4000 @ Rs.84=336000 + C.D. 33%= 110880+Clearance Charges 2% =6720 Total Rs. 453600 | 2% | 3% |
| | | 2000 Euro | | | Euro 2000 @ Rs.84=168000 + C.D. 33%= 55440+Clearance Charges 2% =3360 Total Rs. 226800 | 2% | 3% |
| 5 | **M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai**<br>1) HLED 533SD Warranty-1Year | Rs. 2500000 | N.Q | | Rs. 2000000 | 2 % + Service Tax | 6 % + Service Tax + Vat |
| | 2) Volista 644 STD | Rs. 2500000 | | | Rs. 2100000 | 2 % + Service Tax | 6 % + Service Tax + Vat |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदाधारकांपैकी M/s. Unimmedss, Kolkata व M/s. Matrix Medical Pvt. Ltd., Thane (W) या दोघांनी भारतीय बनावटीच्या टेबलचे दर दिलेले आहेत, तर उर्वरित ०३ निविदाधारकांनी Imported कंपनीचे दर दिलेले आहे. सदरचा Lamp हा कार्डीयाक ऑपरेशन थिएटर या महत्वाच्या शस्त्रकिया विभागासाठी खरेदी करावयाचा आहे. यापुर्वी येथे Imported कंपनीचा लाईट वापरत आहे. त्यामुळे ज्या ०३ निविदाधारकांनी Imported कंपनीचे दर दिलेले आहे. त्या तिघांचा तांत्रीक बाबींचा विचार करता M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचे मॉडेल (Sim LED ७०००+ ७०००+ ४५००) तांत्रीकदृष्टया योग्य असून त्यांनी वॉरंटी कालावधी ०३ वर्षाचा दिलेला आहे. त्यामुळे M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचे एकुण रु.१९,४४,२८३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच सदरचे पेमेंट LOC द्वारे अदा करण्यात येऊन Custom Duty मध्ये सुट मिळणेकामी वित्त विभागाकडुन केंद्रशासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा. केंद्रशासनाकडून Custom Duty मध्ये सुट न मिळाल्यास सदरची रक्कम रु.२,०३,६५३/- मात्र संस्थानमार्फत आदा करण्यात यावी.**

**तत्पुर्वी उपरोक्तकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

०५ **श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागाकरिता Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.५३,५९२/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील Dental या विभागाने दि.०५/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये NSK कंपनीचे Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece प्रत्येकी ०१ नग याप्रमाणे एकुण ०२ नगांची मागणी केलेली आहे. यापुर्वी सन २००६ या वर्षात Handpiece खरेदी करण्यात आले होते, परंतु दैनंदिन वापरामुळे ते खराब झालेले आहेत व दुरुस्त देखील होत नाहीत त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहेत.

उपरोक्त Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Confident Sales India Pvt. Ltd., Bangalore यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.१०/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Air Rotar Handpiece | 01 No. | 26796.00 | 26796.00 |
| 2 | Fiber Optic Air Rotar Handpiece | 01 No. | 26796.00 | 26796.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **53592.00** |

वरीलप्रमाणे Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी अंदाजे रु.५३,५९२/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. ०४/०२/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय क्र. १०५ अन्वये उपरोक्त Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ५३,५९२/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ७८२६ दि. १४/०३/२०१४ अन्वये एकुण १२ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.१५/०४/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१) M/s. Suz Dent (India) Pvt. Ltd., Ahmedabad (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२९/०३/२०१४)
२) M/s. Confident Sales India Pvt. Ltd. Bangalore (ई-मेल कोटेशन प्राप्त दि.१८/०४/२०१४)
३) M/s. CSIPL, Pune (ई-मेल कोटेशन प्राप्त दि.१८/०४/२०१४)

वरीलपैकी अ. नं. ३ यांचे कोटेशन त्यांनी कोटेशन मागणीपत्र नसताना स्वतःहून दिलेले आहे. तुलनात्मक दर मिळणेच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे ते देखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशनपैकी सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, एकही कोटेशन-धारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित नव्हते. त्यांनी दिलेल्या मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | M/s, Suz Dent (I) Pvt. Ltd., Ahmedabad | | | M/s. Confident Sales India Pvt. Ltd., Bangalore | | | M/s. CSIPL, Pune | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make/ Mode | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make/ Mode | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make/ Mode | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 01 | Air Rotar Handpiece | Global | 8400/- | Absent | Dynaled NSK | 25399/- | Absent | Dynaled NSK | 31500/- | Absent |
| 02 | Fiber Optic Air Rotar Handpiece | NSK Freight | 42000 + 300 | | Smax 600L NSK | 25399/- | | Smax 600L NSK | 31500/- | |
| | Payment - | | 100% Adv. | | | 100% Adv. | | | 100% Adv. | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागाकरिता Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीबाबत सभेसमोर चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी एकही कोटेशनधारक उपस्थित नव्हते, त्यामुळे उपरोक्त कोटेशनधारकांना पुढील उपसमिती सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०६ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या कामकाजासाठी डिजिटल स्कॅनिंग यंत्रणा खरेदी करुन, कार्यान्वीत करणेकामी प्राप्त कोटेशन्स् उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.१,५०,६१९/-)**

उपरोक्त संदर्भीय विषयी, मा.त्रि.सदस्यीय व्यवस्थापन समिती सभेतील मंजुर करण्यात आलेल्या उपरोक्त ठरावांनुसार, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये, राज्य शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना या योजनेची दि.१४.२.२०१३ पासुन पहिल्या टप्प्यात ८ जिल्हयांसाठी व दि.२६.११.२०१३ पासुन राज्यातील उर्वरीत २७ जिल्हयांसाठी, अशी राज्यातील एकुण ३५ जिल्हयांसाठी अंमलबजावणी चालु करण्यात आलेली आहे.

सदर योजना, विमा व TPA कंपन्यांच्या मार्फत पुर्णपणे On Line पध्दतीने राबविण्यात येत असून, योजने अंतर्गत प्रत्येक पात्र लाभार्थी रूग्ण, हॉस्पिटल उपचारार्थ दाखल झाल्यापासून, रूग्णाच्या करण्यात आलेल्या तपासण्या, चाचण्या, उपचार, शस्त्रक्रिया, ऑपरेटीव्ह नोटस्, फॉलोअप इ. संबंधित रूग्णाच्या IPD Case File मधील सर्व कागदपत्रे डिजिटल स्कॅनींग करून, सॉफटवेअर मार्फत विमा कंपनीस पाठवावे लागतात.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये योजने अंतर्गत उपचारार्थ दाखल होणाऱ्या लाभार्थी रूग्णांची संख्या फार मोठया प्रमाणात असल्याने, दाखल रूग्णांची सर्व कागदपत्रे स्कॅनींग करण्याचे काम सुध्दा फार मोठया प्रमाणावर करावे लागत असून, फार मोठया प्रमाणावर वेळेवा अपव्यय होत असून, रूग्णांचा खोळंबा होवून, गैरसोय होत असल्याची बाब, मा.कार्यकारी अधिकारी, श्री मोरे सो., यांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली होती.

या बाबत, मा.कार्यकारी अधिकारी, श्री मोरे सो. यांनी, अहमदनगर, येथील त्यांना माहित असलेल्या डिजिटल स्कॅनिंग यंत्रणेची समक्ष माहिती घेण्याबाबत सुचित करून, संरक्षण दलाच्या रेकॉर्ड विभागाचे प्रमुख, कर्नल, श्री गोविंदु यांचेशी संपर्क केल्यानूसार, श्री साईबाबा हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी, श्री अशोक वाळुंज, यांनी अहमदनगर येथे समक्ष जावून माहिती घेतलेली आहे, सोबत या बाबतच्या दि.२४.१.२०१४ रोजीच्या टिपणीची प्रत जोडण्यात आलेली आहे.

सदर डिजिटल स्कॅनिंग यंत्रणेच्या खरेदी कामी M/s. Jai Hind Enterprises, Ahmednagar यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते, त्या नूसार M/s. Jai Hind Enterprises, Ahmednagar यांनी दि.२४.२.२०१४ चे पत्रान्वये डिजिटल स्कॅनिंग यंत्रणेचे कळविलेले दर खालीलप्रमाणे :-

| Sn | Description | Qty. | Rate | Total Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Sony Digital Camera | 10 Nos. | 9,100/- | 91,000/- |
| 2. | Camera Stand Iron with Powder Coated (Black), Size – 10' x 2' x 1.5 Feet | 3 Nos. | 6,150/- | 18,450/- |
| 3. | USG Male, Female, Cable 3 Mtrs. | 10 Nos. | 915/- | 9,150/- |
| 4. | USB Hub | 3 Nos. | 650/- | 1,950/- |
| | | | **Total :-** | **1,20,550/-** |
| | Plus :- VAT @ 12.5% | | | 15,068/- |
| | | | **Total :-** | **1,35,619/-** |
| 5. | Installation Charges including Transport, Labour, Activation etc. | | | 15,000/- |
| | | | **Gr.Total :-** | **1,50,619/-** |

तसेच, मे.A to Z Suppiers आणि मे.श्रीराम जनरल स्टोअर्स, आर्मी सप्लायर्स, अहमदनगर, यांचेकडून बंद लिफाप्यामध्ये कोटेशन्स् प्राप्त झालेले आहेत.

१. M/s. Jai Hind Enterprises, Bhingar Camp, Ahmednagar, (प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून प्राप्त कोटेशन दि.२४.२.२०१४).
२. M/s. A to Z Suppiers, (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.३.३.२०१४)
३. M/s. Shriram General Stores, Army Suppliers, Ahmednagar (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१.३.२०१४)

उपरोक्त अ.नं.१ हे प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून प्राप्त झालेले व अ.नं.२ व ३ चे सिलबंद प्राप्त झालेले कोटेशन, अशी तीनही कोटेशन्स् तुलनात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने विचारात घेण्यात यावीत असे मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशनपैकी सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, सर्व कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| 1 | M/s, A to Z Suppliers, Ahmednagar | 168500/- | Absent |
| 2 | M/s. Shriram General Stores, Ahmednagar | 161328/- | 1,43,119/- |
| 3 | M/s. Jai Hind Enterprises, Ahmednagar | 150619/- | 1,35,557/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या कामकाजासाठी डिजिटल स्कॅनिंग यंत्रणा खरेदी करुन, कार्यान्वीत करणेकामी मे.जयहिंद एन्टरप्रायजेस, अहमदनगर यांचे रु.१,३५,५५७/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०७ **हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडून निम्नतम पुरवठादार यांचेकडून दर मान्य करणेबाबत.** (रु.२,००,०००/-)

श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन बनविणेकामी प्रसादालयातील आटा, गहू, लाडुप्रसाद मटेरियल, नाष्टापाकिट मटेरियल, भाजीपाला व प्रसादभोजन मटेरीयल वाहणेकामी एकुण सहा हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करणेस व त्याकामी रक्कम रु. २ लाख पर्यंतच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ४.२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १२४ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनुसार हायड्रोलिक पॅलेट ट्रकचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादार यांचे प्राप्त दरपत्रक उपसमिती दिनांक १०.४.२०१४ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेले आहे. त्यानुसार उघडणेत आलेल्या दरपत्रकातील दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | निलकमल लि. नाशिक | महेश इंजिनिअर्स, सातपुरा, नाशिक | विजय नॉव्हल्टीज, नाशिक |
|---|---|---|---|---|
| १ | दरपत्रक प्रती हायड्रोलिक पॅलेट ट्रक दर | **१८,५००/-** | १९,३००/- | २१,३२०/- |
| २ | व्हॅट | **---** | २४१२.५० | --- |
| ३ | एकुण | १८५००.०० | २१,७१२.५० | २१३२०.०० |
| ४ | ६ नग ट्रॉलीकरीता एकुण रक्कम | **१,११,०००.००** | १,३०,२७५.०० | १,२७,९२०.०० |

**मागणीः-** निलकमल कंपनीचे सहा नग BF115055085YEL मॉडेलच्या हॅयड्रोलिक पॅलेट ट्रक पुरवठा करणाऱ्या उपरोक्त तीन एजन्सीचे दराचा तुलनात्मक तक्ता उपरोक्त प्रमाणे आहे. निलकमल लि. नाशिक यांचे दर इतर दोन्ही पुरवठादार यांचे पेक्षा कमी आहे. परंतु मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार चर्चा व वाटाघाटीद्वारे दर निश्चित करणेकरीता सदर निविदाधारक यांना समक्ष चर्चासाठी बोलविणेत यावे असे सुचविले आहे. त्यानुसार हॅयड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदीकामी प्राप्त निविदेतील दर निश्चित करणेकामी उपरोक्त तिनही पुरवठादार यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीस बोलविता येईल.

श्री साईप्रसादालयाकरीता सहा नग निलकमल कंपनीच्या हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करणेकामी पुरवठाधारकांनी दरपत्रकामध्ये दिलेल्या दरात आणखी सुट मिळणेसाठी त्यांना मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | तपशिल | निलकमल लि. नाशिक | | महेश इंजिनिअर्स, सातपुरा, नाशिक | | विजय नॉव्हल्टीज, नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. | मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. | मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
| १ | दरपत्रक प्रती हायड्रोलिक पॅलेट ट्रक दर | **१८,५००/-** | **१८,३००/-** | २१,७१२.५० | २१,७१२.५० | २१३२०/- | २३९८५/- |
| २ | ६ नग ट्रॉलीकरीता एकुण रक्कम | १,११,०००/- | **१,०९,८००/-** | १,३०,२७५/- | १,३०,२७२ | १,२७,९२०/- | १,४३,९१०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाकरीता सहा नग निलकमल कंपनीच्या हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदीकामी मे. निलकमल लि. नाशिक यांचे रु.१,०९,८००/- मात्र (सर्व करांसहीत) हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

०८ **साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी साबण खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.** (रु.३,४५,६००/-)

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.१३१ नुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील खोल्यांमध्ये ठेवणेसाठी आवश्यक असलेल्या १,७२,८०० नग साबण

वड्या (प्रत्येकी १२ ग्रॅम वजन) विहित पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.३,४५,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदरचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी दि.२०.०३.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांच्या पत्त्यावर कोटेशन/दरपत्रक मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून सिलबंद पाकिटात दरपत्रक मागणी करणेत आलेली होती. त्याची अंतीम मुदत दि.०२.०४.२०१४ अशी ठेवलेली होती. मुदतीअंती पाच दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.सचिन जनरल स्टोअर्स, शिर्डी | २२०३७/२६.०३.२०१४ |
| ०२. | मे.बाफणा जनरल स्टोअर्स, शिर्डी | ००६६/०१.०४.२०१४ |
| ०३. | मे.आर.मुथा राईस हाऊस, औरंगाबाद | ००६७/०१.०२.२०१४ |
| ०४ | मे.रामनाथ जगन्नाथ अँन्ड कंपनी, नाशीक | ०१८०/०२.०४.२०१४ |
| ०५ | मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगाव | ०१८१/०२.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली पाचही दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशनधारकांची नांवे | मागणी | मेडीमिक्स साबण (१२ ग्रॅम वजन वडी) | |
|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकातील दर प्रती नग व्हॅटसह रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर प्रती नग व्हॅटसह रु. |
| १ | मे.सचिन जनरल स्टोअर्स, शिर्डी | १७२८०० नग | २.७५ | अनुपस्थित |
| २ | मे.बाफना जनरल स्टोअर्स, शिर्डी | | २.०२ | **२.०२** |
| ३ | मे.आर मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | | २.६१ | २.३४ |
| ४ | मे. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं. नाशिक | | २.२१ | २.१० |
| ५ | मे. कोठारी ब्रदर्स, कोपरगांव | | २.५५ | २.२८ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी आवश्यक असलेल्या मेडीमिक्स कंपनीच्या १,७२,८०० नग साबण वड्या (प्रत्येकी १२ ग्रॅम वजन) खरेदीकामी मे.बाफना जनरल स्टोअर्स, शिर्डी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०९ **कॅन्टीन विभागाकरीता प्लॅस्टीक क्रेट खरेदीकामी मागविलेली दरपत्रके उघडून दरपत्रकधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.** (रु.२,००,०००/-)

मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०४.०२.२०१४रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२० नुसार कॅन्टीन विभागाकरीता लाडू वाहतुकीसाठी २००नग प्लॅस्टिक क्रेट खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमित पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-खरेदी/ ६०५९/ २०१४ दि.२६.०३.२०१४अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून प्लॅस्टिक क्रेट खरेदीकामी दिनांक ०५.०४.२०१४ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती तीन व मुदतीनंतर दोन असे पाच पुरवठाधारकांचे दरपत्रके प्राप्त झालेले आहेत, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.न. | पुरवठाधारकाचे नाव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| १. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपूर | ०२४८/०३.०४.२०१४ |
| २. | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपूर | ०२४९/०३.०४.२०१४ |
| ३. | मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपूर | ०२५०/०३.०४.२०१४ |
| ४. | मे. आर टी कराचीवाला, अहमदनगर | ०४१२/०७.०४.२०१४ |
| ५. | मे. निलकमल लिमिटेड, नाशिक | ०६८१/१०.०४.२०१४ |

उपरोक्त प्राप्त पाच दरपत्रके मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून पुरवठाधारकांना चर्चा वाटाघाटीसाठी आमंत्रित करुन दरांबाबत चर्चा वाटाघाटी करता येईल व तुलनात्मक तक्ता तयार करुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देता येईल.

कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असलेले २०० नग प्लॅस्टिक क्रेट खरेदीकामी प्राप्त झालेली दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशनधारकांची नांवे | मागणी | निलकमल प्लॅस्टिक क्रेट J.B.C.५४० (L) x ३६० (B) x ४०० (H) | |
|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकातील दर प्रती नग व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटीतील दर प्रती नग व्हॅटसह रु. |
| १ | साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | २०० नग | ११९९.०० | १०९९.०० |
| २ | राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | | १२३५.०० | गैरहजर |
| ३ | महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपुर | | १४०७.०० | गैरहजर |
| ४ | आर.टी.कराचीवाला, अ.नगर | | ८६५.०० | गैरहजर |
| ५ | निलकमल लि., नाशिक | | १००७.०० | **७७५.००** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असलेले २०० नग प्लॅस्टीक क्रेट खरेदीकामी मे. निलकमल लि., नाशिक यांचे निम्नतम स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१० **बगीचा विभागासाठी सन २०१४-२०१५ करीता वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.** (रु.१,३५,५००/-)

मा. त्रीसस्य समितीचे दि.०४०२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३३ नुसार सन २०१४-१५ करीता बगिचा विभागासाठी आवश्यक वार्षिक साहित्य खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,३५,५००/- (अक्षरी रूपये एक लाख पस्तीस हजार पाचशे मात्र) खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमित पुरवठाधारक यांचे पत्त्यावर इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ ६०५८/ २०१४ दि.२६.०३.२०१४अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून सन २०१४-१५ करीता बगिचा विभागासाठी आवश्यक वार्षिक साहित्य खरेदीकामी दिनांक ०५.०४.२०१४ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती एकही दरपत्रक प्राप्त न झाल्याने पुरवठाधारकांशी वारंवार दुरध्वनीव्दारे दरपत्रके पाठविणेबाबत कळविले असता मुदतीनंतर तीन पुरवठाधारकांचे दरपत्रके प्राप्त झालेले आहेत, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.न. | पुरवठाधारकाचे नाव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| १. | मे.साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | ०५१४/०८.०४.२०१४ |
| २. | मे.श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | ०५१५/०८.०४.२०१४ |
| ३. | मे. अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी | ०६५२/०९.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, एकही दरपत्रकधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित नव्हते. त्यांनी दरपत्रकामध्ये दिलेला मुळ दर खालीलप्रमाणे-

| अ. नं. | साहित्याचा तपशिल | मागणी | साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | | श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव | | अरविंद सेल्स एजन्सीस, साकुरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकातील दर प्रती लि/ कि. व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर प्रती लि./ कि. व्हॅटसह रु. | दरपत्रकातील दर प्रती लि/ कि. व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर प्रती लि./ कि. व्हॅटसह रु. | दरपत्रकातील दर प्रती लि/ कि. व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर प्रती लि./ कि. व्हॅटसह रु. |
| १ | राऊन्ड अप | १०० लि. | ३९०.०० | अनुपस्थित | ३५०.०० | अनुपस्थित | ३२५.०० | अनुपस्थित |
| २ | कॉन्टाफ | ०५ लि. | ७००.०० | अनुपस्थित | ६२४.०० | अनुपस्थित | ४८६.०० | अनुपस्थित |
| ३ | रोगर | ०५ लि. | ३७०.०० | अनुपस्थित | ३३६.०० | अनुपस्थित | ३०६.०० | अनुपस्थित |
| ४ | लिडेन पावडर (फॉली डस्ट) | २० लि. | २५.६० | अनुपस्थित | २४.०० | अनुपस्थित | ८८.०० | अनुपस्थित |
| ५ | लिफान | ०३ लि. | ६५०.०० | अनुपस्थित | ६०६.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित |
| ६ | डि.ए.पी. | ७५०कि. | ३२.२० | अनुपस्थित | २८.४० | अनुपस्थित | २३.६० | अनुपस्थित |
| ७ | युरिया | १०००कि. | ९.०० | अनुपस्थित | ६.७६ | अनुपस्थित | ६.०० | अनुपस्थित |
| ८ | निंबोळी पेंड | ३०००कि. | २२.२५ | अनुपस्थित | १६.२५ | अनुपस्थित | ९.४० | अनुपस्थित |
| ९ | १०:२६:२६ | ५००कि. | ३९.८० | अनुपस्थित | ३७.०० | अनुपस्थित | २२.१८ | अनुपस्थित |
| १० | सुपर फॉस्फेट | ५००कि. | ३०.७० | अनुपस्थित | ३०.०० | अनुपस्थित | ७.२६ | अनुपस्थित |
| ११ | पोटॅश | १०००कि. | २४.२० | अनुपस्थित | २२.४० | अनुपस्थित | १६.८० | अनुपस्थित |
| १२ | गेरु | १०० कि. | ९०.०० | अनुपस्थित | ६८.०० | अनुपस्थित | १२.०० | अनुपस्थित |
| १३ | चुना | १०० कि. | ९०.०० | अनुपस्थित | ६०.०० | अनुपस्थित | १२.०० | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बगीचा विभागासाठी सन २०१४-२०१५ करीता वार्षिक साहित्य खरेदीबाबत चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी एकही दरपत्रकधारक उपस्थित नसल्याने, उपरोक्त दरपत्रधारकांना लेखी पत्र देण्यात येऊन, पुढील उपसमिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

११ **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी बेंचेस (Godrej make merit single siter) खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.** (रु.८,३५,०००/-)

मा.त्रीसदस्य समितीचे दि.२६.०७.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९७ नुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी खालील तपशीलाप्रमाणे बेंचेस खरेदी कामी रक्कम रु.१६,७०,०००/- (अक्षरी रुपये सोळा लाख सत्तर हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं | बेंच तपशील | साईज | मागणी | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Godrej Make Achiever Two Seater Bench Model-3 | Hd-744 mm W-1100 mm D-915 mm Hs-440 mm | १२० नग | ८५००/- | १०,२०,०००/- |
| 02 | Godrej Make Merit Single Seater Bench | H-725.5 mm W-600 mm D-1051 mm | १०० नग | ६५००/- | ६,५०,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **१६,७०,०००/-** |

संदर्भ क्रमांक २ मा.व्य.समितीचे दि.२७.१०.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.८७३ नुसार बेंचेस खरेदी तातडीची असल्याने उपरोक्त बेंचेस खरेदी दोन टप्यात करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी दि.२२.११.२०१३ रोजी प्राप्त झालेला होता.

त्यानुसार पहील्या टप्यात अ.नं ०१ मंधील Godrej Make Achiever Two Seater Bench Model-३ चे १०० नग बॅंचेस खरेदीकामी दि.१०.१२.२०१३ चे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन दरपत्रके मागणी करण्यात आलेली होती. प्राप्त दरपत्रके मा.व्य.समितीचे दि.०६.०१.२०१४ चे सभेमध्ये उघडून दरपत्रकधारकांशी बेंचच्या दराबांबत चर्चा वाटाघाटी करुन न्युनतम पुरवठाधारक मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर यांना इकडील जा.क्र.४८१६/२०१४ दि.१८.०१.२०१४ अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला होता. पुरवठा आदेशानुसार मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर यांनी १०० नग बेंचेसचा पुरवठा केलेला आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि.०६.०२.२०१४ चे पत्रान्वये दुसऱ्या टप्प्यातील Godrej Make Merit Single Seater चे १०० नग बॅंचेस खरेदी करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार दुस-या टप्यातील Godrej Make Merit Single Seater १०० नग बॅंचेस खरेदीकामी जनसंपर्क विभागामार्फत दि.२२.०२.२०१४ रोजी वर्तमानपत्रात व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करुन दि.२२.०२.२०१४ ते दि.०५.०३.२०१४ अखेर गोदरेज कंपनीचे अधिकृत वितरकांकडून दरपत्रके मागणी करण्यात आलेली होती. मात्र मुदतीअंती खालीलप्रमाणे एकाच पुरवठाधारकाचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | २०६५२/०५.०३.२०१४ |

लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कोणत्याही खरेदीकामी कमीत कमी ३ दरपत्रके असणे आवश्यक असते. त्यामुळे सदर खरेदीकामी एकाच पुरवठाधारकाचे दरपत्रक प्राप्त झालेले असल्यामळे जनसंपर्क विभागामार्फत दि.०३.०४.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन दुस-या टप्यातील Godrej Make Merit Single Seater १०० नग बॅंचेस खरेदीकामी गोदरेज कंपनीचे अधिकृत वितरकांकडून फेर दरपत्रकांची मागणी करण्यात आलेली होती. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम दि.१२.०४.२०१४ अशी ठेवणेत आलेली होती. मुदतीअंती खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | ०२५२/०३.०४.२०१४ |
| ०२. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ०४६३/०७.०४.२०१४ |
| ०३. | मे.खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | ०७६५/११.०४.२०१४ |
| ०४. | मे.श्रद्धा ट्रेडर्स, अहमदनगर | ०७६६/११.०४.२०१४ |

कनिष्ठ महाविद्यालयाकरिता आवश्यक असलेले १०० नग Godrej Make Merit Single Seater बॅंचेस खरेदीकामी मुदतीअंती (दि.१२.०४.२०१४ पुर्वी) प्राप्त झालेली उपरोक्त चारही दरपत्रके

आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशनधारकांची नांवे | वर्णन | Godrej Make Merit Single Seater Bench | |
|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकातील दर प्रती नग व्हॅटसह | चर्चा वाटाघाटीतील दर प्रती नग व्हॅटसह |
| १ | मे.रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर | H- २५.५mm W- ६००mm D- १०५१mm (मागणी- १०० नग) | ८३६३.०० | **७२००.००** |
| २ | मे.आर.टी. कराचीवाला, अहमदनगर | | ७३११.०० | अनुपस्थित |
| ३ | मे.खंडेलवाला स्टील फर्निचर, अहमदनगर | | ८४९०.०० | अनुपस्थित |
| ४ | मे. श्रध्दा ट्रेडर्स, अहमदनगर | | ८६५०.०० | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी १०० नग बेंचेस (Godrej make merit single siter) खरेदीकामी मे.रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१२ **कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोग शाळेकरिता टेबल खरेदीकामीचे कोटेशन उघडणेबाबत.** (रु.२,४६,५००/-)

कनिष्ठ महाविद्यालयाचे साईआश्रम नं. २ मधील डी इमारतीत स्थलांतर झाले आहे. तसेच सन २०१३-१४ मध्ये ११ वी विज्ञान शाखेची एक नवीन तुकडी सुरु करणेत आलेली आहे. वाढलेली विद्यार्थी संख्या विचारात घेता विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करण्यासाठी प्रयोग शाळेतील टेबल अपुरे पडत आहेत. तसेच वर्ग शिक्षकांना कामकाजासाठीही टेबल अपूरे आहेत. मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.३९ नुसार खालीलप्रमाणे टेबल खरेदीकामी रु.२,४६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | भौतिक शास्त्र प्रयोगशाळा टेबल -पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप - साईज ६ x ३ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच, १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ५.५ फुट x २.५ फुट x २.५फुट | ९ नग | ४५००/- | ४०५००.०० |
| ०२ | जीवशास्त्र प्रयोगशाळा टेबल- पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ८ x २.५ फुट फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच, १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ७.५ फुट x २.३ फुट x २.५ फुट | ९ नग | ५०००/- | ४५०००.०० |
| ०३ | रसायणशास्त्र प्रयोगशाळा- टेबल -पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ६ x ४ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच, १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ५.५ x ३.७५ x २.५ फुट | ६ नग | ४५००/- | २७०००.०० |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान - टेबल- पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ८ फुट x २ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच, १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ७.५ x १.७५ फुट x २.५ फुट | १४ नग | ४५००/- | ६३०००.०० |
| ०५ | वाचनालय- टेबल - पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ८ फुट x २ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच, १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ७.५ फुट x १.७५ फुट x २.५ फुट | ८ नग | ४५००/- | ३६०००.०० |
| ०६ | वाचनालय- टेबल- पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ६ x २, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ५.५ फुट x १.७५फुट x २.५ फुट | १० नग | ३५००/- | ३५,०००.०० |
| | | | **एकूण रुपये** | **२४६,५००.००** |

वरील टेबल खरेदी कामी कनिष्ठ महाविद्यालयामार्फत जा.नं.एसएसएस-वशी-कनिष्ठ- ६००१ दि.२४/०४/२०१४ नुसार ११ पुरवठाधारकांना कोटेशन पत्रे पाठविणेत आली होती. कोटेशनधारकांना अंतिम मुदत ०२/०४/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. मुदतीत खालीलप्रमाणे ७ कोटेशन प्राप्त झाली.

| **अ.नं.** | **कोटेशन धारकांचे नाव** | **अ.नं.** | **कोटेशन धारकांचे नाव** |
|---|---|---|---|
| १ | मे. राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपूर | ५ | मे.प्रसाद इंजिनिअरिंग वर्क्स, राहाता |
| २ | मे. साई एन्टरप्राईझेस, श्रीरामपूर | ६ | श्री स्वामी समर्थ फेब्रीकेशन वर्क, राहाता |
| ३ | मे. महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपूर | ७ | श्री गुरुप्रसाद इंजिनिअरिंग वर्क, राहाता |
| ४ | मे.युनायटेड स्टिल फर्निचर, राहाता | | |

उपरोक्त टेबल खरेदीकामी प्राप्त सात दरपत्रके (कोटेशन) मा.व्यवस्थापन उपसमिती दि. १०/०४/२०१४ चे सभेत उघडण्यात आली आहेत. कोटेशनधारकांनी कोटेशनमधील अट क्र. ७ नुसार कोटेशन सोबत अनामत रक्कम न दिल्याने महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपूर मे.युनायटेड स्टिल फर्निचर, राहाता, प्रसाद इंजिनिअरिंग वर्क्स, राहाता व गुरुप्रसाद इंजिनिअरिंग वर्क, राहाता यांना अपात्र करण्यात आले आहे. उर्वरित तीन पात्र कोटेशनधारकांना मा.व्यवस्थापन उपसमिती सभेत वाटाघाटीसाठी बोलावून, दरांवर वाटाघाटी करुन घेणेचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

वरील कोटेशनधारकांपैकी पात्र ०३ कोटेशनधारकांना आजचे उपसमिती सभेसमोर समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | तपशिल | राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | | साई एन्टरप्रायजेस, श्रीरामपुर | | स्वामी समर्थ फेब्रीकेशन वर्क, राहाता | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दरपत्रकातील दर प्रती नग व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटीतील दर प्रती नग व्हॅटसह रु. | दरपत्रकातील दर प्रती नग व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटीतील दर प्रती नग व्हॅटसह रु. | दरपत्रकातील दर प्रती नग व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटीतील दर प्रती नग व्हॅटसह रु. |
| १ | भौतिक शास्त्र प्रयोगशाळा टेबल साईज ६ x ३ फुट, संख्या ९ नग | ५१५०/- | अनुपस्थित | ४०९९/- | ३९००/- | २७७०/- | **२६५०/-** |
| २ | जीवशास्त्र प्रयोगशाळा टेबल साईज ८ x २.५ फुट संख्या- ०९ | ५४००/- | अनुपस्थित | ५०९९/- | ५०००/- | २७७०/- | **२६५०/-** |
| ३ | रसायनशास्त्र प्रयोगशाळा टेबल साईज ६ x ४ फुट संख्या- ०६ | ५४००/- | अनुपस्थित | ५०९९/- | ५०००/- | २८७०/- | **२७५०/-** |
| ४ | माहिती तंत्रज्ञान टेबल साईज ८ x २ फुट संख्या- १४ | ५१५०/- | अनुपस्थित | ४०९९/- | ३९००/- | २९७०/- | **२८५०/-** |
| ५ | वाचनालय- टेबल साईज ८ x २ फुट संख्या- ०८ | ५१५०/- | अनुपस्थित | ४०९९/- | ३९००/- | २९७०/- | **२८५०/-** |
| ६ | वाचनालय- टेबल साईज ६ x २ फुट संख्या- १० | ४१००/- | अनुपस्थित | ३६९९/- | ३२००/- | २६७०/- | **२५५०/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोग शाळेकरिता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टेबल खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील मे. स्वामी समर्थ फेब्रीकेशन वर्क, राहाता यांचे गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**१३. मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील कम्पाऊंड भिंतीवर परफोरेटेड एम.एस.शिटचे व त्यावर स्पायरल बारबेड तारेचे कम्पाऊंड करणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर चर्चा वाटाघाटीद्वारे निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:-** "२१.(१) विश्वस्तव्यवस्थेच्या निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून

पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल. (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे."

**व्यवस्थापन समिती निर्णयः-** दि.१३/१२/२०१३ रोजी झालेल्या मा. त्रीसदस्य समितीचे सभेत समाधी मंदिर परिसराचे दक्षिण बाजुकडील कंम्पाउंड भिंतीवर फरफोरेटेड एम.एस. शिटचे कम्पाउंड करणेकामी खालीलप्रमाणे निर्णय क्र.९३८ समंत करणेत आलेला आहे.

"प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंदिर परिसराचे दक्षिण बाजुकडील कंम्पाउंड भिंतीवर फरफोरेटेड एम एस शिटचे कंम्पाउंड करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,७०,७२२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

याकामी इकडील दि.२४/०२/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये निविदा सुचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा सुचनानुसार कोरे निविदा फॉर्म विक्री दि.६.३.२०१४ ते २०.३.२०१४ अखेर व सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि.२४.३.२०१४ अखेर होती. त्यानुसार खालील ठेकेदार यांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | अदिल ॲण्ड अरसलान कन्स्ट्रक्शन लोणी, ता. राहाता | १७.०३.२०१४ |
| ०२ | श्री चंद्रशेखर शरद मलिक पेटकर, अ.नगर | १८.०३.२०१४ |
| ०३ | अथर्व ट्रेडींग कं., औरंगाबाद | १८.०३.२०१४ |
| ०४ | एस.जी. गायकवाड, राहाता | १९.०३.२०१४ |
| ०५ | रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फ्रॅब्रीकेशन्स, श्रीरामपूर | २०/०३/२०१४ |

सिलबंद निविदा सादर करणेचे दि. २४/०३/२०१४ पर्यंतचे अंतिम मुदतीत खालील दोन निविदा धारकांनी सिलबंद निविदा सादर केल्या होत्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲन्ड फॅब्रीकेशन | २१८३३ | २४/०३/२०१४ |
| ०२ | अथर्व ट्रेडिंग कंपनी, औरंगाबाद | २१८३९ | २४/०३/२०१४ |

याकामी विहीत मुदतीत दोनच निविदा प्राप्त झाल्याने कोरी निविदा घेतलेल्या इतर ठेकेदारांना सिलबंद निविदा दि.१५/०४/२०१४ अखेर वाढीव मुदत देवून जमा करणेस इकडील विभागाचे दि.२५/०४/२०१४ रोजीचे टिप्पणी अन्वये मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील विभागाचे पत्रान्वये ठेकेदार यांना दि.१५/०४/२०१४ अखेर सिलबंद निविदा जमा करणेस कळविणेत आले.

सदरहू मुदतीत खालील दोन ठेकेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व पत्ता | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री चंद्रशेखर शरद मलिकपेठकर, अहमदनगर | ९८२ | १५/०४/२०१४ |
| ०२ | श्री एस. जी. गायकवाड, राहाता | ९८४ | १५/०४/२०१४ |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या चारही सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**(निविदेतील अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,७०,७२२/-)**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲन्ड फॅब्रीकेशन | ६,९०,८४४/- (निविदा रकमेवर ३% अधिक) | ६,८४,१३६/- (निविदा रकमेवर ३% अधिक) |
| ०२ | अथर्व ट्रेडिंग कंपनी, औरंगाबाद | **५,७७,१५६/-** (निविदा रकमेत १३.९५% कमी) | अनुपस्थित |
| ०३ | श्री चंद्रशेखर शरद मलिकपेठकर, अहमदनगर | ७,२४,९१६/- (निविदा रकमेवर ८.०८% अधिक) | अनुपस्थित |
| ०४ | श्री एस. जी. गायकवाड, राहाता | ६,५७,३०८/- (निविदा रकमेत २% कमी) | ६,५७,३०८/- (निविदा रकमेत २% कमी) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील कम्पाऊंड भिंतीवर परफोरेटेड एम.एस.शिटचे व त्यावर स्पायरल बारबेड तारेचे कम्पाऊंड करुन घेणेसाठी मे.अथर्व ट्रेडिंग कंपनी, औरंगाबाद यांचे निविदा रकमेवर १३.९५% कमी (रु.५,७७,१५६/-) मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३ १. (अ) जमाखर्च तक्ता माहे फेब्रुवारी-२०१४.**

**(ब) माहे मार्च -२०१४ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

माहे, फेब्रुवारी-२०१४ मधील जमा रु.३३,४७,६९,२४२/- आणि खर्च रु.२०,२२,८८,४१४/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे फेब्रुवारी-२०१४ मधील रुपये- १,९७,९००/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दि.२८.०२.२०१४ रु.१०,६१,७५,०८,७७८/- चा तक्ता, या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. तसेच, श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा माहे मार्च-२०१४ मधील रु.३,२४,९७०/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२९२ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे मार्च- २०१४ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात माहे मार्च-२०१४ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.७८,३१,९६०/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२९२ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**३. श्री साईबाबा रुग्णालयामध्ये अपोलो मेडिकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सच्या व्यवहारात माहे डिसेंबर- २०१३ व जानेवारी- २०१४ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे डिसेंबर- २०१३ व जानेवारी- २०१४ मध्ये रु.६,९१,२९३/- व रु.७,५६,२०९/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.२९२ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे मार्च- २०१४ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये माहे मार्च- २०१४ मधील रु.३९,२९,९००/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२९२ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**५. श्री साईनाथ रुग्णालयातील माहे मार्च- २०१४ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईनाथ रुग्णालयात माहे मार्च- २०१४ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये २,६६,४६९/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२९२ (E) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**६. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडिकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सच्या व्यवहारात माहे डिसेंबर- २०१३ व जानेवारी- २०१४ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे डिसेंबर- २०१३ व जानेवारी-२०१४ मध्ये रु.५६,९५८/- व रु.१,२२,३१५/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.२९२ (F) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**७. माहे मार्च व एप्रिल- २०१४ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटपाची नोंद घेणे.**

मार्च व एप्रिल- २०१४ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना १४,४७,३५० व १४,५९,५०० पाकिटे व त्यासाठी रु.२,०७,८३,९४६/- व रु.१,९६,७४,४०८/- आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२९२ (G) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र. अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**८. माहे नोव्हेंबर, डिसेंबर-२०१३ व मार्च-एप्रिल, २०१४ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

माहे नोव्हेंबर, डिसेंबर-२०१३ व मार्च, एप्रिल-२०१४ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे ५३,०८१, ५६,८६३, ५५,९१३ व ५४,२६२ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२९२ (H) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**९. पाणी तपासणी अहवाल माहे मार्च- २०१४.**

माहे मार्च-२०१४ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२९२ (I) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.०४ मा.उपकार्यकारी अधिकारी यांना आर्थिक अधिकार प्रदान करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२०१३ चे सभेतील निर्णय क्रं.८५३ नुसार रक्कम रु.२५,०००/- मात्र मर्यादेपर्यंतच्या धनादेश व बँकेस देण्यात येणा-या धनाकर्ष, NEFT, RTGS वगैरे पत्रांवरील स्वाक्षरीचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार अबाधित ठेवून त्यांचे बरोबरीने मा.उप कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत आले आहेत.

दिवसेंदिवस संस्थानच्या आर्थिक कामकाजात झपाटयाने होत असलेली लक्षणीय वाढ तसेच आर्थिक व्यवहार वेळेवर व विनाविलंब सुरळीत पार पडावेत, त्यास खीळ बसू नये या दृष्टीने संस्थानच्या सध्याचे आर्थिक कामकाजाचे पध्दतीत कालपरत्वे बदल करणे अपरिहार्य आहे.

संस्थानच्या आर्थिक कामकाजात अधिक सुसूत्रता येणेसाठी तसेच कामे अधिक जलद गतीने होणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडील अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. याकामी संस्थानच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या अधिनियम क्रमांक १४/२००४ मध्ये खालीलप्रमाणे तरतुदी आहेत :-

**समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये**

१४(३) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी समितीकडून किंवा कार्यकारी अधिका-याकडून किंवा विनियमान्वये त्यांना वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

**समितीची कर्तव्ये व अधिकार**

१७(२) (झ) सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील;

**विश्वस्तव्यवस्था निधी**

२०(४)समितीने प्राधिकृत केलेल्या सदस्यांकडून किंवा अधिका-यांकडून, विश्वस्तव्यवस्था निधीचा व्यवहार, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, करण्यात येईल.

वरील तरतुदींना व निर्णय क्रमांक ८५३ दि.१८/१०/२०१३ ला अनुसरुन प्रदान करण्यात आलेल्या रक्कम रुपये २५,०००/- मर्यादेऐवजी रुपये ५,००,०००/- मर्यादेपर्यंतचे धनादेश व बँकेस देण्यात येणा-या धनाकर्ष, NEFT, RTGS वगैरे पत्रांवरील स्वाक्षरीचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार अबाधित ठेवून मा.उप कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केल्यास मा.कार्यकारी अधिकारी यांना संस्थानचे इतर महत्वाच्या व धोरणात्मक बाबींवर कामकाजासाठी अधिक वेळ उपलब्ध होईल व संस्थानचे आर्थिक कामकाजात आणखी गतिमानता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सादर करण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.२९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, दिवसेंदिवस संस्थानच्या आर्थिक कामकाजात झपाटयाने लक्षणीय वाढ होत असल्यामुळे प्रस्तावात नमुद केलेल्या अधिनियमातील तरतूदींना अनुसरुन मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या रु.२५,०००/- मात्र रकमेच्या मर्यादेऐवजी रु.२,००,०००/- मात्र पर्यंतचे धनादेश, बँकेस देण्यात येणाऱ्या धनाकर्ष व NEFT, RTGS वगैरे पत्रांवरील स्वाक्षरीचे अधिकार अबाधित ठेवुन मा.उपकार्यकारी अधिकारी यांना सदरचे (प्रस्तावात नमुद केलेले) अधिकार प्रदान करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी/ कार्यकारी, उपकार्यकारी अधिकारी कक्ष/ सर्व प्रशासकीय अधिकारी)

---

**विषय नं.०५ शिर्डी नागरी विकास प्राधिकरण रद्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील क्षेत्राच्या सुयोग्य व नियोजनबध्द विकासासाठी शिर्डी व लगतच्या गावांचा समावेश करुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टिपीस-१६०८/१९८१/प्र.क्र. १०९/०९/नवि-०९, दि. २५/०८/२००९ अन्वये "शिर्डी नागरी विकास प्राधिकरण" या विशेष नियोजन प्राधिकरणाची कलम ४० (१) अन्वये मंजुरी देवून स्थापना केलेली आहे. या प्राधिकरणात खालील गावांचा समावेश करणेत आलेला आहे.

| अ.नं. | नगरपंचायत / नगरपरिषद/ गांवाचे नांव | अ.नं. | नगरपंचायत/ नगरपरिष्द/ गांवाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | शिर्डी नगरपंचायत शिर्डी | ८. | पिंपळवाडी |
| २. | राहाता नगरपरिषद | ९. | कनकुरी |
| ३. | सावळविहीर (खुर्द) | १०. | नांदुर्खी (खुर्द) |
| ४. | सावळविहीर (बुद्रुक) | ११. | नांदुर्खी (बुद्रुक) |
| ५. | निघोज | १२. | साकुरी |
| ६. | निमगांव-कोऱ्हाळे | १३. | डोऱ्हाळे |
| ७. | रुई | १४. | कोऱ्हाळे |

शिर्डी नागरी विकास प्राधिकरणात खालील सदस्य आहेत.

१. जिल्हाधिकारी, अहमदनगर — अध्यक्ष
२. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी — उपाध्यक्ष
३. राहाता विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे आमदार — सदस्य व सहअध्यक्ष
४. नगराध्यक्ष, राहाता नगरपरिषद, राहाता — सदस्य
५. नगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी — सदस्य
६. उपसंचालक, नगररचना , नाशिक विभाग, नाशिक — सदस्य
७. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, संगमनेर — सदस्य
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी — सदस्य- सचिव

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. मह. कार्या / ज ३ ब / १८ दि. ०८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये मा. ना. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना दिलेले पत्र तसेच त्यासोबत नगरपंचायत ठरावाची प्रत जोडली आहे. मा. मंत्री महोदय यांनी निवेदनात नमूद केलेप्रमाणे शिर्डी नागरी विकास प्राधिकरण रद्द करणेबाबत संस्थानचा वस्तूस्थितीदर्शक अहवाल सुस्पष्ट अभिप्रायासह पाठविणेस कळविले आहे.

शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाची स्थापना होऊन आता पाच वर्षांचा कालावधी होत आलेला आहे. तथापी अदयाप सदर प्राधिकरणाचे कामकाज सुरु झालेले नाही. तसेच प्राधिकरणाच्या स्थापनेमुळे उपरोक्त नमूद शिर्डी नगरपंचायत, राहाता नगरपरिषद व इतर बारा गावांच्या ग्रामपंचायती

यांच्या स्थानिक प्राधिकरण या नात्याने असलेल्या अधिकारांमध्ये कपात होणार आहे. तसेच शिर्डी नागरी विकास प्राधिकरणास अद्याप कार्यालयासाठी जागा व आवश्यक कर्मचारीवर्ग उपलब्ध करण्यात आलेला नाही.

दि. २८/१०/२०१३ रोजी शिर्डी येथिल संस्थानचे सभागृहात सन्मा. नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांचे अध्यक्षतेखाली शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाबाबत सभा झाली. सदरहु सभेस मा. संचालक, नगररचना, पुणे व मा. उपसंचालक, नगररचना, नाशिक यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरहु सभेपुढे उपस्थित असलेल्या शिर्डी नगरपंचायत, राहाता नगरपरिषद व इतर गावांचा ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी शिर्डी नागरी विकास प्राधिकरण रद्द करणेविषयी मत मांडले.

आता श्री साईबाबांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने कृती आराखडा तयार करणेकामी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.१/का.१६, दि. २२/१०/२०१३ अन्वये कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती मार्फत शिर्डी शहर व परिसरातील विकासकामे पूर्ण करुन घेता येतील. तथापी याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे असे मत आहे. तरी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय शासन स्तरावर धोरणात्मक निर्णयासाठी प्रलंबीत असल्यामुळे अमान्य करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६ श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पाबाबत.**

**विषय नं.०७ श्री साईबाबांच्या महासमाधीस सन- २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने कृती आराखडा तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९६ विषय नं.०६ व ०७ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ श्री. सोपान गंजी मते व विठ्ठल गंजी मते यांनी त्यांची निमगांव कोऱ्हाळे गट नं.१९४ क्षेत्र ० हेक्टर २६ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिलेल्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री सोपान गंजी मते व श्री.विठ्ठल गंजी मते यांनी त्यांची निमगांव कोऱ्हाळे येथील जमीन गट नंबर १९४ क्षेत्र ० हेक्टर २६ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिलेला प्रस्ताव संस्थानला ०४ फेब्रुवारी २०१४ रोजी प्राप्त झालेला आहे.

गट नंबर १९४ चे ७/१२ प्रमाणे स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार सदरी नांव | इतर हक्क |
|---|---|---|---|---|
| १ | १९४ | ०-२६ | सोपान गंजी मते<br>विठ्ठल गंजी मते | रे.मु.नं. ६५५/११<br>न्यायप्रविष्ठ (४६८२) |

**ब) <u>भौगोलिक स्थिती व उपयुक्तता-</u>**

गट नंबर १९४ च्या लगत दक्षिण बाजूस संस्थानची जमीन गट नंबर १९५ क्षेत्र ३ हेक्टर ५९ आर आहे. प्रस्तुत जमीन संस्थानच्या जमिनीस लागून आहे.

**क) <u>जमीनीच्या किंमतीबाबत-</u>**

अर्जदाराने किती किंमत पाहिजे याचा उल्लेख केलेला नाही. सन २०१४ चे रेडीरेकनर पाहिले असता पान नं.६० वर गट नंबर १९४ नोंदविलेला आहे. त्याच्यापुढे ७८,४८,०००/- प्रति हेक्टर किंमत आहे त्याप्रमाणे २०,४०,४८०/- किंमत येत आहे.

तथापि याबाबत सबरजिस्ट्रार, राहाता यांचेकडून किंमत ठरवून घेणे उचित राहील.

**ड) कायदेशीर बाबी-**

इतर हक्कात ४६८२ ची नोंद आहे. त्यापुढे रे.मु.नं. ६५५/२०११ न्याय प्रविष्ठ बाब आहे. तसेच सदर फेरफारचे अवलोकन केले असता त्यात गट नंबर १९४ पैकी ०० हे.२६ आर मिळकत विषय मे.सिव्हील जज्जसाहेब डि.साो. यांचे कोर्टात रे.मु.नं. ६५५/२०११ राहाता येथे दावा चालू आहे. राहाता येथील दुय्यम निबंधक कार्यालयात टी.पी. ॲक्ट ५२ प्रमाणे नोटीस रजिस्टरला नोंद केली त्याची ७/१२ व इतर हक्कात नोंद घेऊन दाव्याचा निकाल लागेपर्यंत इतर कोणतेही दस्त नोंद करु नये असे सुची क्रमांक ६२३८/२०११ दिनांक १३/१२/२०११ वरुन नोंद असा उल्लेख आहे.

सदर नोंदीला अर्जदार यांनी हरकत घेतली होती. याबाबत मंडलाधिकारी ,राहाता यांचे समोर कामकाज चालले. त्यांनी त्यांचेकडील केस क्रमांक ४/२०१२ दिनांक ९/११/२०१२ ने खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

१) अर्जदार /वादी यांचा अर्ज निकालात काढण्यात येत आहे.
२) फेरफार क्रमांक ४६८२ ची नोंद मंजूर करणेत येत आहे.

याबाबत निर्णय होणेपुर्वी परिच्छेद क्रमांक ड मधील बाबींचा विचार करणेस विनंती आहे. प्रस्तुत जमिनीवर मा.दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, राहाता यांचे कोर्टात रे.मु. मुकदमा नंबर ६५५/२०११ प्रलंबित आहे. त्यात काय मागणी आहे याची माहिती नाही.

**खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे.**

१. श्री.सोपान गंजी मते व श्री.विठ्ठल गंजी मते यांची मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल गट नंबर १९४ क्षेत्र ० हे. २६ आर जमीन घेणे अथवा न घेणे
२. जमीन घेणेचा निर्णय झाल्यास मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून जमिनीच्या किंमतीबाबत पत्र घेणे.
३. जमीन घेणेचा निर्णय झाला तर संस्थानच्या वकीलांकडून सर्च रिपोर्ट घेणे व अभिप्राय घेणे तसेच खरेदीखताचा मसुदा तयार करुन घेणे. या सर्व खर्चास व इतर तदअनुषिंगक स्टॅम्प, रजिस्ट्रेशन फी इत्यादी बाबीबाबत होणाऱ्या खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र.२९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. सोपान गंजी मते व विठ्ठल गंजी मते यांनी त्यांची निमगांव कोऱ्हाळे गट नं.१९४ क्षेत्र ० हेक्टर २६ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिलेल्या प्रस्तावाबाबत, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे मा.दिवाणी न्यायालयाचा अंतीम निर्णय झ ााल्यानंतर विचार करणेत येईल, असे त्यांना लेखी पत्राद्वारे कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ जुन्या पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगा काढुन शिर्डी येथील स.नं.५४, ५५ पैकी क्षेत्रात दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः -</u>**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे."

**प्रस्तावना**: - श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी देश - विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. संस्थान व्यवस्थानामार्फत दरवर्षी श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी या उत्सवांबरोबरच इतर लहान- मोठे उत्सव साजरे केले जातात. या उत्सवांचे वेळेस तसेच उन्हाळी, दिपावली, नाताळ, दर गुरुवार- शनिवार, रविवार व त्यास जोडून येणा-या सलग सुट्टयांच्या कालावधीत श्री क्षेत्र शिर्डी येथे साई भक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होऊन, ही संख्या २ ते ३ लाखांपर्यंत जाते.

सध्या जुन्या पिंपळवाडी रस्त्याचे अर्ध्या भागात (मनोज कुमार गोस्वामी मार्गावर) दर्शनरांगासाठी पॉलिकार्बोनेटचे छत असलेल्या शेडची उभारणी करण्यात आली आहे. सदर ठिकाणी पॉलिकार्बोनेट शेड टाकूण वाहनांना अडचण होणार नाही तसेच भक्तांना दर्शन रांगेत सोडणेकरीता सोयीचे हाईल या दृष्टीने परवानगीकामी नगरपंचायत विशेष सभा ठराव क्र.५० दि.३०/०७/२००९ अन्वये मंजूरी देणेत आली होती.

परंतू सदर ठराव क्र.५० तहकुब करणेबाबत श्रीमती संध्या प्रकाश शेळके व इतर दोन यांनी मा. जिल्हाधिकारी सो, अ.नगर यांचेकडे अपिल दाखल केले होते.

त्यावर मा. जिल्हाधिकारी सो. यांनी त्यांचेकडील दि. ०१/०७/२०१० रोजीचे आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे. "शिर्डी नगरपंचायतीचा विशेष सभा ठराव क्र. ५० दि. ३०/०७/२००९ तहकुब करण्यात येत आहे व मुख्याधिकारी, नगरपंचायत, शिर्डी यांना आदेशित करितो की, संदर्भांकीत रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करावा व साई संस्थान यांना सुरक्षिततेच्या व गर्दीच्या व्यवस्थापणासाठी रस्ता आवश्यक असेल, तेव्हा त्यांनी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेऊन वापरावा."

उपरोक्त आदेशानुसार सदर रस्ता वाहतुकीस मोकळा करणेसाठी पॉलिकार्बोनेट शेड काढून घेणेकामी मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि. २७/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे साईभक्तांची पर्यायी दर्शन व्यवस्था त्वरीत करणे गरजे आहे.

शिर्डी मधील वाढती गर्दी बघता, या कालावधींमध्ये साई भक्तांचे सोयीसाठी करण्यात येणा-या सुविधा देखील अपु-या पडत आहे. गर्दीच्या काळात साई भक्तांना दर्शन रांगा हया नगर - मनमाड रस्ता, पिंपळवाडी रस्त्यावर जातात. त्यामुळे साई भक्तांची मोठी गैरसोय होते. श्री साईबाबा शताब्दी महोत्सव सन २०१८ मध्ये साजरा करण्यात येणार आहे. मंदिर परिसराचे उत्तरेस असलेल्या जुन्या प्रसादालय परिसरात साई भक्तांचे दर्शन सुलभ व अल्हाददायक होणेसाठी सुसज्ज व सर्व सोयी सुविधां युक्त अशा मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्प उभारणीकामी कार्यवाही करणेत येत आहे. अलीकडच्या दोन- तीन वर्षाच्या कालावधीमध्ये श्री साईंच्या दर्शनासाठी सर्व साधारणपणे नेहमीच श्री क्षेत्र शिर्डी सर्वधर्मीय भक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत आहे. या वाढत्या गर्दीत भक्तांचे ऊन, पाऊस या पासून संरक्षण व्हावे, अबाल वृध्द भक्तांना तात्पुरता निवारा उपलब्ध व्हावा म्हणून संस्थान व्यवस्थापनामार्फत तात्पुरते मंडप, शामियाने उभारणे आदी उपाययोजना केल्या जात आहेत.

परंतू सदर प्रकल्पास काही अवधी लागणार आहे. तत्पुर्वी पुर्व तयारी म्हणून साई प्रसादालय परिसराजवळील संस्थान मालकीची गट नं. ८७,८८ पैकी चे क्षेत्रात अथवा नवीन पिंपळवाडी रस्त्यालगत संस्थान मालकीचा सर्व्हे नं. ५४,५५ चे क्षेत्रात साईभक्तांकरीता वाढीव सुविधा निर्माण करता येतील.

**प्रस्ताव**:- साई प्रसादालय जवळील मालकीचे गट नं. ८७, ८८ चे क्षेत्र हे मंदिरापासून १२०० मीटर अंतरावर आहे. सदरचे ठिकाणी साई भक्तांकरिता वाढीव सोयी सुविधा निर्माण करणे शक्य आहे. त्याठिकाणी प्रतिक्षालय, स्त्री व पुरुषांकरीता टॉयलेट, चप्पल व मोबाईल लॉकर्स, सुरक्षा कार्यालय, कॅन्टीन/ उपहारगृह, परिसर विकास व लॅण्डस्कॅपींग कामे, कंम्पाउंड वॉल, अंतर्गत ड्रेनेज व विद्युत व्यवस्था, पिण्याचे पाण्याची व्यवस्था इ. व्यवस्था करता येईल. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**अ) दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था - (गट नं. ८७, ८८ पैकी चे क्षेत्रात)**

| अ.नं | तपशिल | साईज | परिणाम/एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रतिक्षालय | २ x ८०' x १५०' | २४००० चौ.फुट | ९००/- प्रती चौ. फुट | २,१६,०००,००/- |
| ०२ | चप्पल व मोबाईल लॉकर्स | ३०' x ६०' | १८०० चौ. फुट | ९००/-- प्रती चौ. फुट | १६,२०,०००/- |
| ०३ | टॉयलेट | २ x १२' x ४५' | १०८० चौ. फुट | १२००/- प्रती चौ. फुट | १२,९६,०००/- |
| ०४ | कॅन्टीन बांधकाम | ३०' x ६०' | १८०० चौ. फुट | १२००/- प्रती चौ.फुट | २१,६०,०००/- |
| ०५ | सुरक्षा कार्यालय | ३०' x ४०' | १२०० चौ. फुट | ९००/- प्रती चौ. फुट | १०,८०,०००/- |
| ०६ | कंपाउंट वॉल | - | - | - | २५,००,०००/- |
| ०७ | परिसर विकास व लॅण्डस्केपींग वर्क | १,००,००० चौ. फुट | - | १००/- प्रती चौ. फुट | १,००,००,०००/- |
| | | | | एकूण रुपये - | ४,०२,५६,०००/- |
| | | | | **पुर्णाकींत रक्कम-** | **४,०३,००,०००/-** |

सदरकामी उपरोक्त तपशिलानुसार एकूण रक्कम रु. ४.०३ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

सध्या नगर- मनमाड व पिंपळवाडी रस्त्याचे दोन्ही बाजुस हॉटेल, लॉजिंग व दुकाने असल्याने या रस्त्यावर नेहमीच गर्दी असते. त्यामुळे जुन्या पिंपळवाडी रस्त्यावर व नगर- मनमाड रोडवर गर्दी टाळण्याचे दृष्टीने गट नं. ८७, ८८ मध्ये दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे तसेच पिंपळवाडी- नगर- मनमाड- साईप्रसादालय रस्त्यावर स्कायवॉक केल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**ब) स्काय वॉक उभारणे: -**

| अ.नं. | तपशिल | साईज | परिणाम/एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | गट नं.८७,८८ पासुन ते गेट नं.२ पर्यंत साईभक्तांकरीता स्कायवॉक उभारणे. | ४ मीटर रुंदी असलेला | १३५० र. मिटर | ४ लाख प्रती र. मिटर | ५४,००,००,०००/- |
| | | | | **एकूण रक्कम -** | **५४,००,००,०००/-** |

सदर स्कायवॉक द्वारे साई प्रसादालय रोड, नगर - मनमाड रोड तसेच जुना पिंपळवाडी या रोडवर गर्दी न करता, साईभक्तांना गट नं. ८७, ८८ येथून थेट गेट नं. २ जवळील दर्शन बारीमध्ये सोडणेची व्यवस्था करता येईल. सदरकामी उपरोक्त तपशिलानुसार स्कायवॉक करावयाचा झाल्यास त्यासाठी एकूण रक्कम रु. ५४.०० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**अथवा**

नवीन पिंपळवाडी रस्त्यालगत संस्थान मालकीचा सर्व्हे नं. ५४,५५ चे क्षेत्र हे मंदिरापासून ६०० मीटर अंतरावर आहे. सदरचे ठिकाणी देखील साई भक्तांकरिता वाढीव सोयी सुविधा निर्माण करणे शक्य आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**अ) दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था - (सर्व्हे नं. ५४,५५ पैकी चे क्षेत्रात)**

| अ.नं. | तपशिल | साईज | परिणाम/एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रतिक्षालय | २ x ८०' x १५०' | २४००० चौ.फुट | ९००/- प्रती चौ. फुट | २,१६,०००,००/- |
| ०२ | चप्पल व मोबाईल लॉकर्स | ३०' x ६०' | १८०० चौ. फुट | ९००/- प्रती चौ. फुट | १६,२०,०००/- |
| ०३ | टॉयलेट | २ x १२' x ४५' | १०८० चौ. फुट | १२००/- प्रती चौ. फुट | १२,९६,०००/- |
| ०४ | कॅन्टीन बांधकाम | ३०' x ६०' | १८०० चौ. फुट | १२००/- प्रती चौ.फुट | २१,६०,०००/- |
| ०५ | सुरक्षा कार्यालय | ३०' x ४०' | १२०० चौ. फुट | ९००/- प्रती चौ. फुट | १०,८०,०००/- |
| ०६ | कंपाउंट वॉल | - | - | - | २५,००,०००/- |
| ०७ | परिसर विकास व लॅण्डस्केपींग वर्क | १,००,०००चौ. फुट | - | १००/- प्रती चौ. फुट | १,००,००,०००/- |
| | | | | एकूण रुपये - | ४,०२,५६,०००/- |
| | | | | **पुर्णांकीत रक्कम-** | **४,०३,००,०००/-** |

सदरकामी उपरोक्त तपशिलानुसार एकूण रक्कम रु. ४.०३ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

सध्या पिंपळवाडी रस्त्याचे दोन्ही बाजुस हॉटेल, लॉजिंग व दुकाने असल्याने या रस्त्यावर नेहमीच गर्दी असते. त्यामुळे जुन्या पिंपळवाडी रस्त्यावर गर्दी टाळण्याचे दृष्टीने सर्व्हे नं. ५४,५५ मध्ये दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे तसेच पिंपळवाडी रस्त्यावर स्कायवॉक केल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**ब) स्काय वॉक उभारणे : -**

| अ.नं. | तपशिल | साईज | परिणाम/एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सर्व्हे नं.५४,५५ पासुन ते गेट नं.२ पर्यंत साईभक्तांकरीता स्कायवॉक उभारणे. | ४ मीटर रुंदी असलेला | ७५० र. मिटर | ४ लाख प्रती र. मिटर | ३०,००,००,०००/- |
| | | | | **एकूण रक्कम -** | **३०,००,००,०००/-** |

सदर स्कायवॉक द्वारे जुन्या व नवीन पिंपळवाडी रस्त्यावर गर्दी न करता, साईभक्तांना सर्व्हे नं. ५४,५५ येथून थेट गेट नं. २ जवळील दर्शन बारीमध्ये सोडणेची व्यवस्था करता येईल. सदरकामी

उपरोक्त तपशिलानुसार स्कायवॉक करावयाचा झाल्यास त्यासाठी एकूण रक्कम रु. ३०.०० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

याकामी संस्थानचे आर्किटेक्ट माथुर कापरे, दिल्ली यांची नियुक्ती करुन याकामासाठी त्यांचेकडून सल्ला व सेवा घेता येईल, असे मत आहे.

**विभागाच्या अभिप्राय / मत** : -

**(अ)** संस्थानचे गट नं. ८७, ८८ येथे दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी 'अ' नुसार एकूण अंदाजे रु. ४.०३ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**(ब)** संस्थानचे गट नं. ८७, ८८ येथून गेट नं.०२ पर्यंत स्कायवॉक करणेकामी 'ब' नुसार एकूण अंदाजे रु. ५४.०० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**किंवा**

**(अ)** संस्थानचे सर्व्हे नं. ५४, ५५ येथे दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी 'अ' नुसार एकूण अंदाजे रु. ४.०३ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**(ब)** संस्थानचे सर्व्हे नं. ५४, ५५ येथून गेट नं.०२ पर्यंत स्कायवॉक करणेकामी 'ब' नुसार एकूण अंदाजे रु. ३०.०० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

या प्रकल्पाकरिता आर्किटेक्ट माथुर कापरे, दिल्ली यांचेकडून सल्ला व सेवा घेता येईल.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पी. आय. एल. नं. १८/२०११ मधिल ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये सदरहू प्रकल्प हा मोठया खर्चाचा असल्याने त्यासाठी प्रथम मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवनगी घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावर निर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.२९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुन्या पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगा काढुन शिर्डी येथील स.नं.५४, ५५ पैकी क्षेत्रात दर्शन रांगा व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

**सध्या नियोजित मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्प उभारणीची कार्यवाही चालू असल्याने सदर प्रकल्प पुर्ण होईपर्यंत दर्शन रांगांसाठी सध्या आहे तीच व्यवस्था राहु द्यावी, तोपर्यंत पिंपळवाडी रस्त्यावरील पॉलिकार्बोनेट शेड काढणेसाठी मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून मुदतवाढ घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील कॅन्टीनची इमारत रुग्णालयाचे वाढीव सोयी सुविधेसाठी उपलब्ध करुन जनरेटर कक्षा समोरील जागेत उपहारगृह उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावनाः** संस्थानचे सर्व्हे नं. १४८ मधील जागेत साईभक्तांचे निवासाठी धर्मशाळा इमारतींचे बांधकाम करणेत आले होते. श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने, नगर-मनमाड रस्त्या लगत पूर्वीचे असलेले रुग्णालयामध्ये आवश्यक ते फेरबदल व काही नवीन इमारतीचे बांधकाम करुन मा. व्यवस्थापन समितीचे विवीध निर्णयान्वये सदर इमारतीमध्ये श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु करणेत आले असून, श्री साईनाथ रुग्णालय पूर्वीचे धर्मशाळा इमारत क्र. ०१ व ०२ मध्ये आवश्यक ते फेर बदल करुन स्थलांतरीत करणेत आलेले आहे. धर्मशाळा इमारतीचे बांधकामावेळी सदर परीसरात कॅन्टीन इमारतीचे बांधकाम करणेत आलेले आहे.

**प्रस्ताविकः** श्री साईनाथ रुग्णालय कडील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने त्या परीसरात असलेल्या कॅन्टीन इमारतीमध्ये वाढीव वॉर्डची सुविधा करणेबाबत व तेथे असलेली कॅन्टीन व उपहारगृहाची व्यवस्था इतरत्र करुन घेणेबाबत मा. अध्यक्ष सो। यांनी निर्देशित केलेले आहे. करीता कॅन्टीन व उपहारगृहासाठी रुग्णालय इमारतीचे परिसरात असलेले जनरेटर कक्षा समोरील मोकळ्या जागेत ४०'x७०' साईजचे उपहारगृहाची उभारणी करुन, त्यामध्ये व्यवस्था करता येईल.

करीता रुग्णालय परीसरात ४०'x७०' साईजमध्ये कलर कोटेड शीटचे छत असलेले शेड उभारणी करुन, फ्लोरींग करीता व्हेट्रीफाईड टाईल्स्, ७' उंचीचे डॅडो, ॲल्युमिनिअम दरवाजे, खिडक्या इ. कामे करुन घेऊन उपहारगृहाची व्यवस्था करणेकामी इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रुपये १८.९० लक्ष मात्र इतका खर्च येईल.

**विभागाचा अभिप्राय/ मतः** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने, कॅन्टीनची इमारत श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव सोयी-सुविधेसाठी उपलब्ध करुन, त्याच परिसरात

असलेले जनरेटर कक्षा समोरील मोकळ्या जागेत उपहारगृहाची व कॅन्टीनची व्यवस्था करता येईल असे मत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये १८.९० लक्ष मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने, कॅन्टीनची इमारत रुग्णालयाच्या वाढीव सोयी-सुविधेसाठी उपलब्ध करुन देणेस व त्याच परिसरात असलेले जनरेटर कक्षा समोरील मोकळया जागेत उपहारगृह व कॅन्टीनची व्यवस्था करणेकामी येणाऱ्या अंदाजे रुपये १८.९० लाख मात्र येणाऱ्या खर्चास संस्थानच्या वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी. मा.खंडपीठाच्या आदेशास अधीन राहुन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.११** **मोजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवादाबाबत नेमलेले ॲड. शानबाग व वेर्नेकर यांचे फी बाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियमाचे कलम २१ (१) विश्वस्त व्यवस्था विनियोग चे अंतर्गत असून कलम २१ (१) प्रमाणे समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करता येईल अशी तरतुद असून, अधिनियम" २१ (१) (छ) प्रमाणे कोणत्याही न्यायालयाचा किंवा लवाद न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमा." याचा समावेश प्रमुख तरतुदीमध्ये केलेला आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०७/२००९ चे सभेत निर्णय क्र. ६३७.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/१०/२०१३ चे सभेत निर्णय क्र. ८१०.

**प्रस्ताविक:** संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मधील जागेत संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी यांचे निवासाकरीता १२ इमारतींमध्ये ९६ सदनिकांचे बांधकाम सन २००७ मध्ये पूर्ण करण्यात आले असून, सदरहू सदनिका संस्थान कर्मचाऱ्यांना निवासासाठी देण्यात आलेल्या आहेत. ठेकेदार अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचे काम दि. १५/०८/२००७ रोजी पुर्ण झाल्यानंतर व ठेकेदार यांनी अंतिम बिलातील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २१६/७ दि. १६.०३.२००८ अन्वये मंजूरी नंतर अंतिम बिल अदा करण्यात आले आहे.

त्यानंतर ठेकेदार यांनी दि.०१.०४.२००९ चे पत्रान्वये अंतिम बिल व सुरक्षा ठेव स्वीकारलेनंतर रु.२,०७,५०,४४१.०० मात्र इतक्या अतिरीक्त रकमेची मागणी केली असून सदर रक्कम पंधरा दिवसाचे आत न मिळाल्यास आर्बिट्रेशनमध्ये जाणेबाबत कळविले होते.

याबाबत सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांची Arbitrator म्हणून नेमणूक करणेस व संस्थानचे कायदेविषय सल्लागार एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०७/२००९ चे सभेत प्रस्ताव अवलोकनार्थ ठेवण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ६३७ अन्वये सदरहू बाबतीत कायदेशीर सल्ला घेवून त्यानुसार उचित कार्यवाही करणेत यावी असे ठरले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई मा. न्यायाधिश, एस. जे. वजीफदर, यांचे समोर दि. २४ जानेवारी, २०११ रोजी प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी झाली. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्री. परेश कपाडीया यांची संस्थान करीता Arbitratior म्हणून व ठेकेदार यांचे वतीने एन. ए. बढेका यांची Arbitratior म्हणून नियुक्ती करण्यात येत असल्याचे ऑर्डर झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे सुनावणी बाबत संस्थानचे कायदे विषयक सल्लागार, ॲड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडे प्रकरणाचे कागदपत्रासह कोपरगांवी जाऊन सल्ला घेण्यात आला असून, त्याबाबत त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

In the above matter I have gone through Arbitration application no 142/ 2010 preferred in High Court. I have seen order dt. 24/1/2011 passed by Hon. High Court. It seems that in our absencry the order is passed. I have gone through the notice which is received by us on 20/1/2011. It seems that the notice is very short and we had no opportunity to appear in the matter.

Considering the Suituation it is better that we should face the Arbitration inquiry.

संस्थानचे वतीने उपरोक्त प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथिल कामकाजात व आर्बिट्रेशनचे कामकाजात ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांचे सल्ल्याने पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०२/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक १८६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त कादेशीर कारवाई करणेकामी ॲड. सचिन शानबाग व ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांची नियुक्ती करणेस तसेच त्यांचे सल्ल्याने Arbiration ची नेमणूक करणेस व त्यांची फी अदा करणेस मान्यता देण्यात आली.

सदरहू लवादाबाबत संस्थानचे वतीने ॲड. सचिन शानबाग, मुंबई व Arbitrator म्हणून डॉ. महाशब्दे हे काम पहात आहेत. सदरहू प्रकरणी Presiding Arbitrator नेमणूकीसाठी दिनांक १३ जानेवारी, २०१२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधिश, मा. डी. के. देशमुख यांचेसमोर सुनावणी होऊन मुंबई व अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश, Justice Ferdino I. Rebello यांची Presiding Arbitrator म्हणून नेमणूक झाली आहे.

Presiding Arbitrator यांनी दिनांक ०१ मार्च, २०१२ रोजीचे Procedural Order ०१ (vii) अन्वये ठरल्यानुसार खालील प्रमाणेचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

(vii) Arbitrators fees are fixed as under-

e) Reading charges Rs.1,00,000/- (Rs. One lakhs only) to be paid by each party to each arbitrator.

f) Sitting fee Rs.1,00,000/- (Rs. One lakhs only) per sitting of upto 3 hrs or paart thereof per arbitrator to be shared equally by the claimant and respondents.

g) Each party to deposit initially a sum of Rs.7,500/- (Rs. Seven thousand five hundred only) with presiding arbitrator ans Rs.5,000/- (Rs. Five thousand only) with each co arbitrator, towards administrative expenses.

h) Each party to deposit initially a sum of Rs.3,07,500/- (Rs. Three lakhs Seven thousand five hundred only) with presiding arbitrator ans Rs. 3,05,000/- (Rs. Three lakhs Five thousand only) with each co arbitrator, towards reading fee, hearing/seating fee and administrative charges for the current sitting and next three sittings after deducting TDS along with administrative charges (without deducting TDS) on or before 4 th April 2012.

त्यानंतर Presiding Arbitrator Justice, Ferdino I. Rebello यांनी Procedural Order 04 (ii) अन्वये उपरोक्त फीमध्ये खालील प्रमाणे शुल्क कमी करण्यात आल्याचे कळविले आहे.

The Application by the claimants for reduction of fees is considered. Respondent has raised the issue of non deposit of fee by the claimants. Considering the discussion in the tribunal and the application by the claimants, that objection is rejected. The fees are revised to 60,000/- per sitting to be shared equally by the parties.

**(अ)** आतापर्यंत Tribunal च्या एकुण २५ सिटींग झालेल्या असून त्यांना खालील प्रमाणेचे शुल्क अदा करण्यात आलेले आहे.

| **अ. नं.** | **नांव** | **कामाचा तपशिल** | **आदा करणेत आलेले शुल्क रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | Justice Mr. F.I. Rebello, (Presiding Arbitrator) | रिडींग शुल्क, सुनावणी शुल्क, प्रशासन शुल्क इ. प्रित्यर्थ | १,०७,५००/- |
| | | दि.०१/०३/२०१२, ०३/०५/२०१२, ०८/०६/२०१२, १८/०६/२०१२, ०३/०७/२०१२, १८/०७/२०१२, २०/०७/२०१२, २१/०८/२०१२, २५/०८/२०१२, २२/१०/२०१२, २३/१०/२०१२, ०८/०१/२०१३, ०९/०१/२०१३, १०/०१/२०१३, २२/०३/२०१३, १७/०७/२०१३, १८/०७/२०१३, ०७/०८/२०१३, ०८/०८/२०१३, ०१/१०/२०१३ व दि. ०३/१०/२०१३ रोजीचे बैठकीसाठी रुपये ३०,०००/- प्रती ०३ तासा करीता एकुण २५ मिटींगसाठी अदा केलेले शुल्क | ७,५०,०००/- |
| ०२ | Dr. Krishnabhushan Eknath Mahashabde, Nashik Co- Arbitrator | रिडींग शुल्क, सुनावणी शुल्क, प्रशासन शुल्क इ. प्रित्यर्थ | १,०५,०००/- |
| | | सदरहू प्रकरणांचे बैठकीसाठी रुपये ३०,०००/- प्रती ०३ तासा करीता एकुण २५ मिटींगसाठी अदा केलेले शुल्क | ७,५०,०००/- |
| ०३ | Shri. N. A. Badheka, Mumbai (Co-Arbitrator) | | १,०५,०००/- |
| | | | ७,५०,०००/- |
| | | एकुण रुपये.. | २५,६७,५००/- |

**(ब)** तसेच संस्थानचे वतीने लवादाचे काम पहात असलेले ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांनी मागणी केलेल्या फी बाबत सल्लागार, श्री. बी. एस. पाटील, पुणे यांचेकडून अभिप्राय मागविणेत आला असता, त्यांनी दि. ०३ एप्रिल, २०१२ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे सदरहू फी योग्य असलेबाबतचा अभिप्राय दिला होता. त्यानुसार त्यांना आजपावेतो खालील प्रमाणेची फी अदा करणेत आली आहे.

| अ. नं. | कामाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात सुनावणीसाठी दि.१०.०३.२०११, ११.०३.२०११, १८.०३.२०११ आणि ३१.०३.२०११ रोजी उपस्थीत राहून संस्थानची बाजू मांडली. | १,५०,०००/- |
| ०२ | Written statement and counter claim. | १,००,०००/- |
| ०३ | Attending each Arbitration meeting @ of Rs. 90000/- for each seating = 4 seating | ३,६०,०००/- |
| ०४ | Payment for appearance in Arbitration Petition No. 58 of 2011 | ६०,०००/- |
| ०५ | सदरहू प्रकरणांचे मिटींगसाठी हॉलचे भाडे, स्टेनो, इतर खर्चापेटी अदा केलेली रक्कम | १,२३,४५०/- |
| ०६ | सल्लागार यांनी सादर केलेले रुपये ८,१०,०००/- मात्रचे बिलांपोटी अदा केलेली रक्कम | ६,००,०००/- |
| | एकुण रुपये- | १३,३३,४५०/- |

**<u>मागणी</u>:** यानंतर दिलेल्या सेवेसाठी ॲड. सचिन शानबाग, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक दिनांक ०५ मार्च, २०१३ रोजीचे पत्राने केलेल्या कामापोटी खालील प्रमाणेचे शुल्क मिळणेबाबत विनंती केली आहे.

| Bill No. | Description | Amount |
|---|---|---|
| 1. | Holding various Conferences with you and Mr.Dinkar Desai- Sectional Engineer & Mr.Gavane –Engineer of Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi) including reading charges of various files pertaining to the matter. (from the date of inception till date) (@ of Rs.5000/- per meetings)<br>**<u>Note:-</u>** All the abovementioned meetings held on following dates:- 01/03/2012, 18/06/2012, 26/07/2012, 21/08/2012, 22/10/2012 and 23/10/2012, 08/01/2013, 09/01/2013 and 10/01/2013 many other days before attending arbitration tribunal and also after arbitration meetings and during drafting written statements and counter claim and also during application filed by the claimants for challenging jurisdiction of the arbitration tribunal under Section 16 of Arbitration and Conciliation Act. (more than 15 meetings) | 50,000.00 |
| 2. | Studying the Claimants Applications dated 21/8/2012 pertaining to the objection to the Jurisdiction of Arbitral Tribunal to entertain the Respondents Counter-Claims & drafting and filing reply of the Respondents dated 24/7/2012 including research on the subject.<br>**<u>Note:-</u>** The said application filed by the Claimant against the Respondent for the purpose of apposing Counter Claim filed by the Respondent on want of jurisdiction for which they have filed separate application which Respondent have apposed the same by filing their necessary reply and also advancing arguments with the support of reported judgments and citations and after hearing both the parties the Learned Arbitrators have rejected Claimants Application and allowed Respondent to file their counter claim for the sum of **<u>Rs. 13500000/-</u>** | 40000.00 |
| 3. | Dictating & Preparing fair of the Written Statement and Counter –Claim both dated 24/05/2012 & Compilation of documents in all 6 Volumes from 14th May to 24rd May @ Rs 40,000/- Per Day .Therefore 10 days | 3,00,000.00 |

| | | |
|---|---|---|
| | **Less :- Advance fees received Rs.1,00,000/-**<br>**Note:-** The written statement and volume of matter initially was very small when Claimant served the first Application upon the Respondent, however the said Claimant thereafter have served almost six volumes containing almost 3000 pages for their claim of **Rs. 2,07,50,441/-** against the Respondent which need to deny very minutely with the support of documents made and executed between the parties and with the complete instruction from Respondents office bearers which took very long time, however we have covered almost each and every point of Claimants raised in their Application and denied the same in detail with the help of Mr.Dinkar Desai- Sectional Engineer & Mr.Gavane –Engineer of Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi). It is pertinent to note that Respondent have filed their counter claim of Rs.1,35,00,000/- against the Claimant with support of document and contract made and executed between Respondent and Claimant. It is pertinent to note that due to the large number of documents and volumes involved in the said application Respondent sought extension of time to file their Written Statement which was granted by the Arbitrational Tribunal which read as under:- | |
| 4. | Preparation, Filing and Service of Affidavit of Evidence in lieu of Examination Chief of Shree Dinkar Manohar Desai of the Respondents dated 15/10/2012 – Total 63 Pages (Days consumed – 6 days @ 40,000/- per day ) including working on holiday (Sunday) i.e. 13/10/2012<br>**Note:-** As directed by the Learned Arbitrators the Respondent have filed their Affidavit of Evidence in lieu of Examination Chief of Shree Dinkar Manohar Desai of the Respondents in support of their counter claim and also in denial of claim made by the Claimant in the their Application. The said Affidavit was prepared on very urgent basis as it consume very long time (daily 12 hours) The said affidavit covers not only denial of application made by the Claimant but also covers Respondents Counter Claim. It is also note that Claimant have filed their written Affidavit of Claim and also filed their written affidavit of evidence as directed by the Arbitration Tribunal. | 240000.00 |
| 5. | Attending the Arbitration hearings on 01/03/2012, 18/06/2012, 26/07/2012, 21/08/2012, 22/10/2012, 23/10/2012, 08/01/2013, 09/01/2013 and 10/01/2013 @ 60,000/- Per Hearing. (total 9 days) Less Rs. 3,60,000/-<br>**Note:-** In the said matter as directed by the Arbitrational Tribunal Respondent has deposited their tribunal fees in time, however the Claimant thereafter have filed application for reduction of fees which was considered by the Arbitral Tribunal order passed to that effect as follows:- | 180000.00 |
| | **Total Payable Amount Rs.** | **8,10,000.00** |

उपरोक्त प्रमाणे ॲड. सचिन शानबाग, मुंबई व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांनी कायदेविषयक सेवा दिलेली आहे. तसेच सदरहू प्रकरणी पुढेही त्यांचे सेवेची आवश्यकता आहे.

विषयांकीत कामासाठी ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांनी मागणी केलेली फी कमी करावी असे वाटते. तसेच त्यांचे सेवेची यापुढेही आवश्यकता असल्याने, त्यांचे सेवेचे दर निश्चित होणेबाबत त्यांचेशी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा करुन निर्णय घेता येईल असा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे १८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक ८१० खालील प्रमाणे झालेला आहे.

"..मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांचे लवादाबाबत संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲड.

सचिन शानबाग आजचे सभेसमोर उपस्थित होते, त्यांचे बरोबर समितीने सदर लवादाबाबत चर्चा केली व त्यांच्या सेवेचे दर कमी करणेबाबत विनंती केली असता, ॲड. सचिन शानबाग यांनी सेवेचा दर कमी करणेबाबत त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड.अमृत वेरनेकर, मुंबई यांचेशी चर्चा करुन संस्थानला तसे कळविणेत येईल, असे सांगितले."

वरील प्रमाणे झालेले निर्णयानुसार ॲड. सचिन शानबाग, मुंबई यांना इकडील जा. नं. ३८५५/ २०१३ दि. २८/११/२०१३ रोजीचे पत्रान्वये फी कमी करणेबाबत कळविणेत आले आहे. त्यानुसार त्यांनी दि.०८/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त मागणी केलेले बिलांमधील फक्त अ. नं. ०५ चे कामासाठी (Arbitration hearings) रुपये ६०,०००/- ऐवजी रुपये ५०,०००/- मात्र मागणी केली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मतः** विषयांकीत कामासाठी ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांचे सल्ल्याची आवश्यकता असल्याने, ॲड. सचिन शानबाग, मुंबई यांचे सुधारीत मागणीनुसार फी अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३०० यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई व त्यांचे वकील तसेच संस्थानतर्फे काम पहाणारे ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर यांना एकत्रित योग्यवेळी सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२ संस्थानचे मौजे निमगाव-कोऱ्हाळे गट नं.१९५ पै.मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लॉंज दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

२१ (१) विश्वस्तव्यवस्थेच्या निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.

(क) अन्वये *"मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे. "*

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी संस्थानचे मौजे निमगांव- कोऱ्हाळे येथील गट नं. १९५ पै. मधे हेलीपॅड तयार करणेत आला आहे. मा. कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू हेलीपॅडचे वेटींग लॉंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस सूचना दिल्या आहेत.

**प्रस्ताव:-** त्यानुसार संस्थानचे हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लॉंज मधील खालील कामे करता येतील.

०१. वेटींग लॉंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे
०२. वेटींग लॉंज करीता ॲल्यु. स्लायडींग खिडक्या बसवणे
०३. अंतर्गत भिंतींना लस्टर पेंट करणे
०४. दरवाज्यांना आतिल व बाहेरील बाजुने लॅमीनेट लावणे
०५. जिप्सम बोर्ड फॉल्स सिलींग करणे.
०६. फ्लोरींग वर PVC मॅटीन टाकणे
०७. खिडक्यांना व्हिनीशिएन ब्लाईंडस् लावणे
०८. थ्रि सिटर सोफे खरेदी करणे
०९. ॲण्टी चेंबर बनविणे कामी एझेक्युटीव टेबल व खुर्ची खरेदी करणे.

उपरोक्त कामे करणेसाठी जिल्हा दुरसुची २०१३-२०१४ चे अंदाजपत्रकानुसार रु.१५,३५,८७०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त खर्च हा रक्कम रु.१० लक्ष मात्र पेक्षा जास्त असल्याने याकामी मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेला प्रस्ताव सादर करावा लागेल.

तरी संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लॉंज मधील दुरुस्तीची कामे करणेसाठी येणारे रु.१५,३५,८७०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३०१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लॉंज मधील दुरुस्तीची काम करणेसाठी येणाऱ्या अंदाजे रु.१५,३५,८७०/- मात्रचे खर्चास, संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच, मा.खंडपीठाच्या आदेशास अधीन राहुन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३** **बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन" करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतदू आहे.

**प्रस्तावना:-** बांधकाम विभागामार्फत संस्थान परिसरातील इमारतींची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती केली जाते. या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी आवश्यक असणारे सिमेंट सध्या बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी केले जाते.

सन २०१३-१४ मध्ये, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार ४३ ग्रेड सिमेंट अल्ट्राटेक, ए.सी.सी, राजश्री बिर्ला, बिर्ला अे-१, बिर्ला गोल्ड व अंबुजा या कंपन्याचे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून सिमेंट गोण्या बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेत आल्या, तसेच देणगी दाखल मिळालेल्या ३५० गोण्या मिळून एकूण १४७१ गोण्या वापरण्यात आल्या याकामी रक्कम रु.३,६९,२०८/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदर सिमेंट देखभाल दुरस्तीसह, विभागांतर्गत करणेत येणाऱ्या कामांसाठी वापरणेत आलेले आहे.

**प्रस्ताव:-** आता, सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी, मागील वर्षाप्रमाणे अंदाजे १७०० गोणी सिमेंट विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून आवश्यकतेनुसार टप्प्याटप्पयाने खरेदी करणेस व अंदाजे रुपये ३००/- प्रती गोणी या दराने रक्कम रुपये ५,१०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :** तरी बांधकाम विभागामार्फत करणेत येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी व विभागांतर्गत कामांसाठी, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे १७०० गोण्या सिमेंट वर नमूद केलेल्या कंपन्यांकडून थेट अथवा त्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजित रक्कम रु.५,१०,०००/- मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४ सप्टेंबर, २०१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०३ मध्ये (श्रीमती फातमाबी बक्षू शेख व कै.श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांना त्यांचे भूसंपादीत होणाऱ्या क्षेत्राचे बदल्यात दुकानगाळे बांधून देणेबाबतचा निर्णय) झालेला आहे. त्याबाबत फेर विचार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **विषयाची पूर्वपीठीका :**

**(अ-१)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, विद्युत कार्यालयाचे विस्तारीकरण, प्रसादालयाचा एखादा भाग (उदा. लाडू प्रसाद तयार करणेचा विभाग, नाष्टा तयार करणेचा विभाग) यासाठी इमारत बांधणे किंवा साईभक्तांच्या सोयी-सुविधेच्या दृष्टीने बांधकाम करणे या प्रयोजनासाठी भूसंपादीत करणेत यावयाच्या जमिनीची माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र | खातेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३/२ | ९०९ पैकी | १५० चौमी | श्रीमती फातमाबी बक्षू शेख |
| ०२ | ३/३ | ९०९ पैकी | ०५० चौमी | श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार |

सदरची जागा नवीन पिंपळवाडी रस्त्यालगत, संस्थानचे स्वच्छतागृहाचे लगत पुर्वेस आहे. सदर जागेच्या दक्षिणेस संस्थानची मोकळी जागा सर्व्हे नंबर ३ व ती संस्थान जमिनीच्या लगत आहे. अर्जदार श्रीमती शेख व श्रीमती शेलार या जागेतील संस्थानच्या स्वच्छतागृहाकडे जाणेसाठी असलेल्या रस्त्याचा वापर त्यांचे मालकीचे जमिनीकडे जाणेसाठी करतात. त्यांचे जागेकडे जाणेसाठी स्वतंत्र सार्वजनिक रस्ता नाही. अर्जदार हे उपरोक्त जागी राहून हार,फुले, प्रसाद विक्रीचा व्यवसाय करतात.

**(अ-२)** मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, उपरोक्त खातेदाराच्या जमिनी भूसंपादनाने घेणेबाबत इकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी / बांधकाम / भूसंपादन / ५६७५ / २००६, दिनांक ०१ मे, २००६ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पाठविणेत आलेला होता. त्यांनी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे. भूसंपादन अधिकारी यांनी भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार भूसंपादन प्रस्तावाची कार्यवाही अंतिम केलेली असून, त्यांनी क्रमांक एलएक्यु/एसआर/ ४३/२००६-कावि/भूसं-२/४०/२००९ दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी उपरोक्त जमिनीचा भूंसपादनाचा अंतिम निवाडा जाहिर केला आहे.

**(अ-३)** भूसंपादनातील खातेदारांनी जमीन भूसंपादनाने घेता येत नाही असा व इतर मुद्दे मांडून मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांचे न्यायालयात रे.मु. नं. ५१/२००८ दाखल केला होता. ताबा घेण्याची प्रक्रिया चालू असतांना मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २००९ रोजी जैसे थे स्थिती ठेवणेबाबत आदेश दिला. त्यामुळे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादित होणाऱ्या जमिनीचा ताबा घेता आला नाही व संस्थानला ताबा देता आला नाही.

**(अ-४)** मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडेस या भूसंपादनापोटी एकूण रक्कम रुपये १२,९३,४९३/- मात्र दिनांक ०६ ऑक्टोबर, २००६ रोजी जमा करण्यात आलेले आहेत. अर्जदाराने न्यायालयात दावा केला असल्याने, सदर रक्कमेवर व्याजही मिळत नाही व भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने रक्कम ही परत मिळत नाही.

**(अ-५)** भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी जाहिर केलेल्या भूसंपादनाचे निवाडयानुसार, अर्जदार यांना खालीलप्रमाणे नुकसान भरपाई / मोबदला रक्कम प्राप्त होणार आहे :

| **अ.नं.** | **सर्व्हे नंबर** | **सिटी सर्व्हे नंबर** | **संपादीत होणारे क्षेत्र** | **खातेदाराचे नांव** | **मिळणारी नुकसान भरपाई / मोबदला रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३/२ | ९०९ पैकी | १५० चौमी | श्रीमती फातमाबी बक्षू शेख | **०५,३८,२०२/-** |
| ०२ | ३/३ | ९०९ पैकी | ०५० चौमी | श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार | **०१,८९,८७०/-** |

**(अ-६)** विषयांकित भूसंपादनाने बाधित होणाऱ्या खातेदारांनी मा. दिवाणी न्यायालधीश, कोपरगांव न्यायालयात दावा क्रमांक ५१/२००८ हा दाखल केलेला होता. उपरोक्त दाव्याचे कामकाज सुरु असतांना अर्जदार यांनी दिलेल्या तडजोडीच्या अर्जावर, संस्थान वकील ॲड. एस. डी. कुलकर्णी यांचा अभिप्राय घेऊन, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ मार्च, २०१० रोजीचे सभेत विचारार्थ सादर करणेत आला होता, त्यावर निर्णय क्रमांक २८९ असा घेणेत आला की,

.. .. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ॲड. एस. डी. कुलकर्णी यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २००९ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार, सदरहू प्रकरणी वादी श्रीमती फातिमा बक्षू शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांनी दाखल केलेला रेग्युलर मुकदमा नंबर ५१/२००८ हा दावा समेटासाठी ( तडजोडीसाठी ) लोकन्यायालयात सादर करणे उचित होणार नाही. त्यामुळे संस्थान वकीलांना सदरहू दाव्यात प्रतिवादी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे युक्तीवाद पूर्ण करुन दाव्याची कार्यवाही पूर्ण करणेस मान्यता देण्यात आली.

**(अ-७)** मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी उपरोक्त खातेदारांनी त्यांचे न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचा निकाल दिनांक १८ फेब्रुवारी, २०११ रोजी निकाल दिलेला असून, त्यामध्ये वादीचा अर्ज रद्द करणेत येत आहे, असे नमुद केलेले आहे. सदर निकालानुसार, मा. भूसंपादन अधिकारी यांना भूसंपादन निवाडयास अनुसरुन लवकरात लवकर ताबा द्यावा म्हणून विनंती पत्र देणेत आलेले होते. तथापि, त्यानंतर अर्जदार (भूसंपादनाने बाधित होणाऱ्या खातेदारांनी) यांनी मा. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, कोपरगांव यांचे न्यायालयात माहे जून, २०११ मध्ये अपिल क्रमांक १२/२०११ ने दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यात मा. न्यायालयाने, जैसे थे स्थिती ठेवणेबाबत अंतरिम आदेश दिलेला आहे.

**सद्य:स्थिती :**

**(ब-१)** दरम्यानचे कालावधीत, म्हणजेच माहे जुलै, २०११ मध्ये तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री. शंकररावजी कोल्हे, यांचेकडेस श्रीमती फातमाबी बक्षू शेख व कै. श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांचेतर्फे अशोक शेलार यांनी आजच्या सभेत ठरल्याप्रमाणे या विषयांस अनुसरुन खालीलप्रमाणे मजकुर असलेला अर्ज दिला होता :

.. .. आम्ही ठकुबाई शेलार व फातमाबी शेख रा. शिर्डी सर्वे ३/२ व ३/३ येथे सिटी सर्व्हे नं. ९०९ रहिवासी असुन तेथे आमचे व्यवसाय चालतो व ती जागा साईबाबा संस्थान यांस द्यावयास तयार आहे. त्याबदल्यात आम्हां दोघांना त्याच ठिकाणी १० बाय १० या आकाराचे दोन गाळे पुढील बाजूस द्यावे. हिच आमची साईचरणी प्रार्थना. आपल्या सहकार्याच्या अपेक्षेने.

सदर विनंती अर्जास अनुसरुन, मा. उपाध्यक्षसो. यांनी दिनांक ३१ जुलै, २०११ रोजीचे पत्राने, .. .. तरी आपण त्यांचा अर्ज पुढील योग्य निर्णयासाठी दिनांक ०३ ऑगष्ट, २०११ रोजीचे मिटींगपुढे ठेऊन, त्यास नियमानुसार मंजूरी घेऊन, त्वरीत अनुकूल कार्यवाही राबवावी,छ असे कळविलेले होते. .

तसेच मा. उपाध्यक्षसो. यांचे पत्राचे छायांकित प्रतीवर, मा.अध्यक्षसो. यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून, .. .. सभेपुढे ठेवावे अशी सुचना दिली होती.

**(ब-२)** भूसंपादनाने बाधित होणाऱ्या श्रीमती शेख व कै. श्रीमती शेलार यांचा उपरोक्त अर्ज मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजीचे सभेत विचारार्थ करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक ७०३ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे :

.. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती फातमाबी बक्षू शेख व कै.श्रीमती ठकूबाई एकनाथ शेलार यांचेतर्फे अशोक शेलार यांना त्यांचे मौजे शिर्डी येथील स.न.३/२ व ३/३ मध्ये भूसंपादीत होणाऱ्या जागेच्या बदल्यात मानवतेच्या दृष्टीकोनातून दोन दूकानगाळे योग्य त्या ठिकाणी देणेस मान्यता देण्यात आली. याबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांचेशी चर्चा करावी व दुकानगाळे व जागा हस्तांतरीत करणेसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

सदरचे निर्णयात प्रामुख्याने खालील बाबी नमूद केलेल्या आहेत :

१. भूसंपादीत होणाऱ्या जागेच्या बदल्यात मानवतेच्या दृष्टीकोनातून दोन दुकानगाळे योग्य त्या ठिकाणी देणेस मान्यता देणेत आलेली आहे.

२. याबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेशी चर्चा करावी.

३. दुकानगाळे व जागा हस्तांतरीत करणेसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करणेत यावी.

**(ब-३)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयास अनुसरुन, इकडील विभागामार्फत दिनांक १० नोव्हेंबर, २०११ रोजीचे टिपणीत, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजीचे वरील निर्णयात ज्या बाबींचा समावेश नाही म्हणून त्याचा ऊहापोह करणेत येऊन, त्यावर कार्यालयीन टिपणी सादर करणेत आली होती, त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजीचे निर्णयात समाविष्ट नसलेल्या बाबी :

१. अर्जदार श्रीमती फातमाबी बक्षू शेख यांचे जनरल मुख्यत्यार श्री. सलीम बक्षू शेख व कै. श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांचे जनरल मुख्यत्यार श्री. अशोक एकनाथ शेलार यांची अनुक्रमे सर्व्हे नंबर ३/२ व ३/३ मधील १५० चौमी व ५० चौमी अशा जागा भूसंपादीत होत असतांना, निर्णयात त्यांना दोन दुकानगाळे योग्य ठिकाणी बांधून देणेबाबतचा निर्णय झालेला आहे. त्या दुकानगाळयांचे क्षेत्र किती असावे, याचा उल्लेख नाही.

अर्जदार यांनी त्यांचे प्रस्तावात १० फुट x १० फुट या आकाराचे दोन दुकानगाळे बांधून मिळावेत म्हणून विनंती केलेली आहे. वास्तविक पहातां, अर्जदारांचे भूसंपादीत होणारे क्षेत्रात बरापैकी तफावत आहे, त्यामुळे अर्जदार यांना सारख्याच क्षेत्राचे दुकानगाळे बांधून देण्यात यावेत किंवा कसे याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

२. भूसंपादन निवाडयाप्रमाणे अर्जदार श्रीमती शेख व श्रीमती शेलार यांना अनुक्रमे रुपये ०५,३८,२०२/- मात्र व रुपये १,८९,८७०/- मात्र नुकसान भरपाई मिळणार आहे. सदरची नुकसान भरपाई ते संस्थानकडे जमा करणार किंवा कसे याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करावयाची ठरल्यास सदरची नुकसान भरपाईची रक्कम अर्जदार यांनी संस्थानला अधिकारपत्र दिलेतरी संस्थानचे नांवाने भूसंपादनाचा धनादेश मिळणार नाही किंवा संस्थानकडे जमा होणार नाही

३. वर नमुद केलेली नुकसानभरपाईची रक्कम अर्जदार यांनी संस्थानकडे जमा करावयाची ठरली तरी, विषयांकित जमिनीची भूसंपादन कार्यवाही रितसर पुर्ण होऊन अंतिम निवाडा जाहिर झालेला आहे, फक्त जागेचा ताबा घेणे बाकी आहे. त्यामुळे भूसंपादन कार्यवाहीपोटी संस्थानला आस्थापना खर्च रक्कम रुपये २१,८४२/- मात्र मा. शासनाकडे भरावे लागणार आहेत. सदरचा खर्च संस्थानने सोसावा किंवा अर्जदार यांचेकडून वसूल करणेत यावा, याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

४. अर्जदार यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांचे न्यायालयात जमीन भूसंपादनाने घेता येत नाही या व इतर मुद्दयांवर दावा दाखल केला होता. मा. न्यायालयाने सदरचा दावा दिनांक १८ फेब्रुवारी, २०११ रोजी फेटाळलेला आहे. त्यावर अर्जदार यांनी पुनःश्च मा. जिल्हा न्यायाधीश, कोपरगांव यांचे न्यायालयात अपील क्र. १२/२०११ दाखल केलेला असून, सदर दाव्यात मा. न्यायालयाने जैसे थे स्थिती ठेवणेबाबत अंतरिम आदेश दिलेला आहे.

अर्जदार हे सदरचा अपिल / दावा मागे घेणार किंवा कसे याबाबत वरील निर्णयात काही नमुद केलेले नाही, त्यामुळे याबाबत ही निर्णय होणे आवश्यक आहे.

५. तसेच, या निर्णयामध्ये, .. .. याबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेशी चर्चा करावी, असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन, मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडून भूसंपादन अधिकारी या नात्याने काही बाबीवर अभिप्राय मागविणेबाबत दिनांक १६ नोव्हेंबर, २०११, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ व दिनांक ११ जुलै, २०१२ रोजी पत्र देणेत आले होते.

**आता :**

**(क-१)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजीचे निर्णयानुसार (ब-२ नुसार) मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांचेकडून ज्या

बाबींवर / मुद्यांवर अभिप्राय मागविणेत आलेला होता, त्यावर दिनांक १३ जुलै, २०१२ रोजीचे पत्राने अभिप्राय दिलेला असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ. नं. | मुद्दा / बाब | मा. उविअ, श्रीरामपूर यांनी दिलेला अभिप्राय | कार्यालयीन टिपणी |
|---|---|---|---|
| ०१ | मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करावयाची ठरविल्यास, विषयांकित जमिनीचे भूसंपादन करणेसाठी आपणांमार्फत जाहिर करणेत आलेला अंतिम निवाडा आपोआप संपुष्टात येईल किंवा कसे ? | भूसंपादन कलम ११ अन्वये जाहिर केलेला निवाडा हा अंतिम असतो. त्यात कोणत्याही प्रकारचे बदल करणेचे अधिकार भूसंपादन अधिकाऱ्यास नसतात. निवाडा घोषित केल्यानंतर संबंधीत जमीन मालकांना योग्य ती नुकसान भरपाईची रक्कम आदा केली जाते. प्रस्तुत प्रकरणांत दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी अंतिम निवाडा घोषित करणेत आलेला आहे. | भूसंपादन निवाडयाप्रमाणे जमीन मालकांना निवाडयात घोषित केलेली नुकसानभरपाईची रक्कम आदा केली जाईल. भूसंपादन अधिकारी हे जमीनमालकांकडून प्रथम जमिनीचा ताबा घेऊन, त्यानंतर संस्थानला भूसंपादीत जमिनीचा ताबा देतील. |
| ०२ | विषयांकित अर्जदार यांना त्यांच्या भूसंपादीत होणाऱ्या जागेच्या बदल्यात दुकानगाळे बांधून देणे ही बाब आपणांमार्फत जाहिर करणेत आलेल्या निवाडयास बाधा आणते किंवा कसे ? | जमीनमालक यांना जागेच्या बदल्यात दुकान गाळे बांधून देणेचा प्रश्न आपआपले दोघांचे समजूतीचा आहे. | भूसंपादन अधिकारी भूसंपादनाने बाधित होणाऱ्या जमीनमालकांना दुकान गाळे बांधून देणेबाबत कुठला ही स्पष्ट निर्देश देत नाहीत. संस्थान व संबंधीत खातेदार यांच्या मधील ही बाब आहे. |
| ०३ | मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाची अंमलबजावणी करण्यापुर्वी, आपणां--मार्फत सुरु असणारी भूसंपादनाची उर्वरित कार्यवाही पूर्ण करणे (जागेचा ताबा घेणे, भूसंपादनाने बाधित होणाऱ्या जमीनमालकांना नुकसान भरपाई देणे आदि) आवश्यक राहिल किंवा कसे ? | यावर आपले स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. | भूसंपादन अधिकारी यांनी याबाबत अभिप्राय दिलेला नाही. अर्जदारांना गाळे बंधून देणे व निवाडयाची कार्यवाही पूर्ण करणे या दोन्ही बाबी पूर्णपणे भिन्न आहेत, असेच या अभिप्रायातून सुचित होते. |
| ०४ | मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करणेपूर्वी, विषयांकित अर्जदार यांनी न्यायालयातील सर्व दावे मागे घेऊन, मा. न्यायालयाचा जैसे थे ठेवण्याचा आदेश उठविणे आवश्यक राहील हे संस्थान प्रशासनाचे मत उचित आहे किंवा कसे ? | जमीनमालकाने प्रथम न्यायालयातील सर्व दावे मागे घेऊन स्थगिती आदेश उठवून संपादीत क्षेत्राचा ताबा शासनास देणे उचित राहील. | याबाबत सविस्तर विवेचन खाली (क-२) मध्ये केले आहे. |
| ०५ | विषयांकित अर्जदार यांना दुकानगाळे बांधून द्यावयाचे ठरले असल्यामुळे, विषयांकित जमिनीच्या भूसंपादनापोटी संस्थानने आपणांकडे भरलेली २/३ रक्कम कोणतीही कपात न होतां परत मिळेल किंवा कसे. | संपादनापोटी आपण शासनाकडे भरलेली रक्कम ही जमीन मालकांना नुकसान भरपाई म्हणून आदा केली जाईल तसेच त्यावर ३ टकके आस्थापना खर्चाची रक्कम ही सरकार जमा करणेत येईल. | याचा अर्थ , भूसंपादनाचा निवाडा जाहिर झालेला आहे. जरी जमीनमालकाला गाळे बांधून देण्याचे ठरविले तरी संस्थानने भूसंपादनापोटी भरलेली रक्कम परत मिळणार नाही. |

**(क-२)** उपरोक्त मुद्दा / बाब क्रमांक ०३ चे अभिप्रायाबाबत विवेचन असे की, जमीनमालकाने दावे मागे घेतल्यावर व स्थगिती आदेश उठविल्यानंतर, जमिनीचा ताबा संस्थानला मिळेल परंतु तो प्रतिकात्मक स्वरुपाचा अनौपचारिक असा असेल, कारण तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, सदर जमीनमालकांना दुकान गाळे बांधून दिल्याशिवाय ते जागा खाली करणार नाहीत आणि अशाप्रकारे दुकानगाळे बांधून द्यावयाचे ठरल्यास त्याकामी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक राहील :

१. प्रत्येकी किती क्षेत्राचा गाळा पाहिजे याबाबत अर्जदाराचे म्हणणे घेणे आवश्यक राहील, कारण प्रत्येकाचे भूसंपादीत होणारे क्षेत्र कमी/जास्त आहे, त्यामुळे प्रत्येकास सारखा गाळा देणे न्यायाच्या दृष्टीने उचित होणार नाही.

२. अर्जदारांना पर्यायी दुकान गाळे कोठे बांधून पाहिजे आहे, याबाबत त्यांचेकडून लेखी निवेदन प्राप्त करुन घ्यावे लागेल. अर्जदारांनी आहे त्याच ठिकाणी दुकानगाळे बांधून मागितले तर, भूंसपादनाचा मुळ हेतूच संपुष्टात आल्यासारखे होईल. तसेच तेथे दुकानगाळे बांधून दिल्यास, त्यांना संस्थान मालकीच्या

जमिनीतून रस्ता द्यावा लागेल व त्याठिकाणी सार्वजनिक वहिवाट सुरु होईल. वास्तविक पहातां, संस्थानने त्यालगत असलेले आपले क्षेत्र सलग होईल यादृष्टीने तसेच त्याठिकाणी भूसंपादनाचे प्रयोजनात नमुद केलेप्रमाणे विद्युत विभागाचे कार्यालय अथवा लाडू प्रसाद बनविणे अथवा इतर भक्तोपयोगी बांधकामासाठी भूसंपादीत करण्याचे ठरविले आहे. तसेच साईप्रसाद निवासस्थान परिसरासह मंदिर परिसराचे पुर्नःनियोजन करण्याचे संस्थान व्यवस्थापनाचे विचाराधीन आहे, त्यास वेळेस अशा प्रकारे दुकानगाळे संस्थान परिसरात उभारुन देणे उचित ठरणार नाही.

३. जमीनमालक त्यांना मिळणारी भूसंपादनाची रक्कम संस्थानला देणार किंवा कसे याबाबत त्यांचेकडेस विचारणा करावी लागेल. कारण दुकानगाळयांचे बांधकाम करणेसाठी संस्थानला बांधकाम खर्च येणार आहे व तो वसुल करणे उचित ठरेल.

४. अर्जदार यांचा त्यांचे भूसंपादीत होणारे जागेच्या मोबदल्यात दुकानगाळे बांधून मिळावेत असा सर्वसाधारण हेतू आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतुदीनुसार, सदर दुकानगाळे व जागा हस्तांतरीत करणेसाठी मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागेल व त्यासाठी किती अवधी लागेल हे सांगता येणार नाही.

५. श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांना संस्थानने पाठविलेले पत्र, मयत असा पोष्टाचा शेरा मारुन परत आलेले आहे. त्यामुळे त्यांनी श्री. अशोक एकनाथ शेलार यांना करुन दिलेले मुखत्यारपत्र आपोआप संपुष्टात आलेले आहे. अशा परिस्थितीत अशोक शेलार यांनी केलेला अर्ज अवैध होत आहे.

६. अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे गाळे बांधून देण्याचा निर्णय झाला तर, येथूनपुढील भूसंपादनाच्या प्रकरणांमध्ये अशा प्रकारची मागणी भूसंपादनाने बाधित होणारे खातेदार करण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतर भूसंपादन प्रस्तावाच्या कार्यवाहीमध्येही ही बाब अडथळा निर्माण करु शकते.

**(क-३)** तसेच, शिर्डी विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक ३४ : दवाखाना विस्तारीकण आणि आरक्षण क्रमांक ३९ : संस्थानचे विविध उपक्रमांसाठी संस्थान करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणातील क्षेत्र भूसंपादीत करुन मिळणेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत भूसंपादन अधिकारी म्हणून मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर हे कार्यवाही करीत आहेत.

सदर आरक्षणातील भूसंपादनाने बाधित होणाऱ्या खातेदारांनी भूसंपादीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात पर्यायी घरे बांधून मिळावीत म्हणून संस्थानकडे विनंती केली होती. त्यानुसार तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने दिनांक २४ मे, २००८ रोजीचे सभेत निर्णयही घेतलेला होता. या मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस पर्यायी घरे बांधून देणेबाबतचा प्रस्ताव तत्वतः मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. दरम्यानचे कालावधीत, आरक्षण क्रमांक ३४ व ३९ मधील खातेदारांनीही संस्थानमार्फत पर्यायी घरे बांधून मिळणेबाबत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दावा (अपील क्रमांक ६११/२०१२) दाखल केलेला होता.

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनाने त्यांचेकडील दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजीचे पत्राव्दारे, वर नमुद केलेल्या आरक्षण क्रमांक ३४ व ३९ मधील भूसंपादनाने बाधित होणाऱ्या अधिकृत व अनाधिकृत घरमालकांना पर्यायी घरे बांधून देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या धोरणांशी सुसंगत नसल्याने, सदर प्रस्तावास मान्यता देता येत नाही, असे कळविलेले होते.

मा. शासनाचे उपरोक्त दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजीचे पत्र मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेसमोर उपरोक्त अपीलाच्या सुनावणीचे वेळेस, दिनांक २४ सप्टेंबर, २०१२ रोजी संस्थान वकील व मा. सहाय्यक सरकारी वकील यांचेमार्फत सादर करणेत आले होते. तद्नंतर, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी सदरचे अपील क्रमांक ६११/२०१२ फेटाळलेले आहे.

थोडक्यात, भूसंपादनाने बाधित होणाऱ्या व्यक्तींचे पुर्नःवसन करणे हे शासनच्या प्रचलित धोरणांशी सुसंगत नाही, असे दिसून येते.

**(क-४)** वास्तविक पहातां, मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांचे न्यायालयात दाखल केलेल्या रे. मु. नं. ५१/२००८ चा निकाल जमीनमालकांच्या विरोधात गेल्याने, त्यांनी मा. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, कोपरगांव यांचे न्यायालयात अपील क्रमांक १२/२०११ दाखल केलेला असून, त्यात जैसे थे ठेवणेबाबत अंतरिम आदेश झालेला आहे.

या अपील क्रमांक १२/२०११ मध्ये प्रामुख्याने मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कोपरगांव यांनी दाव्याच्या संदर्भात दाखल केलेल्या कागदपत्रांचा चुकीचा अर्थ घेऊन निकाल दिलेला आहे, कनिष्ठ न्यायालयाने भूसंपादन कायदा व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम यांचे चुकीचे संदर्भ व अर्थ घेऊन निकाल दिलेला आहे, भूसंपादीत होणारी जागा सार्वजनिक कारणासाठी लागत आहे हे चुकीचे गृहीत धरुन निकाल दिलेला आहे, असे मुद्दे समाविष्ट करणेत आलेले आहेत.

**(क-५)** उपरोक्त सर्व विवेचनास अनुसरुन, दाव्याचे कामकाजाचे दिवशी प्रतिवादींनी (अर्जदारांनी) तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजीचे निर्णयाची प्रत मा.

न्यायालयाकडे सादर केली तर, अर्जदारांनी केलेली पर्यायी दुकानगाळयांची मागणी संस्थानने मान्य केली आहे असे गृहीत धरुन अपीलाचा निकाल होण्याची शक्यता आहे किंवा सदरचा निर्णय अपीलाच्या निकालात समाविष्ट करुन, अपिलाचा निकाल झाला तर तो संस्थानवर बंधनकारक राहील.

**(ड)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजीच्या निर्णयातील त्रुटी, त्याची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणी तसेच त्या निर्णयानुसार करावयाच्या कार्यवाहीसाठी लागणारा अवधी आदि बाबींचा ऊहापोह परिच्छेद ब व क मध्ये करणेत आलेला आहे.

वर नमुद केलेल्या बाबींचा विचार करता अर्जदाराचे पुनर्वसन करणे शासनाच्या धोरणाशी सुसंगत नाही व कोणत्याही कायद्याने त्यांचे पुनर्वसन करणे ही जबाबदारी भूसंपादन संस्थेची नाही.

वरील सर्व बाबींचा विचार होऊन तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ७०३-

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती फातमाबी बक्षू शेख व कै.श्रीमती ठकूबाई एकनाथ शेलार यांचेतर्फे अशोक शेलार यांना त्यांचे मौजे शिर्डी येथील स.न.३/२ व ३/३ मध्ये भूसंपादीत होणाऱ्या जागेच्या बदल्यात मानवतेच्या दृष्टीकोनातून दोन दूकानगाळे योग्य त्या ठिकाणी देणेस मान्यता देण्यात आली. याबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर तथा भूसंपादन अधिकारी यांचेशी चर्चा करावी व दुकानगाळे व जागा हस्तांतरीत करणेसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. "

या ठरावाबाबत नव्याने विचार करणे उचित राहील. भूसंपादनाने बाधीत होणाऱ्या व्यक्तीचे पुनर्वसन करणेची जबाबदारी भूसंपादन कायदा १८९४ मध्ये नाही .

तरी सदरचे प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय घेता येईल असे मत आहे.

**निर्णय क्र.३०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, भूसंपादन कायदा १८९४ मध्ये भूसंपादनाने बाधीत होणाऱ्या व्यक्तीचे पुनर्वसन करणेची तरतूद नाही, त्यामुळे उपरोक्त ठराव रद्द करणेत येऊन, भू-संपादनाची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५ साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्याचे दुतर्फास माहितीचे बोर्ड तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:** *अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये " भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे."*

**प्रस्तावना**: श्रीं चे दर्शनासाठी देश विदेशातून दररोज हजारो साईभक्त शिर्डीत येत असतात. सदरचे साईभक्तांना शिर्डी येथे येण्यासाठी नगर-मनमाड या प्रमुख राज्य मार्गाने येत असतात. तसेच शिर्डी पासून अंदाजे ०३ किलो मिटर अंतरावर असलेले साईनगर रेल्वे स्टेशनवरुन येणारे साईभक्तही त्याच मार्गाचा वापर करत असतात. सदरचे राज्य मार्गावर साईभक्तांना श्रीं चे मंदिर, व्दारावती, साईबाबा भक्तनिवासस्थान, साई आश्रम भक्तनिवास, श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा व हॉस्पीटल इत्यादी परिसराची माहिती व्हावी यासाठी सदरचे महामार्गावर विविध ठिकाणी परिसराचे नांव व दिशादर्शक बोर्ड तयार करुन बसवून घेणेबाबत मा. अध्यक्ष सो। यांनी निर्देश दिले आहेत.

**प्रस्ताव:** साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी शिर्डी रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रोडवर संस्थान परिसरांचे नांवाचे दिशादर्शक बोर्ड सोबत दर्शविले मजकुरा प्रमाणे तयार करुन बसवून घेता येईल.

उपरोक्त प्रमाणे बोर्ड तयार बसूवन घेणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजपत्रकानुसार रुपये १,२५,०००/- मात्र खर्च येईल.

**विभागाचा अभिप्राय/ मत:** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी शिर्डी रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रत्याचे बाजूस विविध ठिकाणी संस्थान परिसराचे माहितीचे दिशादर्शक बोर्ड तयार करुन बसवून घेता येईल असे मत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये १,२५,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या मार्गदर्शनासाठी शिर्डी रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्याचे बाजूस विविध ठिकाणी संस्थान सुविधांबाबत माहितीचे दिशादर्शक बोर्ड तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६ साईआश्रम बुकस्टॉल येथे विक्री काऊंटर तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील तरतुद</u>**:- अधिनियमाचे कलम - १७ मधील पोटकलम (२) च्या खंड (ठ) अन्वये, "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील", अशी तरतुद आहे.

**<u>प्रस्तावना</u>**:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम भक्तनिवास या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. दि. ११/०४/२०१३ पासून साई आश्रम भाग- ०१ हा प्रकल्प साई भक्तांसाठी खुला करणेत आलेला आहे. साई आश्रम भाग- ०१ येथील R- BLOCK इमारतीचे तळमजल्याचे दुकानगाळयामध्ये पार्टीशन करुन बुकस्टॉल सुरु करणेत आले आहे.

प्रकाशने विभागाने दि.२९/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये साई आश्रम बुक स्टॉलकरिता विक्री काउंटर तयार करुन मिळणेची विनंती केली आहे. सदर ठिकाणी प्रत्यक्ष मोजमापे घेण्यात आली असून, त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Sales Counter (Size 10'-6"x2'-0"x3'-8") | | | | |
| | Providing, making & fixing sales counter for bookstall as per size mentioned above & drawings, made out of 19 mm thk. Ply and finished with 1mm thk. laminate, BTC on all exposed sides of ply. The exposed surfaces of ply shall be polished with wood fin polish, counter top @ ht. of 3' - 8" should be finished with Black Telephonic Granite with full round moulding on both sides and @ ht. of 2' - 6" top finished with laminate, table consisting of necessary no. of drawers with 5 ball bearing sliding channels & key boards, CPU stand & flap door for movement. Glass of 8 mm thk. For front elevation with itching 3 coats of oil paint / polish for inner surfaces of ply after preparing surface as per instruction, brass handles & multipurpose concealed godrej locks for all drawers, brass hinges for flap door. cable tray, cables, computer switches & electric points etc. complete as per drawing & to entire satisfaction of Sansthan. | 10' - 6" | R.ft. | 4500/- | 47,250/- |
| | | | | Total | 47,250/- |
| | | | | Add Contingenecies@ 5% | 2362/- |
| | | | | Total Amount (RS.) | 49,612 |
| | | | | **Total Amount say R/o.** | **50,000/-** |

**<u>प्रस्ताव</u>**:- सदर कामासाठी उपरोक्त तपशिलाप्रमाणे रु.५०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम स्थानिक तसेच नाशिक, नगर येथील फर्निचर ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागवून करता येईल.

**<u>विभागाचा अभिप्राय/ मत</u>**:- उपरोक्तकामी अंदाजपत्रकात नमुद केलेप्रमाणे रु. ५०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. त्यास मंजुरी मिळणेस विनंती तसेच सदरचे काम स्थानिक तसेच नाशिक व नगर येथील ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागवून करुन घेणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७ संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** "२१. (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम,१९६१ च्या तरतुदीना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल-

**(क)** मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापान व प्रशासन

**(झ)** विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

**प्रस्तावना :-**

संस्थानने नव्याने खरेदी केलेल्या मौजे कोऱ्हाळे येथील गट नं. ९७ पैकी व मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४/११ व १२४/१२ मध्ये संरक्षणाचे दृष्टीने कुंपन करणे आवश्यक आहे. सदरहू क्षेत्राबाबत विस्तृत माहिती खालील तक्त्यात नमूद केली आहे.

| गांव | गट/सर्व्हे नं. | क्षेत्र हे- आर | लांबी | शेरा |
|---|---|---|---|---|
| कोऱ्हाळे | ९७ (पैकी) | १ - ६२ | ५७६.०० मी. | संपूर्ण क्षेत्रास कुंपन करणे |
| शिर्डी | १२४/११ व १२ | १ - २० | ६२७ मी. | |
| शिर्डी | २०७/२ | ० - ८० | ५५०.०० मी. | |

**प्रस्ताव :-** उपरोक्त क्षेत्रास कुंपन करणेकामी खालील चार पर्यायानुसार अंदाजपत्रक तयार केली आहेत.

**पर्याय क्र.०१** काटेरी तारेचे कुंपन करणे :- रु.५,५१,०००/-
**पर्याय क्र.०२** चोर्लीक जाळीचे कुंपन करणे :- रु.१९,७१,०००/-
**पर्याय क्र.०३** आर.सी.सी. प्रिकास्ट कुंपन करणे :- रु.२६,९५,०००/-
**पर्याय क्र.०४** विट बांधकामाचे कंपाउंड करणे :- रु.१,०४,८०,०००/-

उपरोक्त पैकी पर्याय क्रं. १ व २ चे प्रकारे कुंपन केल्यास शेजारील जमीनधारक ते तोडून संस्थानचे क्षेत्रात अतिक्रमण करण्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच पर्याय क्र. ४ चे नुसार कुंपन केल्यास शेजारील जमिनी संपादीत अथवा खरेदी केल्यास कुंपन मध्येच येईल व अशा प्रकारचे कुंपन करणेकामी मोठ्या प्रमाणात खर्च येतो.

**विभागाचा अभिप्राय/ मत:-** वरिलपैकी पर्याय क्र. ३ नुसार आर.सी.सी. प्रिकास्ट कुंपन केल्यास भविष्यात क्षेत्रात वाढ झाल्यास कुंपन काढून घेता येते व ते इतरत्र वापरता येते. अशा प्रकारचे कुंपन करणेसाठी अंदाजे रु.२६,९५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव मान्यता मिळणेस विंती.

**निर्णय क्र.३०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती आर.सी.सी. प्रिकास्ट कुंपन करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास तत्वत : मान्यता देण्यात आली.**

**तत्पुर्वी, उपरोक्तकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१८** **शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील नियोजीत बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथिल सर्व्हे नं. १७१ मधिल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन यांचे मालकीचे जागेत संस्थानचे निधीतून बस स्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम, ठेकेदार मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचेमार्फत सध्या प्रगतीत आहे. सदरहू संपूर्ण इमारत संस्थानचे निधीतून बांधकाम करणे व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तळमजल्यावरील माहिती केंद्र व दुकान गाळा तसेच भक्तनिवासाचा वापर संस्थानसाठी करणे इत्यादी अटी व शर्तीचा समावेश असलेला करारनामा संस्थान व राज्य परिवहन महामंडळ यांचे दरम्यान करावयाचा आहे.

वरील विषयांकीत बांधकामाबाबत संस्थान व राज्य परिवहन महामंडळ यांचेतर्फे यापुर्वी वेळोवेळी घेण्यात आलेले निर्णय, करारनाम्याबाबत व इतर अनुषंगीक पत्रव्यवहार यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६४ अन्वये बस स्थानक परिसर व तळमजल्याचे बांधकाम संस्थानमार्फत करुन देण्यात यावे व त्यावरील मजले संस्थानचे वापराकरीता ३० वर्षे कराराने घेण्यात यावे असे ठरले.

रा.प.महामंडळाने ठराव क्र.२००७:१२ :१३, दि.१९/१२/२००७ अन्वये नियोजीत इमारतीतील वरील मजल्यावरील २२७३ चौ. मी. क्षेत्र साईभक्तांच्या धर्मशाळेसाठी संस्थानने स्वखर्चाने बांधुन वापरासाठी देणेस मान्यता दिली.

रा.प.महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.राप/स्थाअ/कामे/२३७६, दि.२०/०५/२००८ अन्वये शिर्डी येथिल बसस्थानक विकसीत करणेबाबत दि.०१/०४/२००८ रोजी विधानभवन, मुंबई येथे झालेल्या बैठकीत संस्थानला एकूण २५५४ चौ. मी. बांधकाम क्षेत्र स्वखर्चाने बांधुन वापरण्यास द्यावयाचे ठरले.

संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.५७६, दि.०७/०७/२००८ अन्वये नियोजीत बसस्थानक इमारतीचे सुधारीत बांधकाम आराखडयास व रु.७.६६ कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली.

संस्थानचे मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.३६२, दि.१८/०४/२०१० अन्वये मे.पाटील कन्स्ट्रक्शन्स, पुणे यांची निविदा स्विकारणेत आली. त्यानुसार जा.नं.एसएसएसटी/६८२१/२०१०, दि.२९/१०/२०१० अन्वये ठेकेदार मे. पाटील कन्स्ट्रक्शन्स, पुणे यांना सदर कामाचा कार्यादेश देणेत आला.

उपरोक्त प्रकल्पापैकी सर्व्हे नं.१२५ मधिल तात्पुरत्या वाहनतळाचे काम ठेकेदार यांनी दि. २६/०६/२०१० रोजी सुरु केले. तसेच जुनी इमारत तोडण्याचे काम दि.१५/०९/२०१० रोजी सुरु केले.

विभाग नियंत्रक, रा.प. अहमदनगर यांनी त्यांचेकडील जा.क्र.राप/विनि/स्थापत्य/१४७२, दि.२६/१०/२०१० चे पत्राद्वारे उपरोक्त बांधकामासंबंधी करावयाच्या करारनाम्याचा कच्चा मसुदा पाठविला. तसेच त्यामध्ये काही फेरफार आवश्यक असल्यास त्याप्रमाणे फेरफार करुन मंजूर मसुदा परत त्यांचे कार्यालयास पाठवावा असे कळविले.

उपरोक्त करारनाम्याचे मसुद्यात आवश्यक त्या सुधारणा करुन सुधारित मसुदा जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/ २१९९/२०११, दि.०२/०८/२०११ चे पत्राद्वारे विभाग नियंत्रक, रा.प. अहमदनगर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत आला.

इकडील दि.१४/०५/२०१२ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार उपरोक्त करारनाम्याचा मसुदा ॲड. श्री.एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडून तपासून घेणेसाठी जा.नं.एसएसएसटी /बांधकाम/ ७८९/ २०१२, दि.२२/०५/२०१२ अन्वये त्यांना पत्र देऊन मसुदा पाठविणेत आला.

विभाग नियंत्रक, रा.प. अहमदनगर यांचेकडून जा.नं.५३४, दि.०२/०५/२०१२ (आवक नं.२६६५, दि.१९/०५/२०१२) रोजीचे पत्राने पुन्हा करारनाम्यात काही दुरुस्त्या करुन रा.प. महामंडळाचे मुख्य विधी अधिकारी यांनी कायदेशीरदृष्टया तपासून मंजुरी दिलेला मसुदा प्राप्त झाला.

ॲड.श्री.एस.डी.कुलकर्णी यांनी दि.११/०७/२०१२ रोजी करारनाम्याचे मसुद्यात काही दुरुस्त्या सुचविल्या. त्यानुसार करारनामा सुधारित करुन इकडील दि.२८/०२/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीवरील मान्यतेन्वये जा.नं.एसएसएसटी /बांधकाम/५५११/२०१३, दि.०५/०३/२०१३ चे पत्राद्वारे विभाग नियंत्रक, रा.प. अहमदनगर यांचेकडे परत पाठविणेत आला.

इकडील जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/७३७/२०१३ दि.१३/०५/२०१३ व जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/ १३४५/२०१३, दि.१८/०६/२०१३ चे पत्रांद्वारे उपरोक्त करारनामा लवकरात लवकर करुन देणेबाबत विभाग नियंत्रक, रा.प. अहमदनगर यांचेकडे पाठपुरावा करणेत आला.

त्यानंतर रा.प. महामंडळाकडून काहीही प्रतिसाद न मिळाल्याने याबाबत मा.उपाध्यक्ष तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/२०६५/२०१३, दि.०१/०८/२०१३ रोजीचे पत्राद्वारे वरीलप्रमाणे करारनामा करणेसाठी रा.प. महामंडळाकडून त्वरीत कार्यवाही होणेसाठी त्यांचे स्तरावरुन पाठपुरावा होणेबाबत विनंती करणेत आली.

त्यानंतरही दि.०१/०८/२०१३ व दि.०२/१२/२०१३ रोजीचे पत्रांद्वारे मा. विभाग नियंत्रक, रा.प. अहमदनगर यांचेकडे याबाबत पाठपुरावा करणेत आला व त्यांना करारनामा करणेसाठी संस्थानचे कार्यालयात उपस्थित राहणेकामी विनंती करणेत आली.

दरम्यान सदरहु करारनामा नोंदणीकृत करणेसाठी स्टॅम्प डयुटी व रजिष्ट्रेशन फी किती भरावी लागेल, याविषयी माहिती मिळणेबाबत मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१, राहाता यांना जा.नं.४१७०, दि.१६/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये विनंती करणेत आली.

दुय्यम निबंधक श्रेणी -१, राहाता यांनी दि.२१/१२/२०१३ रोजीचे पत्राद्वारे मा. सह जिल्हा निबंधक वर्ग- १, अहमदनगर यांचेकडे मुद्रांक शुल्काबाबत निर्णयासाठी वरील प्रकरण सादर केले आहे. संस्थाननेही जा.नं.४५९९, दि. ०६/०१/२०१४ चे पत्राद्वारे मा.मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग- १, अहमदनगर यांना मुद्रांक शुल्क व नोंदणी फीची माहिती मिळणेकामी विनंती केली आहे.

याबाबत इकडील विभागाचे प्रतिनिधींनी मा.मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग - १ अहमदनगर यांचेशी दि.२६/०२/२०१४ रोजी अहमदनगर येथे समक्ष चर्चा केली. त्यावेळी मा.मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी करारनामा मसुद्यात नमुद केलेले रु.१/- प्रती चौ.मी. भाडे व ३० वर्षांचे करारनामा कालावधीबाबत संस्थानचे व्यवस्थापन समितीचा निर्णय होणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे.
विषयांकीत बांधकाम सध्या प्रगतीत असून त्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१. आर सी सीः वायव्य कोपऱ्यातील इलेव्हेशनचे किरकोळ काम वगळता इतर काम पूर्ण.
२. वीट बांधकामः वरीलप्रमाणे.
३. आतिल प्लास्टरः १०० % पूर्ण.
४. फ्लोअरींगः ६० % पूर्ण.

५. परिसर विकासः १० % पूर्ण.

तरी उपरोक्त करारनाम्यात नमूद केलेप्रमाणे संस्थानला वापरासाठी मिळणारे क्षेत्र ३० वर्षांचे कालावधीसाठी भाडेकराराने घेणे व त्यासाठी रु.१/- प्रती चौ. मी. प्रती वर्ष याप्रमाणे भाडे अदा करणे, या बाबींविषयी मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय होणे आवश्यक आहे. पैकी कालावधीबाबत यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/११/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६४ अन्वये खालिलप्रमाणे ठरले आहे.

*" बस स्थानक परिसर व तळमजल्याचे बांधकाम संस्थानमार्फत करुन देण्यात यावे व त्यावरील मजले संस्थानचे वापराकरीता ३० वर्षे कराराने घेण्यात यावे, असे ठरले."*

अशा प्रकारे कराराचे कालावधीबाबत यापुर्वी वरील प्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय झालेला आहे. तथापी भाडे अदा करणेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. संस्थान व रा.प. महामंडळ यांचेमार्फत सदर प्रकल्पाबाबत संमत करणेत आलेले निर्णय अथवा ठरावांमध्येही भाडे आकारणीबाबत कुठलाही उल्लेख नाही.

विभाग नियंत्रक, रा.प., अहमदनगर यांनी दि. २६/१०/२०१० रोजीचे पत्राद्वारे सुरुवातीस पाठविलेल्या करारनामा मसुद्यात *" वरील क्षेत्रफळ शिर्डी संस्थानला भाडयाने देण्याबाबतचा करार प्रकल्प पूर्ण झाल्यावर रा.प. महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, मुंबई तर्फे देण्यात येणा-या सुचनाप्रमाणे स्वतंत्रपणे करण्यात येईल."* असे नमूद केलेले होते. तद्नंतर विभाग नियंत्रक, अहमदनगर यांनी दि.०२/०५/२०१२ रोजीचे पत्रासोबत पाठविलेल्या करारनामा मसुद्यात कलम २० मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

*" रा.प. महामंडळास श्री साईबाबा संस्थान हे त्यांच्या स्वनिधीमधून बांधुन देत असलेल्या एकूण ५३५४ चौ.मी.या क्षेत्रफळापैकी फक्त २५५४ चौ.मी. क्षेत्रफळ रा.प. महामंडळ श्री साई संस्थान, शिर्डी यांना रु.१/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष या दराने फक्त ३० वर्षाच्या मुदतीकरिता भाडेकरारावर देत आहे. ३० वर्षाच्या मुदतीनंतर सदर क्षेत्रफळ श्री साईबाबा संस्थान यांना भाडे करारावर देण्याचा रा.प. महामंडळाने निर्णय घेतल्यास त्यावेळच्या परिस्थितीनुसार शासनाचा / बाजारातील भाडयाचा दर विचारात घेऊन रा.प. महामंडळाकडून प्रती चौ.मी. दराने भाडे आकारले जाईल. तसेच ३० वर्षानंतर भाडेकराराचे नुतनीकरण श्री. साईबाबा संस्थान यांचेशी करणे रा.प. महामंडळास बंधनकारक राहणार नाही."*

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सासंवि/२००६/६०७/(८७)/का.सोळा, दि.१३/०१/२००९ मधिल *कलम (२) नुसार "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी सहमतीने अन्य बाबींबाबत निर्णय घ्यावा"* असे नमूद केलेले आहे.

वर नमुद केलेप्रमाणे दि.०५/०३/२०१३ चे पत्राद्वारे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, अहमदनगर यांचेकडे पाठविणेत आलेल्या करारनामा मसुद्याची प्रत मुख्य स्थापत्य अभियंता, म.रा. मा.प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांचेमार्फत पुन्हा दुरुस्त्या करुन विभाग नियंत्रक, रा.प. अहमदनगर यांचेकडील जा.क्र.१६३६, दि.२१/०३/२०१४ चे पत्रासोबत इकडील कार्यालयास प्राप्त झालेली आहे. याप्रमाणे प्राप्त झालेला दुरुस्त मसुदा सोबत अवलोकनार्थ ठेवला आहे. त्यामध्ये करण्यात आलेल्या दुरुस्त्या व त्यावरील इकडील विभागाचे अभिप्राय यांचा तपशिल सोबत तक्त्याचे स्वरुपात परिशिष्ट म्हणून अवलोकनार्थ जोडला आहे. त्यामध्ये नमूद केलेनुसार खालिल बाबींविषयी मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय होणे आवश्यक आहे.

०१) करारनाम्यातील अट क्र.७ व शेवटचे परिच्छेदात रा.प.महामंडळाने केलेल्या दुरुस्तीअन्वये तांत्रिक/ प्रशासकीय/ वैधानिक बाबतीत कोणताही वाद उद्भवल्यास, तसेच करारनाम्यात बदल करणे, करारनामा रद्द करणे, करारनामा सुधारित करणे, तसेच बांधकामा दरम्यान कोणताही वाद उदभवल्यास त्याबाबतचे निर्णय प्रक्रियेतून संस्थानचे अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांना वगळणेत आलेले आहे. तथापी भविष्यात वर नमूद परिस्थितीत कुठलाही एकतर्फी निर्णय होऊ नये याकरीता संस्थानचे अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांनाही संयुक्तपणे निर्णयाचा अधिकार असणे आवश्यक आहे असे वाटते. त्यामुळे सदरहू दुरुस्ती करण्यात येऊ नये अशी विनंती रा. प. महामंडळास करता येईल. तरी सदरहू दुरुस्ती स्विकारावी किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

०२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६४अन्वये सदर बांधकाम ३० वर्षे कराराने घेण्यात यावे असे ठरले आहे. त्यामुळे कालावधीबाबत संदिग्धता नाही. तथापी भाडे अदा करणेबाबत यापुर्वी ठरलेले नाही. सदर इमारतीचे स्थान हे शहराचे मध्यवर्ती भागात मोक्याचे ठिकाणी आहे. सदर जागेचे व्यापारी मुल्य बघता करारनामा अट क्र.२० मध्ये नमूद केलेले रु.१/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष (एकूण क्षेत्रासाठी रू.२,५५४/-प्रती वर्ष) हे भाडे अत्यल्प अथवा नाममात्र स्वरुपाचे आहे असे मत आहे. तथापि या बाबीविषयी यापुर्वी निर्णय झालेला नसल्याने

यांप्रमाणे भाडे अदा करणेविषयी संस्थान व्यवस्थापन समिती सभेत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

०३) याव्यतिरिक्त इतर अटींमध्ये रा.प. महामंडळाने केलेल्या दुरुस्त्या स्विकारणेस मंजुरी मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील नियोजीत बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यामध्ये, भविष्यात कुठलाही एकतर्फी निर्णय होऊ नये याकरीता मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी यांचे नावाचा त्यामध्ये समावेश असावा.**

**तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी ठरवून दिलेले रु.१/- मात्र प्रती चौ.मीटर, प्रती वर्ष (एकूण क्षेत्रासाठी रू.२,५५४/- मात्र) हे निश्चित करणेत यावे, त्यामध्ये करारनाम्याची मुदत संपेपर्यंत वाढ करता येणार नाही, याचा उल्लेख करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९ आरोग्य विभाग प्रमुख यांचे कार्यालयासाठी ॲल्युमिनिअम पार्टीशनची कॅबीन तयार करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना-** संस्थानचे दैनंदिन साफसफाई व देखभालीसाठी आरोग्य विभागाचे कार्यालय शांतीनिवास इमारत, रुम नं. ८१,८२,८३ मध्ये आहे. सदर कार्यालयात अधिक्षक/ खातेप्रमुख यांना विभागाकडील पर्यवेक्षक, मुकादम, लिपीक, व इतर कर्मचारी यांचेशी कामकाजाबाबत चर्चा करणे, विभागाचे गोपनिय व महत्त्वाचे कार्यालयीन कामकाज करणे व बसणेसाठी खाते प्रमुखास स्वतंत्र कॅबीन आरोग्य विभागाकडे उपलब्ध नाही त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अडचणी येतात. करीता त्यासाठी स्वतंत्र कॅबीन तयार करुन देणेसाठी दि.१३/०३/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये इकडेस कळविले आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी केली असता खाते प्रमुख यांना स्वतंत्र कॅबीन नाही.

**प्रस्ताव-** उपरोक्त बाबींचा विचार करता सदर ठिकाणी पूर्वीच्या दोन भिंतीचा वापर करुन उर्वरीत दोन बाजुस ॲल्युमिनिअम पार्टीशन तयार करुन दरवाजा बसविता येईल. याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल (संक्षिप्त) | परिमाण | एकक | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ॲल्युमिनिअम पार्टीशन तयार करुन जागेवर बसविणे. | १३.४७ | चौ. मीटर | २०००/- | २६,९४०/- |
| ०२ | ॲल्युमिनिअम पार्टीशन साठी दरवाजा बसविणे (आवश्यक फिटींग मटेरिअल सह) | १.९६ | चौ. मीटर | २२००/- | ४३१२/- |
| | | | | **एकूण -** | **३१२५२.००** |
| | | | | **अधिक ५%** | **१५६२.६०** |
| | | | | **एकूण पुर्णाकींत अंदाजे रक्कम रु.** | **३२,८१५.००** |

सदर कामासाठी उपरोक्त तपशिलाप्रमाणे अंदाजे रु.३२,८१५/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम स्थानिक पुरवठाधारक यांचे कडून दरपत्रके मागवून करता येईल.

**विभागाचे अभिप्राय/ मतः-** विषयांकीत कामासाठी उपरोक्त अंदाजपत्रकात नमुद केलेप्रमाणे अंदाजे रु. ३२,८१५/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास मंजुर मिळणेस विनंती तसेच सदरचे काम करणेसाठी स्थानिक पुरवठाधारक यांचेकडून विहीत पध्दतीने सिलबंद कोटेशन्स/ दरपत्रके मागवून अथवा मागिल मंजूर दराने ॲल्युमिनिअम पार्टीशन करणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२० प्रकाशने विभाग कार्यालयात आरक्षण कक्षाकरिता ॲल्युमिनिअम पार्टीशनची कॅबीन तयार करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१,जुन २०१३, रोजीचे सभेतील निर्णयान्वये श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मागासवर्गीय आरक्षणा बाबतचे धोरण प्रभावीपणे राबविणेकरीता स्वतंत्र ". आरक्षण कक्षाची ". निर्मिती करण्यात येऊन, उपरोक्त आदेशान्वये कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याकरीता आरक्षण कक्षाची आवश्यकता आहे.

**प्रस्तावः-** उपरोक्त व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आरक्षण कक्षाकरीता शांतीनिवास इमारतीमधील प्रकाशने विभागात जागा उपलब्ध असून, सध्याचे प्रकाशने विभाग प्रमुख यांचे केबीनचे पार्टीशन वाढवून आरक्षण कक्षासाठी स्वतंत्र कक्ष तयार करता येईल व उर्वरीत भागात प्रकाशने विभाग प्रमुखांसाठी योग्य त्या आकाराची ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेबाबत दि. ०७/०२/२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये आरक्षण कक्ष यांनी कळविले आहे.

आरक्षण कक्षाकरीता ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये कॅबीनसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing ,Supplying & Fixing in position Powder Coated Aluminium partition Partly Glazed & partly laminated. | 17.75 | M2 | 1650.00 | 29,287.50 |
| 02 | Providing & Fixing in position single shuttered Alluminium extruded Powder Coated Door. | 01.95 | M2 | 2000.00 | 3,900.00 |
| | | | | | **33,187.50** |
| | **Add 5 % Contingencies -** | | | | **1,659.38** |
| | **Total -** | | | | **34,847.88** |
| | **Say R/o -** | | | | **35,000/-** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे सदरकामी एकुण रु.३५,०००/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी शांतीनिवास इमारतीमधील प्रकाशने विभागात प्रकाशने विभाग प्रमुख यांचे कॅबीन लगत आरक्षण कक्षाकरीता ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये कॅबीन तयार करणेसाठी येणारे रु.३५,०००/- मात्रचे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१ शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना अर्थसहाय्य करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** (२००४ चा महा. १४) याच्या कलम २१ च्या पोट-कलम (१ क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासरख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक १३० नुसार मौजे काकडी (शिर्डी) विमानतळ विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य करणेचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, MADC ज्या ठिकाणी विमानतळाची जागा निश्चित करेल त्या ठिकाणी विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत विहीत पध्दतीने शासनाची मान्यता घेऊन योग्य ती आर्थिक मदत करण्यात येईल असे कळविण्यात यावे, असे ठरले."

२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जानेवारी, २००९ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक २३ मौजे काकडी (शिर्डी) विमानतळ विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य देणेचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना शिर्डी येथील विमानतळ विकसित करणेसाठी रक्कम रुपये ५० कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी काय अटी असतील तसेच कोणत्या पध्दतीने निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले."

**प्रस्ताविक**: उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार शासन मान्यतेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेत आले. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने उपरोक्त अधिनियम २००४ चे तरतुदी नुसार रु.५० कोटी इतके मर्यादेपर्यंत सहायक अनुदान देणेस त्यांचेकडील No.SSV-२०११/ C.R.४४/ Desk-XVI. दि. २४ जून, २०११ रोजीचे आदेशाने खालील अटी व शर्तीस अधिन राहून परवानगी देणेत आली आहे.

अटी व शर्ती व त्यांचा पुर्तता याबाबत माहिती खालील प्रमाणे :

| अ. नं. | अट | पुर्तता झाली किंवा कसे |
|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित मंजूर रकमेचा विनियोग केवळ शिर्डी येथील विमानतळ विकसित करण्यासाठी करील. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या पत्रात त्यांनी कलम २ मध्ये नमुद केले आहे की, सदरहू निधिचा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापर केला जाणार नाही व शिर्डी साईबाबा एअरपोर्ट न्यासाचा खर्चाचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवणेत येईल.<br>मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित यांचे दिनांक २० सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रासोबत सन २०११-२०१२ सालाचे शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्टचे ऑडीट सारडा ॲण्ड पारीक कंपनीनें केलेले आहे. त्यात संस्थानचे ४५ कोटी आलेले दाखविले व खर्चही दाखविलेला आहे. अशा रीतीने अटीची पुर्तता झालेली आहे. |
| ०२ | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित अशा अनुदानाचा स्वतंत्र हिशोब ठेवील आणि त्याचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी करणार नाही. | |
| ०३ | उक्त कंपनी, सहायक अनुदानाचा विनियोग केल्यापासून तीन महिन्याच्या आत, राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला, विनियोग प्रमाणपत्र तीन प्रतीत सादर करील. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांनी सहाय्यक अनुदान विनियोग पत्र दिनांक ११ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रासोबत एक प्रतीत पाठविलेले आहे.<br>मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांनी दिनांक २० सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्राने सन २०११-२०१२ चा ऑडीट रिपोर्ट पाठविलेला आहे. |
| ०४ | शासनमान्य लेखापरिक्षकांचा, अनुदानाच्या विनियोगाबाबतचा लेखापरिक्षण अहवाल राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला सादर करण्यात येईल. | |
| ०५ | विमानतळाचा विकास केल्यानंतर, उक्त कंपनी, किमान १,००० चौरस फुट इतकी जागा माहिती केंद्र, प्रसिध्दी केंद्र, इत्यादी उभारण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेला मोफत देईल. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांनी त्यांचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या पत्रामध्ये अ. नं. ५ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.<br>विमानतळाचा विकास झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संस्थेने मागणी केलेली किमान १००० चौ. मी. इतकी जागा माहितीकेंद्र उभारण्यासाठी देण्याबाबत योग्यवेळी ठराव करण्यात येईल. |
| ०६ | राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा इतर अटी व शर्ती, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित यांना व विश्वस्तव्यवस्थेला बंधनकारक असतील. | सल्लागार (वित्त प्रशासन) तथा ट्रस्टी शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्ट यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या पत्रातील ६ मध्ये नमूद केले आहे.<br>" शासनाने वेळोवेळी घातलेल्या अटी व शर्ती म.वि.वि. कंपनीस बंधनकारक असतील. |

उपरोक्त शासन आदेशानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना आजअखेर खालील प्रमाणे एकुण रुपये ४५ कोटी इतके सहाय्यक अनुदान देण्यात आले आहे.

१. टप्पा क्रमांक ०१ : रुपये १५ कोटी (दि.५/०७/२०११ रोजी)

२. टप्पा क्रमांक ०२ : रुपये २० कोटी (दि.२५/७/२०११ रोजी)

३. टप्पा क्रमांक ०३ : रुपये १० कोटी (दि.९/९/२०११ रोजी)

**मागणी:** उर्वरीत रक्कम रु. ५ कोटी मिळणेबाबत मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी त्यांचे दिनांक २० सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्राने मागणी केली आहे.

**प्रस्ताव:** महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी मागणी केलेले उर्वरीत रकमेबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १३/१२/२०१३ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. सदरहू सभेत सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी

मर्यादित, मुंबई यांना तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार व शासनाच्या आदेशाप्रमाणे यापुर्वी रु.४५ कोटी मात्रचा निधी देण्यात आलेला आहे. त्या निधीच्या खर्चाबाबतचा अहवाल महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडून घेण्यात यावा व त्यानुसार सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, असे निर्णय कमांक ९३७ अन्वये ठरले."

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार महाराष्ट्र विमानतमळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना इकडील जा. नं. ५३७१/२०१४ दिनांक २४/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये माहिती मागविणेत आली असून, त्यांनी त्यांचेकडील दिनांक २९ मार्च, २०१४ रोजीचे पत्रान्वये सदरहू कामासाठी करणेत आलेल्या निधी खर्चाबाबतचा अहवाल खालील प्रमाणे सादर केला आहे. .

| Sr. No. | Partcular | Total Amt. Spent as on date on Shirdi Airpot | F. Y. 2011-12 | F. Y. 2012-13 | Total funds utilized from funds received from Shirdi Sansthan |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Area grading, Construction of runway, Taxiway, apron, GSE, Isolation Bay, compound wall, Storm water drainage, Security tower, etc. | 85.37 | 15.58 | 13.95 | 29.53 |
| 2 | Shifting / rerouting of EHV Transmission Lines around the proposed Airport at Shirdi | 15.69 | 13.25 | -- | 13.25 |
| 3 | Strengtheoing and widening of access road from bypass road to Kakdi Village | 5.10 | 1.07 | -- | 1.07 |
| 4 | Construction of terminal building at Shirdi Airport. | 0.56 | - | -- | -- |
| 5 | Consultancy and other works. | 8.46 | 1.15 | -- | 1.15 |
| | | 115.18 | 31.05 | 13.95 | 45.00 |

शासन विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक सांसवि-२०११ (प्र. क्र. ४४) का. सोळा दिनांक २४ जुन, २०११ रोजीच्या आदेशान्वये संस्थानने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना काही अटी व शर्ती रक्कम रुपये ५० कोटी सहाय्यक अनुदान देण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी रुपये ४५ कोटी रुपये देणेत आलेले आहे. उर्वरीत रुपये ५ कोटी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना देय आहेत. तथापि, सदर रक्कम देणेपूर्वी श्री. राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर, शिर्डी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेली पी आ एल १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ दिनांक १६/१०/२०१२ रोजीच्या निकालात कलम ६) We direct that, without prior permission of this Court, the committee, (c) Shall not take any major financial decision of whatsoever nature; नमूद केले आहे.

या कलमान्वये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना रक्कम रुपये ५ कोटी देणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे लागेल. शासन आदेशतील अट क्र. ५ मध्ये विमानतळाचा विकास केल्यानंतर, उक्त कंपनी, किमान १,००० चौरस मी. इतकी जागा माहिती केंद्र, प्रसिध्दी केंद्र, इत्यादी उभारण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेला मोफत देईल. असे नमूद आहे. याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी विमानतळाचा विकास झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संस्थेने मागणी केलेली किमान १००० चौ. मी. इतकी जागा माहितीकेंद्र उभारण्यासाठी देण्याबाबत योग्यवेळी ठराव करण्यात येईल असे कळविले आहे. सदरहू रक्कम त्यांना देणेपूर्वी त्यांचेकडून तसा ठराव प्राप्त होणे आवश्यक आहे असे मत आहे. तसेच सदरहू रक्कम शिर्डी- काकडी विमानतळ रस्त्याचे कामासाठी वापरण्यात यावी याबाबत मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेत औपचारीक चर्चा झाली आहे. त्यानुसार रक्कम देतांना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना कळविता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ मतः** उपरोक्त प्रस्तावानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना महाराष्ट्र शासन आदेशानुसार व मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेवुन रक्कम अदा करता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना उर्वरित रु.५ कोटी मात्र रक्कम देणेसाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाची मान्यता प्राप्त झालेनंतर त्यांना अर्थसहाय्य करावे, असे ठरले.**

**तसेच, विमानतळ परिसरामध्ये श्री साईबाबा संस्थानला माहितीकेंद्र उभारण्यासाठी १००० चौ. मी. जागा मिळणेसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना पत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२२ श्री साई प्रसादालयातील विशेष प्रसादभोजन कक्ष व व्ही.व्ही. आय.पी. प्रसादभोजन कक्ष येथील भितींना रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयातील विशेष प्रसादभोजन कक्ष व व्ही.व्ही.आय.पी. प्रसाद भोजन कक्ष येथील भिंतींना रंगकाम करणेबाबत खालील प्रमाणे कळविले आहे. मा. श्री. राहूल राजीव गांधी, उपाध्यक्ष राष्ट्रीय कॉग्रेस पार्टी, तसेच मा.ना.मुख्यमंत्री, व इतर मंत्री महोदय हे दि.१४/०४/२०१४ रोजी दुपारी शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी आलेले होते. दर्शन झालेनंतर मा. मुख्यमंत्री व इतर मंत्री महोदय यांचे समवेत मा. कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी हे प्रसादालयामध्ये प्रसादभोजन घेणेकामी आले असता, प्रसादभोजन झालेनंतर मा. मुख्यमंत्री व इतर मंत्री महोदय तसेच मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी श्री साई प्रसादालयाचे विशेष प्रसादभोजन कक्ष, व्ही.व्ही.आय.पी. कक्ष, मुख्य किचन, चपाती किचन, जनरल प्रसादभोजन हॉल इत्यादीची पाहणी केलेली आहे. पाहणी दरम्यान मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी विशेष प्रसादभोजन कक्ष व व्ही.व्ही.आय.पी. प्रसादभोजन कक्ष येथील भिंतींना रंगकाम देण्याची सुचना केलेली आहे.

विशेष प्रसाद भोजन कक्ष व व्ही. व्ही.आय.पी. प्रसाद भोजन कक्ष यांना रंगकाम करणेकामी आवश्यक मटेरिअल खरेदी करणेकरीता खालील प्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | मटेरिअल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | लस्टर पेंट (Victorian wisp MBI - on ६८) मॅट फिनिश (२० Lit.) | ९ | डबे | ४५००/- | ४०,५००/- |
| २ | टरपेन (२० Lit.) | २ | डबे | १६००/- | ३२००/- |
| ३ | पी.ओ.पी. (५ Kg) | ८ | बॅग | ६०/- | ४८०/- |
| ४ | Wall Putty Asian (४० Kg.) | ३ | बॅग | ८९०/- | २६७०/- |
| ५ | एस.टी. प्रायमर (२० Lit.) | ५ | डबे | २७७०/- | १३८५०/- |
| ६ | व्हाईट ऑईल पेंट (४ Lit.) | ३ | डबे | १०००/- | ३०००/- |
| ७ | पॉलीश पेपर १२० नं. | २४ | डजन | १० | २४०/- |
| | १०० नं. | २४ | डजन | १० | २४०/- |
| | | | | **एकूण रक्कम -** | **६४,१८०/-** |

तसेच याकामी मजुरी दराने रंगकाम करणेसाठी खालील प्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईप्रसादालयातील व्ही.आय.पी. डायनींग हॉल मधील भितींचा जुना रंग घासून प्रायमर, लांबी, पुट्टी सह लस्टर पेंट करणे. | १२,३०० | चौ. फुट | ४/- | ४९,२००/- |
| २ | सिंगल कोट ऑईल पेंट रंगकाम करणे. | २०० | चौ. फुट | ५/- | १०००/- |
| | | | | **एकूण -** | **५०,२००/-** |

उपरोक्त प्रमाणे श्री साईप्रसादालयातील विशेष प्रसाद भोजन कक्ष व व्ही. व्ही. आय.पी. प्रसाद भोजन कक्ष येथील भिंतींना रंगकाम करणेकामी मटेरिअल व मजुरी कामापोटी मिळून रक्कम रु.१,१४,३८०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी श्री साई प्रसादालयातील विशेष प्रसाद भोजन कक्ष व व्ही.व्ही.आय.पी. प्रसाद भोजन कक्ष यांना रंगकाम करणेसाठी येणारे रक्कम रु.१,१४,३८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३११ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील विशेष प्रसादभोजन कक्ष व व्ही.व्ही. आय.पी. प्रसादभोजन कक्ष येथील भितींना रंगकाम करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,१४,३८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३ मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथील जनहीत याचिका क्र. २५/ २०१२ श्री.संजय भास्करराव काळे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये उपस्थित मुद्यांबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक सासंवि- २०१२/१९८ प्र.क्र.२०/ का.सोळा दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्राने शासनाने श्री संजय भा. काळे यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २५/२०१२ मध्ये उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर संस्थानने करावयाची कार्यवाही/ उपाययोजना याबाबतचे विवरण पत्र पाठविले आहे. सदरचे पत्राची

छायांकित प्रत दि.२०/११/२०१३ रोजी संस्थानचे विधी विभाग यांचेकडून प्राप्त झाली आहे. तसेच दि.१४/०१/२०१४ चे पत्राने संस्थानचे विधी विभाग यांनी उपरोक्त शासनाचे पत्रास अनुसरुन संबंधित मुद्यांबाबत करावयाची कार्यवाही नियमीतपणे व्हावी असे कळविले आहे.

आता महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक सासंवि/ २०१२/१९८/ प्र.क्र.२०/ का-सोळा, दि.०२/०४/२०१४ चे पत्राने शासनाचे यापुर्वीचे दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे. तसेच सदरचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, सबब, सदर कार्यवाहीचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा, असे कळविले आहे. त्यानुसार संबंधित मुद्यांवर करणेत आलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याची कार्यवाही करावी असे दि.१२/०४/२०१४ चे पत्रान्वये संस्थानचे विधी विभागाने कळविले आहे.

शासनाकडील दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्रासोबत जोडलेल्या विवरणपत्रात बांधकाम विभागाशी संबंधित मुद्दे व संस्थानने करावयाची कार्यवाही यांचा तपशिल खालील प्रमाणे नमूद केलेला आहे.

| **अ.नं.** | **श्री संजय काळे यांचा जनहित याचिकेतील मुद्दा** | **शासनाचे पत्रासोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केलेप्रमाणे संस्थानने करावयाची कार्यवाही** |
|---|---|---|
| ०१ | येसगांव येथे जागा संस्थानच्या नावे होण्यापूर्वी भक्तनिवास बांधण्यात आलेबाबत. | प्रस्तुत प्रकरणी संबंधित जमीन संस्थानच्या नावे होण्यापूर्वी बांधकामाची निविदा मंजूर करणे, बांधकामाचा कार्यादेश देणे, ठेकेदारांची बिले देणे या सर्व बाबी नियमबाह्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. याबाबत तक्रार प्राप्त होईपर्यंत संस्थानकडून शासनास काही माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तत्कालीन उपाध्यक्ष यांच्या विनंतीनुसार व्यवस्थापन समितीने सदर प्रस्ताव मंजुर करुन बांधकाम पूर्ण केल्याचे दिसते. वस्तु :त येसगांव येथे पालख्या येत असल्याने पालखी थांबा बांधणे शक्य होते. मात्र शिर्डी पासून येसगांव हे अंतर लक्षात घेता आवश्यकता नसतांना सदर भक्तनिवास बांधल्याचे दिसून येते. या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द आवश्यक कारवाई करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या मा. प्रधान जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीमार्फत याबाबत सविस्तर चौकशी करण्यात यावी व समितीच्या चौकशी अहवालानुसार संबंधितांवर पुढील कार्यवाही करण्यात यावी. |
| ०२ | शिर्डी विकास आरक्षण क्र.८ खाली आरक्षित ५९.१५ आर शेत खरेदी / संपादित करुन शाळा बांधुन जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्याबाबत. | निरंक |
| ०३ | श्री साईबाबा संस्थानने नगरपरिषद, कोपरगांव यांना पालखी मार्ग रस्त्याच्या बांधकामासाठी रु.१.१२ कोटी इतकी रक्कम देऊन पदांचा व निधीचा गैरवापर केला आहे.<br>कोपरगांव नगरपालिकेने काम पूर्ण झाल्याचा दाखला दिला असला तरी अद्याप १५ कि. मी. मार्गाचा रस्ता पूर्ण झालेला नाही. त्यामुळे काम अपूर्ण आहे. मात्र संस्थानने पूर्ण रक्कम अदा केलेली आहे. विश्वतांची कृती बेकायदेशीर व संस्थानच्या हिताविरुध्द आहे. | पालखी मार्ग रस्त्याचे बांधकाम अपूर्ण असताना संस्थानने पूर्ण रक्कम अदा केली अशी तक्रार असून, यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात व चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.<br>तसेच अधिनियमात ज्या बाबींसंबंधी स्पष्ट तरतूद नाही असे प्रस्ताव व्यवस्थापन समितीने विचारार्थ घेऊ नये व शासनास सादर करु नयेत. |
| ०४ | संस्थानने विमानतळ विकास प्राधिकरणास रुपये ३५ कोटी दिनांक ५.७.२०११ व दि.२५.७.२०११ रोजी अदा केले असून विधानमंडळाचे दि.२६ व २७/०७/२०११ रोजी विधेयकास मंजुरी दिली आहे. निधी देण्याची कार्यवाही अधिनियम सुधारण्यापूर्वी करण्यात आली असल्याने ती बेकायदेशीर आहे. | प्रस्तुत प्रकरणी केलेली कार्यवाही नियमानुसार करण्यात आली असल्याने ती योग्य व वैध असल्याने अभिप्राय निरंक आहेत. |

वर नमूद शासनाने पाठविलेल्या विवरणपत्रातील मुद्दा क्र.१ व ३ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.प्रधान जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखालिल त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात यावी व समितीच्या चौकशी अहवालानुसार संबंधितावर पुढील कारवाई करण्यात यावी असे 'संस्थानने करावयाची कार्यवाही' या सदरात नमूद केलेले आहे. तरी सदर प्रस्ताव पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव न्यायप्रविष्ठ असल्यामुळे स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** १) जा.नं.एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९८ दि.१६/०१/१९९९ २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०२/२००९ निर्णय क्र.७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रस्ताविक:-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु. १०,०००/- पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे.

**मागणी:-**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ- श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल मध्ये उपचार घेतलेले** | | | | | | | |
| 1. | श्री. गावडे रविंद्र बापू<br>विभाग- पाणीपुरवठा<br>हुद्दा- तारतंत्री | वडील | हृदयविकार | डॉ. मुंदडा<br>डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1,865/- | 1,865/- | |
| 2. | सौ. मुठाळ सुचिता राजीव<br>विभाग- साईबाबा<br>हुद्दा - सि. इन्चार्ज | सासु व सासरे | मधुमेह<br>हृदयविकार | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 4,941/- | 4,941/- | |
| 3. | श्री. नळे सुनिल नानासाहेब<br>विभाग - संरक्षण<br>हुद्दा - मदतनीस | वडील | Rt-Thalamic Bleed ®Hernioplasty | डॉ. किरण गोरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 846/- | 846/- | |
| 4. | श्री बाबर सुजय आनंदराव<br>विभाग- कन्या शाळा<br>हुद्दा - सहा. शिक्षक | स्वत:<br>आई | Spondilysis/ मधुमेह | डॉ. म्हात्रे,<br>डॉ. शर्मा,<br>डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1,803/- | 1,803/- | |
| 5. | डॉ. सुरवसे संतोष बी.<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा - भुलतज्ञ | स्वत: | हृदयविकार | डॉ. बजाज,<br>डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 28,861/- | 28,787/- | |
| 6. | डॉ. सरदार अमोल भगवंत<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- निवासी वैद्यकीय अधिकारी | वडील<br>आई | Chronic Prostatitic With Benign enlargement of Prostate Acute glomerulonephritis | डॉ. मुंदडा<br>डॉ. चाफेकर | श्री साईबाबा हॉस्पिटल | 11,021/- | 6,953/- | |
| 7. | श्री. औदिच्य दिलीप बाळकृष्ण<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - स्टोअर मॅनेजर | स्वत: | हृदयविकार | डॉ.वर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 6,393/- | 6,393/- | |
| 8. | डॉ. बागडिया शितल ओमप्रकाश<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - Gynacologist | स्वत: | Varicose Veins | डॉ. अग्रवाल | साईनाथ हॉस्पिटल | 6,762/- | 6,762/- | |

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9. | सौ. वर्पे सविता चांगदेव<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | आई | Diabetis | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 6,681/- | 6,552/- | |
| 10. | श्री कोते प्रकाश भाऊसाहेब<br>विभाग- साईभक्तनिवास<br>हुद्दा- मदतनीस | स्वत: | Kidney Failure | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 33,635/- | 33,056/- | |
| 11. | श्री. गोंदकर प्रशांत भानुदास<br>विभाग- नवीन भक्तनिवास<br>हुद्दा- मदतनीस | स्वत:<br>वडील | ह्दयविकार,<br>ह्दयविकार,<br>मधुमेह | डॉ. बजाज,<br>डॉ. वर्मा,<br>डॉ.गोरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 9,376/- | 7,676/- | |
| 12. | सौ. अरगडे सुरेखा सुरेश<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- मदतनीस | स्वत: | Spondilysis | डॉ. रामराव | श्री साईबाबा हॉस्पिटल | 498/- | 498/- | |
| 13. | श्री नवले रविंद्र बाळासाहेब<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - एच. आर. मॅनेजर | स्वत: | ह्दयविकार | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | 3,007/- | 3,007/- | |
| 14. | सौ. कांडेकर उषाकांती दशरथ<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | सासरे | Femure Nailing | डॉ. जपे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 5,000/- | 5,000/- | |
| 15. | श्री. लुटे चंद्रकांत धोंडीराम<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- तंत्रज्ञ | वडील | Diabetis | डॉ.मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 3,544/- | 3,544/- | |
| 16. | श्री. वाकडे राजेश रमणलाल<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- सि.बायोमेडिकल मॅनेजर | आई | Diabetis | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1,136/- | 1,136/- | |
| 17. | सौ. थोरात संगिता संजय<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- सि. इनचार्ज | पती<br>सासु | Diabetis<br>Asthama & Heart Disease | डॉ. मेहरोत्रा,<br>डॉ. इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | 10,825/- | 10,745/- | |
| 18. | श्री. लोखंडे दिपक सुर्यकांत<br>विभाग- द्वारावती भक्तनिवास<br>हुद्दा- लिपीक | आई | मधुमेह | डॉ. मेहरोत्रा | साईबाबा हॉस्पिटल | 4,947/- | 4,797/- | |
| 19. | श्री. गायकवाड समाधान कचरु<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- मदतनीस | आई | जनरल | डॉ. साबळे | साईनाथ हॉस्पिटल | 11,406/- | 11,406/- | |
| 20. | श्री. कोते मिनीनाथ भाऊसाहेब<br>विभाग- ज्यु. कॉलेज<br>हुद्दा- प्रयोगशाळा सहाय्यक | आई | Diabetis | डॉ. पोरवाल | साईनाथ हॉस्पिटल | 3,318/- | 3,318/- | |

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21. | कै.कराडे वैशाली मिलिंद<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- सिस्टर इन्चार्ज | स्वत: | Rt. Thalamic Sol for S. J. | डॉ. म्हात्रे | साईबाबा हॉस्पिटल | 17,536/- | 17,536/- | |
| 22. | श्री. कुलकर्णी प्रमोद वसंतराव<br>विभाग- लेखाशाखा<br>हुद्दा- अधिक्षक | पत्नी व स्वत: | जनरल | डॉ. कुलकर्णी, डॉ. शेळके | साईनाथ हॉस्पिटल | 2,024/- | 2,024/- | |
| 23. | सौ. कडू स्वाती इंद्रभान<br>विभाग- ज्यु. कॉलेज<br>हुद्दा- सहाय्यक शिक्षिका | मुलगी | जनरल | डॉ. कुलकर्णी | साईनाथ हॉस्पिटल | 1,505/- | 1,485/- | |
| 24. | श्री. कुदळे अण्णासाहेब गोवर्धन<br>विभाग- बांधकाम<br>हुद्दा- मदतनीस | स्वत: | मधुमेह, ह्यदयविकार | डॉ. वर्मा | साईबाबा हॉस्पिटल | 5,431/- | 5,431/- | |
| 25. | श्री पठाण शहनाज वालीमुहम्मद<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- परिचारिका | आई | CRF with hypertension & Anaemia | डॉ. इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | 1,687/- | 1,687/- | |
| 26. | डॉ. अजित कुमार तुकाराम वाघ<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- RMO | वडील | peritonial Dialysis | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 41,558/- | 41,558/- | |
| 27. | श्री त्रिभुवन प्रदिप विनायक<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - मदतनीस | स्वत: पत्नी | मधुमहे, त्वचारोग | डॉ. पोरवाल, डॉ. कांबळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 2,743/- | 2,743/- | |
| 28. | सौ. मखाना रंजना प्रकाश<br>विभाग - साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - आया | पती | Chronic Renal Failure | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 8,035/- | 7,973/- | |
| 29. | डॉ. तांबे महेंद्र टी.<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- C. M. O. | वडील | Dibetis | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | 3,400/- | 3,400/- | |
| 30. | श्री बंदावणे सुभाष मल्हारी<br>विभाग - ध्वनिक्षेपण<br>हुद्दा - प्र. विभाग प्रमुख | मुलगा | Heart diseas | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 2,600/- | 2,600/- | |
| 31. | श्री धामणे भागवत सुर्यभान<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल, लिपीक | आई | जनरल | डॉ. वर्पे | श्री साईनाथ हॉस्पिटल | 2,642/- | 2,642/- | |
| 32. | श्री धरम वाल्मिक बापूराव<br>विभाग- ध्वनिक्षेपण<br>हुद्दा - मदतनीस | स्वत: | Heart diseas | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | 3,255/- | 3,255/- | |
| 33. | सौ. तांबटकर सुलोचना सुनिल<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - स. अधिसेविका | स्वत: | Diabetis | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | 1,682/- | 1,478/- | |
| 34. | सौ. खान रुक्साना साजिद | स्वत: | हृदयविकार | डॉ. वर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 2,506/- | 2,506/- | |

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग- साईबाबा हॉस्पिटल, परिचारिका | | | | | | | |
| | | | | | **एकूण** | **2,52,469/-** | **2,45,403/-** | |
| | **ब - संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| 35. | श्री. खरात सतिश रामभाऊ<br>विभाग- प्रशासन<br>हुद्दा- लिपीक टंकलेखक | स्वत: | Easy Fatigability | डॉ. मेहरोत्रा | बॉम्बे हॉस्पिटल रिसर्च सेंटर, मुंबई | 4,216/- | 4,216/- | |
| 36. | श्री. थेटे बाबासाहेब काशिनाथ<br>विभाग- द्वारावती भक्तनिवास<br>हुद्दा- मदतनीस | स्वत: | Myxoid Liposarcoma (Post Operative) | डॉ. किरण गोरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 81,900/- | 80,520/- | |
| 37. | श्री अमोलिक लुसिया श्याम<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- सिस्टर इनचार्ज | पती | Gallbladder with CBD Stone | डॉ. रामनाईक | दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | 19,999/- | 19,999/- | |
| 38. | श्री. खरात बाळासाहेब किसन<br>विभाग- आरोग्य विभाग<br>हुद्दा- मदतनीस | आई | Cancer of Lung | डॉ. शर्मा | टाटा ममोरियल हॉस्पिटल, मुंबई | 8,317/- | 8,317/- | |
| 39. | शेख शकीला सलिम<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- आया | पती | Mouth Cancer | डॉ. रामनाईक | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 1,32,810/- | 1,28,401/- | |
| 40. | श्री धनवटे विजय दामोदर<br>विभाग- आरोग्य<br>हुद्दा- वॉर्डबॉय | आई | Ca Breast with THD with DM | डॉ. गोरे | प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी | 1,134/- | 1,134/- | |
| 41. | श्री. पठाण नसरुल्ला नुरखा<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- लिपीक | पत्नी | TBD | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 5,337/- | 5,337/- | |
| 42. | श्री. डांगे विलास सोपान<br>विभाग- संरक्षण<br>हुद्दा - वॉचमन | स्वत: | Ca. Buccal mucosa | डॉ. कुलकर्णी | टाटा मेमोरियल सेंटर व प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी | 16,226/- | 16226/- | |
| 43. | सौ. शेळके जयश्री शरद<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | वडील | Chronic Lymphocytic Lenukemia | डॉ. मेहरोत्रा | टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई | 95,717/- | 95,717/- | |
| 44. | सौ. गायकवाड जयश्री अंबादास<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- परिचारिका | पती | Upper GI Bleeding | डॉ. राम नाईक | के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे | 1,01,511/- | 97,751/- | |
| 45. | श्री बकरे दिलीप गंगाधर<br>विभाग - बांधकाम<br>हुद्दा - वरिष्ठ लिपीक | पत्नी | Polyrthitis | डॉ. जपे, डॉ. मेहरोत्रा | Deenanath Mangeshkar Hospital, Pune | 20,366/- | 20,366/- | |
| 46. | श्री तुपे उमाकांत नरेंद्र<br>विभाग - विद्युत विभाग<br>हुद्दा - तारतंत्री | आई | Severe Anaemia | डॉ. मेहरोत्रा | Rubi Hall Clinic, Pune | 17,929/- | 17.707/- | |
| 47. | श्री. झिंजाळ नरेंद्र अशोक | आई | Ca. Oesophagus | डॉ. राम नाईक | Pravara Medical Trust, | 8,159/- | 7,873/- | |

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग -कॅन्टीन<br>हुद्दा - मदतनीस | | | | Loni | | | |
| 48. | श्री जाधव भाऊसाहेब विनायक<br>विभाग- कॅन्टीन<br>हुद्दा - मदतनीस | स्वत: | Diabetis with Diabetic Nephropathy | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 56,217/- | 48,417/- | |
| | | | | | **एकूण** | **5,69,838/-** | **5,51,981/-** | |
| | **क- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| 49. | श्री. कोते यादव माधवराव<br>विभाग- संरक्षण<br>हुद्दा- पहारेकरी | आई | Rt Corneal DSAEK | डॉ. सोनटक्के | सुशिल आय हॉस्पिटल, औरंगाबाद | 26,189/- | 20,647/- | |
| | | | | | **एकूण** | **26,189/-** | **20,647/-** | |
| | **ड- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| 50. | श्री. मधुकर जयराम महाजन<br>विभाग- मुंबई कार्यालय<br>हुद्दा- वरिष्ठ लिपीक | स्वत: व मुलगा | Psychatric diseas | डॉ. दिलीप पाटील<br>डॉ. अद्वैत पाध्ये | मानस सायकोलॉजिकल हेल्थ सेंटर | 7,079/- | 4,463/- | |
| 51. | श्री. दुर्गे रामचंद्र बाबू<br>विभाग- मुंबई कार्यालय<br>हुद्दा - पर्यवेक्षक | स्वत: मुलगा पत्नी | मधुमेह व जनरल | डॉ. संदिप भेंडावडेकर, डॉ. रेश्मा भेंडावडेकर | Mangalmurti Hospital & Clinic | 4,323/- | 3,458/- | |
| 52. | डॉ. कौशिक हिराजीभाई मकवाना<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - प्र. वैद्यकीय अधिक्षक | आई | Pneumonia | Dr. Hardik Shah | शास्त्रीजी महाराज हॉस्पिटल, वडोदरा | 16,977/- | 10,573/- | |
| | | | | | **एकूण** | **28,379/-** | **18,494/-** | |
| | | | | | **अ+ब+क+ड= एकूण** | **8,76,875/-** | **8,36,525/-** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव त्यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रीक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु.८,३६,५२५/- इतकी आहे.

उपरोक्त पैकी अ. क्र. ४७ श्री. झिंजाळ नरेंद्र अशोक यांचे वैद्यकीय बिल परतावा अर्ज ३ महिन्यांचे मुदतीनंतर प्राप्त झालेला आहे. वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये ३ महिन्यांनंतर बिले परताव्यासाठी सादर केलेली बिले नियमावलीनुसार देय होत नाही. परंतू त्यांनी त्यांचे विनंती अर्जात त्यांच्या मातोश्री कै. झिंजाळ कुसुम अशोक यांचे निधन झाल्यामुळे त्यांना सदरचे बीले मुदतीत सादर करता आली नाही अशी विनंती केली आहे. तेव्हा सदर बिलाबाबत पुढील योग्य तो आदेश व्हावा ही विनंती.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** नियमावली प्रमाणे छाननी केली असून देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या तक्त्यातील अ, ब, क व ड मधील संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२५ श्री साईनाथ रुग्णालयातील सुवर्णजयंती उत्सवाचे नियोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १४/०५/२०१४ रोजी श्री साईनाथ रुग्णालयाच्या रुग्ण सेवेस ५० वर्ष पुर्ण होत आहे. त्या निमित्त श्री साईनाथ रुग्णालयाची सुवर्णजयंती साजरी करण्यासाठी दि. १३/१२/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय क्र. १९ निर्णय क्र. ९५१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर सुवर्णजयंती महोत्सव साजरा करणेसाठी मोठया प्रमाणावर नियोजन करावे लागणार आहे. याबाबत आत्तापर्यंत वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात आली असून ज्या नागरीकांकडे अथवा माजी कर्मचाऱ्यांकडे गेल्या ५० वर्षातील रुग्णालयाची छायाचित्रे उपलब्ध असल्यास ती नियोजन समितीकडे सुपुर्त करणेबाबत आवाहन करण्यात आले आहे. याबरोबरच संस्थानचे वेबसाईटवर सदर कार्यक्रमाची लिंक देवून साईनाथ रुग्णालयाबाबतचे ऐतिहासिक दस्तावेज उपलब्ध करुन देण्याचे आवाहन करण्यात

आले आहे. तसेच रुग्णालय आस्थापनेमधील माजी कर्मचाऱ्यांची यादी कामगार विभागामार्फत मागविण्यात आलेली आहे.

कार्यक्रमाचे अंतिम स्वरुप व मसुदा तयार करणेसाठी खालील बाबींचा निर्णय घ्यावा लागणार आहे.

१) कार्यक्रमाची तारीख, वेळ व स्थळ निश्चित करणे.
२) जनसंपर्क विभागामार्फत निमंत्रण पत्रिका तयार करुन वितरीत करणे.
३) कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व विशेष निमंत्रितांची नांवे निश्चित करणे.
४) सदर कार्यक्रमा निमित्त वैद्यकीय अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली जनसंपर्क विभाग व प्रकाशने विभाग यांचे मार्फत स्मरणिका छपाई करुन प्रकाशित करणेबाबत निर्णय घेणे.
५) सदर कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपण व जनसंपर्क विभागामार्फत ऑडीओ व्हिज्युअल डॉक्युमेंट्री तयार करणे.
६) कार्यक्रमानिमित्त प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय व कलामार्गदर्शक, कन्याशाळा यांचे मार्गदर्शनाखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणे
७) सर्व मेडीकल व पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांना स्मृती चिन्हे भेट देणे. यासाठी स्मृती चिन्हे काय दयावीत याबाबत निर्णय घेणे.
८) सुवर्णजयंती निमित्त रुग्णालयीन मेडीकल व पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर एक अतिरीक्त वेतनवाढ मंजूर करणे.
९) सुवर्णजयंती निमित्त संपूर्ण मे महिन्यात बाहय रुग्ण तपासणी पुर्णपणे मोफत करणे. तसेच या महिन्यात विविध शिबीरांचे आयोजन करणे.
१०) कार्यक्रमाच्या दिवशी प्रमुख पाहुण्यांसाठी मोफत चहा, कॉफी, बिस्कीटे, कँन्टीन विभागामार्फत व अल्पोपहार, भोजन इ. ची श्री साई प्रसादालयामार्फत व्यवस्था करणे तसेच माजी कर्मचा-यांना मोफत निवास व भोजनाची व्यवस्था करणे.

सदर सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम संस्मरणीय होणेसाठी जनसंपर्क विभागामार्फत व्यावसायिक इव्हेंट ऑर्गनायझर यांची नियुक्ती करावी, असे मत आहे.

तरी उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता श्री साईनाथ रुग्णालय "सुवर्णजयंती महोत्सव" सादर करणेकामी अंदाजे रु. ०९ लाख इतका खर्च येईल. सदरहू अंदाजे खर्चास तसेच उपरोक्त बाबींवर चर्चा करुन निर्णय होणेसाठी विनंती.

**निर्णय क्र.३१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या रुग्ण सेवेस ५० वर्ष पुर्ण होत असलेनिमित्त श्री साईनाथ रुग्णालय "सुवर्णजयंती महोत्सव" साजरा करण्यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं. १ ते १० बाबींपैकी अ.नं.०८ वगळता इतर बाबींवर कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६ श्री.ऋषीकेष दत्तात्रय बोगा, कंत्राटी कर्मचारी, श्री साई प्रसादालय यांना वैद्यकिय उपचाराकामी मेडीकलचा व दवाखाण्याचा आलेला खर्च मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री ऋषीकेष दत्तात्रय बोगा (कंत्राटी कर्मचारी प्रसादालय विभाग) हे दि.२९/१२/२०१३ रोजी प्रसादालयात प्रसादभोजन वाहून नेत असताना त्यांच्या पायावर गरम भाजीचा कॅन सांडल्यामुळे त्यांचा डावा पाय मोठया प्रमाणात भाजलेला होता. श्री ऋषीकेष दत्तात्रय बोगा यांचा वैद्यकिय उपचार साईबाबा हॉस्पीटल मध्ये न झाल्याने साईबाबा हॉस्पीटलचे डॉक्टर यांचे सल्ल्यानुसार पुढील उपचारासाठी प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी येथे पाठविणेत आले होते.

श्री.ऋ षीकेष दत्तात्रय बोगा, कंत्राटी कर्मचारी यांचा डयुटीवर असतांना अपघात झालेला असल्याने उपरोक्त संदर्भिय अ.नं.१ अन्वये औषध उपचार घेणेसाठी आलेल्या खर्चाची बिले तसेच दवाखाण्याचा खर्च त्यांनी सादर केलेनंतर श्री साईबाबा हॉस्पीटलमार्फत आपात्कालीन वैद्यकिय खर्च म्हणून श्री बोगा यास देणेस मान्यता घेणेत आलेली आहे.

उपरोक्त संदर्भीय अ.नं.२ अन्वये श्री बोगा यांनी स्वतःचे वैद्यकिय उपचारासाठी प्रस्तुत बिलांप्रमाणे उसणवार पैसे घेऊन खर्च केलेला आहे. त्याकामी आलेल्या रक्कम रु. १०३७९/- (अक्षरी रुपये-दहा हजार तिनशे एकोणऐंशी मात्र) ची बिले सादर केलेली असून झालेल्या खर्चाची मागणी केलेली आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | मेडीकलचे नांव | बिल नं | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५८२७२ | २९/१२/२०१३ | ६४७.०० |
| २ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५८१४२ | २९/१२/२०१३ | ९१.०० |
| ३ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५८१२१ | २९/१२/२०१३ | ६१५.०० |
| ४ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५८८४६ | ३०/१२/२०१४ | ३१८.०० |

| अ.नं. | मेडीकलचे नांव | बिल नं | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ५ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५९४८२ | ३१/१२/२०१३ | २५.०० |
| ६ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५९४५० | ३१/१२/२०१३ | १०६.०० |
| ७ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५९९४६ | ०१/०१/२०१४ | ३६०.०० |
| ८ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १५९६५५ | ०१/०१/२०१४ | ३२.०० |
| ९ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६०५३८ | ०२/०१/२०१४ | २८२.०० |
| १० | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६११५३ | ०३/०१/२०१४ | ५९.०० |
| ११ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६०९११ | ०३/०१/२०१४ | १६५.०० |
| १२ | कॅश रिसीप्ट | २७६६६A१ | ०३/०१/२०१४ | १०००.०० |
| १३ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६१७२७ | ०४/०१/२०१४ | ५२५.०० |
| १४ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६१४८२ | ०४/०१/२०१४ | २४६.०० |
| १५ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६२१४८ | ०५/०१/२०१४ | ९१.०० |
| १६ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६२१०२ | ०५/०१/२०१४ | ७४.०० |
| १७ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६३२०७ | ०७/०१/२०१४ | २००.०० |
| १८ | प्रगती मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, लोणी | १९६ | ०७/०१/२०१४ | ९९.०० |
| १९ | कॅश रिसीप्ट | २७८७५A१ | ०७/०१/२०१४ | १५००.०० |
| २० | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६३७४४ | ०८/०१/२०१४ | ६१७.०० |
| २१ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६४९७५ | ११/०१/२०१४ | १०.०० |
| २२ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६५२१९ | ११/०१/२०१४ | १९२.०० |
| २३ | कॅश रिसीप्ट | २८१९३A१ | ११/०१/२०१४ | २९७५.०० |
| २४ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट, ड्रग स्टोअर, लोणी | १६८६१४ | १८/०१/२०१४ | १५०.०० |
| | | | **एकुण रक्कम रुपये** | **१०३७९.००** |

(अक्षरी रुपये-दहा हजार तिनशे एकोणऐंशी मात्र)

तरी श्री ऋषीकेष दत्तात्रय बोगा, कंत्राटी कर्मचारी यांनी उपरोक्त प्रमाणे औषध उपचार घेणेसाठी आलेल्या खर्चाची बिले व दवाखाण्याचा खर्च रक्कम रु.१०,३७९/- सादर केलेला असून सदरचा खर्च श्री साईबाबा हॉस्पीटलमार्फत आपात्कालीन वैद्यकिय खर्च म्हणून श्री ऋषीकेष दत्तात्रय बोगा, कंत्राटी कर्मचारी यास मिळावे अशी शिफारस विभाग प्रमुख यांनी केलेली आहे. श्री बोगा हे कंत्राटी कर्मचारी आहे व ते ड्युटीवर असताना त्यांना दुखापत झालेली आहे या पूर्वी अशा प्रकारे ड्युटीवर असताना व विभाग प्रमुख यांनी शिफारस केलेली असल्यास विशेष बाब म्हणून मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन मदत केलेली आहे.

त्यामुळे सदरचा प्रस्ताव विशेष बाबींमधून मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ऋषीकेष दत्तात्रय बोगा, कंत्राटी कर्मचारी, श्री साई प्रसादालय यांना ड्युटीवर असताना अपघात झालेला आहे. तसेच यापुर्वीही कंत्राटी कर्मचाऱ्यास ड्युटीवर असताना काही अपघात झाल्यास त्याचा वैद्यकिय खर्च संस्थानने केलेला आहे. यामुळे एक विशेष बाब म्हणून श्री.ऋषीकेष दत्तात्रय बोगा, कंत्राटी कर्मचारी, श्री साई प्रसादालय यांना वैद्यकिय खर्चापोटी आलेल्या रु.१०,३७९/- मात्र रकमेचा परतावा देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७** **मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३४ मध्ये दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्य.स.सभेच्या दि.१८.१०.२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.८३४ ची प्रत कार्यवाहीस्त प्राप्त झालेली असुन, सदर निर्णयाचे अवलोकन केले असता, मुद्दा क्र.२ च्या शेवटी असे नमुद करण्यात आले आहे की, **कोणत्याही परिस्थितीत रूग्ण निहाय थेट औषध खर्च परतावा देण्यात येवु नयेछ.**

या बाबत असे निदर्शनास आणुन देण्यात येते की, संबंधित डॉक्टर्स्नी रूग्णास प्रिस्क्राईब करून दिलेली औषधे, औषध खरेदी विभागास, स्थानिक मार्केट किंवा बाहेरील इतर ठिकाणाहुनही उपलब्ध होवु शकली नाहीत, परंतु, रूग्ण किंवा रूग्णांच्या नातेवाईकांनी सदर औषधे बाहेरून कुठुनही रोखीने खरेदी करून आणल्यास, अशा परिस्थितीत, संबंधित रूग्णांकडुन, सदर औषधांची पक्की बिले, औषध खरेदी विभागाने तपासुन घेवुन, संबंधित रूग्णांस, अशा औषधांच्या बिल रकमेचा परतावा रोखीने तत्काळ अदा करणे आवश्यक व बंधनकारक आहे, तसेच दुसरे कारण असे की, एखादया रूग्णांने १८००२३३२२०० टोल फ्री नंबरवर तक्रार केल्यास, सदर तक्रारीची तातडीने दखल घेण्यात येवुन, हॉस्पिटलच्या बिलांचे पेमेंट स्टॉप केले जाते, रूग्णास रक्कम रिफंड, करून, तसा फोटो ऑन लाईन अप-लोड करून पाठविल्यासच, सदर तक्रारीचे निराकरण होते.

तरी, सदर योजनेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडणे, रूग्णांची गैरसोय होवु नये व हॉस्पिटलबाबत तक्रारी होवु नयेत म्हणुन, दि.१८.१०.२०१२, रोजीच्या सभेतील, नि.क्र.८३४ मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

| क्र. | मुद्दा | ठरावातील तपशिल | बदल आवश्यक असलेला तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मुद्दा क्र.२ | मुद्दा क्र.२ च्या शेवटच्या ओळीमध्ये कोणत्याही परिस्थितीत रूग्ण निहाय थेट औषध खर्च परतावा देण्यात येवु नये, असे नमुदआहे. | त्या ऐवजी, संबंधित रूग्णांस रू.५,०००/- पर्यंतच्या रकमेचा, औषधे, ब्लड इ.खर्चाचा परतावा रोखीने देता येवु शकेल, असे ग्राहय धरण्यात यावे. |
| २. | मुद्दा क्र.३ | विषयातील मुद्दा क्र.३ मधील, सदर महत्वाच्या बाबीचा निर्णय, निर्णय क्र.८३४ मध्ये नमुद करण्याचे राहुन गेलेले आहे. | मेडिसीन इ.विभागातील रूग्णांची बिले मंजुर रकमेपेक्षा कमी झालेली असली, तरीही, अशा रूग्णांची बिले Society Approval रकमेनुसार सादर करण्यात यावीत, कारण, मा.त्रि-सदस्यीय व्य.स.सभेमध्ये संबंधित विमा कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सविस्तर चर्चा करून मान्य केल्यानुसार, काही प्रोसिजर्स्साठी पॅकेज दर कमी असले तरी, इतर काही प्रोसिजर्स्च्या पॅकेजेस् दर जास्त असल्याने, हॉस्पिटलला Counter Subsidy मिळुन, हॉस्पिटलचे आर्थिक नुकसान होणार नाही, असे मान्य करण्यात आलेले असल्याने, त्यास मान्यता देण्यात आली. |

तरी, सदर विषय मा.त्री-सदस्यीय व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.३१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत येवून, मा.त्रिसदस्य समितीच्या दि.१८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३४ कायम ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८ Biomedical Waste (Management & Handling) Rules 1998 ऑथोरायझेशन पत्र अंतर्गत बँक गॅरंटीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथे पर्यावरण व वनसंरक्षण खाते मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. २० जुलै १९९८ रोजी जैवीक वैद्यकिय निरुपयोगी व टाकाउ वस्तुंचे विल्हेवाटीकरीता काही नियम-अटी व कायदापालनासाठी जारी केलेल्या अधिसुचनेनुसार जैव वैद्यकिय कचरा (घनकचरा व सांडपाणी) निर्मीती, हाताळणी व व्यवस्थापन करणेत येत आहे. सदरकामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण (म. प्र. नि.) मंडळ यांचेकडुन अधिकारपत्र (Authorization Letter) सन २००६ ते २०१२ व नुकतेच २०१२ ते २०१५ या कालावधीसाठी प्राप्त करणेत आले आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण (म. प्र. नि.) मंडळाने श्री साईबाबा संस्थान रुग्णालयांकरीता दिलेल्या अधिकार पत्रातील नियम-अटि तसेच म. प्र. नि. मंडळाचे अधिकाऱ्यांनी सुचविल्याप्रमाणे जैव वैद्यकिय घनकचरा पुढील प्रक्रिया व कार्यवाहीकरीता सार्वजनीक रित्या जैव वैद्यकिय घनकचरा व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस देणे बंधनकारक आहे. त्यानुसार म. प्र. नि. मंडळाची मान्यताप्राप्त अहमदनगर जिल्हयासाठी अधिकृत संस्था मे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचेकडे दोन्ही हॉस्पिटलमधुन निघणारा जैव वैद्यकिय घनकचरा पुढील विल्हेवाटीकरीता दररोज देणेत येत आहे. तसेच दोन्ही हॉस्पीटलचे सेप्टीक टँकमधील सांडपाणी स्वतंत्र Sewage Treatment Plant (STP) मध्ये प्रक्रिया केले जात आहे.

म. प्र. नि. मंडळाने सन २०१२ ते २०१५ या कालावधीसाठी देण्यात आलेल्या अधिकारपत्रात दोन्ही हॉस्पीटलसाठी प्रत्येकी ३.०० लाख रू. बँक गॅरंटीसह काही नियम व अटींची पुर्तता करण्यास कळविले असुन संस्थानच्या संबंधीत विभागाद्वारे नियोजन, पुर्तता व कार्यवाही करून बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट विभागाकडे कागदपत्रे त्वरीत सादर करावयाचे कळविले आहे.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ हास्पीटलसाठी एकुण रू. ६,००,०००/- (अक्षरी रू. सहा लाख मात्र) इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता घेणेस्तव व सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२९ सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीमध्ये दर प्राप्त न झालेल्या औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी फेर ई-निविदेची वर्तमान पत्रात जाहिरात देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य व On Consignment Basis साहित्य वरील खरेदीस व याकामी येणाऱ्या एकूण अंदाजे रु.४८,६६,६४,२५२/- चे खर्चास दि.२६/०७/२०१३ चे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.५६४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

मा. त्रिसदस्य समिती सभेतील मंजूरीनूसार व मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि. २५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये विविध वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई निविदा मागविण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार सदरचे खरेदीकामी मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक-अहमदनगर, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी, सरकारी सहाय्यक वकील-औरंगाबाद खंडपीठ, वैद्यकीय संचालक-श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी, वैद्यकीय अधिक्षक-श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी सदस्यांची समिती गठीत करुन खरेदीची प्रक्रिया पूर्ण करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानूसार सदर प्रतीनिधींची दि.२२/११/२०१३ रोजी शिर्डी येथे सभा आयोजित करण्यात आली होती.

सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन त्याकामी संस्थान तर्फे सकाळ - पुणे, लोकमत - नागपूर, टाईम्स ऑफ इंडीया- अहमदाबाद, मुंबई, दिल्ली व चंदीगढ या वर्तमान पत्रातून ई निविदा संबंधीत जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.०४/०१/२०१४ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानूसार एकूण ७५ निविदा प्राप्त झाल्या होत्या.

उपरोक्त तांत्रीक निविदा मा. उप समितीची सभा दि.०६/०१/२०१४ रोजी समक्ष उघडण्यात आल्या होत्या तद्नंतर सदर तांत्रीक निविदाधारकांनी निविदे सोबत मागणी केलेल्या कागदपत्राची तपासणी करणेकामी तक्ता बनवून तो मा. उच्च न्यायालयाने घटीत केलेल्या समितीचे सभेपुढे दि.२५/०१/२०१४ रोजी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेसाठी समितीचे पुढील सदस्य उपस्थित होते. १) ॲड. श्री. पी.पी. मोरे- सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष), २) डॉ. कौशीक मकवाना- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी. (सचिव), ३) डॉ. कोकरे आशिष- अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक-अहमदनगर, (सदस्य) ४) डॉ. अविनाश आहेर- अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी- अहमदनगर (सदस्य) ५) डॉ. संजय पठारे- वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. (सदस्य)

सदर समितीने प्राप्त निविदाधारकांनी दिलेल्या कागदपत्रे पाहुन चर्चा त्यावर सांगोपाग चर्चा करुन सर्वानुमते तांत्रीक निविदा पात्र ठरवण्यात आल्या तद्नंतर त्याच दिवशी सर्व पात्र निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा हया समितीपुढे उघडण्यात आल्या व तद्नंतर सर्व निविदाधारकांना सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलवण्यात आले होते. तांत्रीक निविदा उघडल्यानंतर सर्व उपस्थित (६२) निविदाधारकांना समिती सभेपुढे समक्ष बोलवून त्यांना सुचना देऊन त्याच्या कडून छापील पत्रावर सुट घेण्यात आली होती.

तद्नंतर सर्व निविदाधारकांनी त्याचे मुळ दरावर दिलेली सुट व मुळ दर यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निर्णय घेणेकामी दि.१५/०२/२०१४ व दि.१९/०२/२०१४ रोजी समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. सदरचे सभेसाठी समितीचे पुढील सदस्य उपस्थित होते. १) ॲड. श्री. पी.पी. मोरे - सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष), २) डॉ. गोकुळ घोगरे- वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिनिधी. (सदस्य), ३) डॉ. अविनाश आहेर- जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी- अहमदनगर (सदस्य), ४) डॉ. प्रभाकर राव- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी. (दि.१५/०२/१४), ५) डॉ. कौशिक मकवाना- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी. (दि. १९/०२/१४), ६) डॉ. संजय पठारे- वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. (सदस्य)

सदर समितीने खरेदीकामी शिफारस करणेसाठी खालील मुद्दयाचा विचार करण्यात आलेला आहे.

१. ज्या औषधांकरिता कोणत्याही निविदाधारकांची निविदा प्राप्त झालेली नाही त्यासाठी फेर ई-निविदा मागविण्यात यावी.
२. जर क्र.१ (L१) साठी नामांकित कंपन्याचे Branded किंवा Generic औषधांसाठी दर प्राप्त झालेले असतील तर तेथे त्यांची शिफारस करण्यात यावी.
३. मागील वर्षी ज्या औषधांचा / साहित्यांचा वापर करत असतांना काही तक्रार प्राप्त झालेली असेल तर त्याठिकाणी संबंधीत कंपन्यांचा विचार न करता दुसऱ्या नामांकित कंपनीची शिफारस करण्यात यावी.
४. कार्डीयाक व कार्डीओलॉजी या अत्यंत महत्वाच्या व गुंतागुतीच्या शस्त्रक्रिया असतात अशा रुग्णांना रुग्णालयात दाखल आहे तो पर्यंत उच्च प्रतीचे प्रतिरोधक औषधे (Higher Antibiotics Injections) ही दराचा विचार न करता नामांकित कंपन्याची व गत वर्षीचा अनुभव बघुन शिफारस करावी अशी Higher Antibiotics Injections वापरल्याने रुग्णाची रिकव्हरी लवकर होऊन रुग्णास लवकर सोडण्यात येते.
५. प्रयोगशाळा, ब्लड बँक, केमिकल्स, आयुर्वेदीक औषधे इ. ठिकाणी संबंधीत वापर करणारे डॉक्टराचा सल्ला घेऊन शिफारस करण्यात यावी.
६. ज्या सर्जिकल साहित्याचा नमुना पाहुन निर्णय घेणे आवश्यक आहे त्याठिकाणी त्याचा नमुना बघुन निम्नतम दराचा विचार न करता शिफारस करण्यात यावी.

७. जी औषधे / साहित्य / केमीकल्स इत्यादीसाठी समाधानकारक दर / कंपन्या न आल्यास किंवा काही विशिष्ट ठिकाणी विशिष्ट कंपनीचेच साहित्य / केमीकल्स आवश्यक आहे त्यासाठी देखील दर प्राप्त झालेले नसतील तर अशा ठिकाणी फेर निविदा मागविण्यास शिफारस करण्यात आली.

८. ॲलोपॅथीक औषधांसाठी शिफारस करण्यात आलेल्या कंपनीचे औषधे पुरवठा आदेशानुसार प्राप्त झाल्यानंतर त्या औषधांचा संबंधीत पुरवठाधारकाकडुन माला सोबत प्रत्येक Batch wise Drug Analysis Report मागवुन घेण्यात यावा. त्याचेकडील Drug Analysis Report बरोबर आहे किंवा कसे ? याची पुर्नपडताळणी करणेकामी शासन मान्य प्रयोगशाळेत काही औषधे तपासणीकामी पाठविण्यात यावे.

९. ज्याठिकाणी २ किवा ३ कंपन्याचे सारखेच दर प्राप्त झालेले असतील तर अशा ठिकाणी सदर मागणीची संख्या सम प्रमाणात विभागुन देण्यात यावी.

१०. औषधांची निवड करत असतांना दोन्ही रुग्णालयासाठी मोठया प्रमाणात लागणारे काही सलाईनसाठी एकाच कंपनीचे दर प्राप्त झालेले असल्यामुळे याकामी फेर निविदा मागविण्यात यावी. परंतु रुग्णालयातील दैनंदिन गैरसोय होऊ नये म्हणून ३ महिने पुरेल इतका साठा प्राप्त झालेल्या कंपनीचा Denis Chem मे.महेश सर्जिकल ॲन्ड फार्मासिटीकल्स, पुणे यांचेकडुन खरेदी करण्याची शिफारस करण्यात आली.

११. सुचर्स मटेरीयलकरीता यापुर्वी रुग्णालयात वापरत असलेल्या Johnson & Johnson या कंपनीचे सुचर्सचा रिझल्ट समाधानकारक असल्यामुळे तसेच त्यांच्या कोणत्याही आयटमची तक्रार नसल्यामुळे सुचर्स मटेरीयल त्यांचेकडून खरेदी करण्यात यावे, तसेच ज्या ठिकाणी Johnson & Johnson या कंपनीचे दर प्राप्त झालेले नसतील त्याठिकाणी प्राप्त निविदाधारकांचे कंपनीबाबत वापरणारे डॉक्टर यांचा सल्ला घेऊन खरेदीकामी शिफारस करण्यात यावी.

१२. सर्पदंशासाठी लागणारे इंजेक्शन ASV हे व्हॅक्सीन Life Saving औषध असून त्यासाठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाहीत. सदरचे इंजेक्शन हे दोन्ही रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना मोफत वापरण्यात येतात. सदर इंजेक्शन बनवणारी Haffkine Bio Pharmaceuticals, Mumbai ही शासकीय उत्पादक कंपनी असून त्यांचेकडून ती थेट खरेदी करावी अशी शिफारस करण्यात आली.

१३. हिमोफिलीया रुग्णांसाठी लागणारे इंजेक्शन (Factor VIII) हे पुर्वी फक्त अहमदनगर जिल्हयातील रुग्णांना मोफत देण्यात येत होते. परंतु आता सदरचे इंजेक्शन जिल्हया बाहेरील रुग्णांना देखील मोफत देण्याचे ठरलेले आहे त्यामुळे सदर इंजेक्शनचा खप वाढलेला आहे. सदरचे इंजेक्शन हे जितके लागेल तितक्या प्रमाणात (On Consignment Basis) वर हिमोफिलीया सोसायटी, नाशिक यांचेकडुन त्यांचे सध्याचे दर प्रती युनिट रु. १०/- प्रमाणे त्यांना वेळोवेळी आगाऊ रक्कम देऊन खरेदी करण्यात यावी. कारण निविदामध्ये सदर इंजेक्शनसाठी M/s. Span Medicare, Mumbai यांचे एमकेव दर प्राप्त झालेले असून ते प्रती युनिट रु.२२/- असे आहे.

वरील शिफारशीनुसार एकुण ६६ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही चालू असून त्याची एकुण रक्कम रु. ३०५२८८३५७.८४ इतकी होत आहे.

खरेदी समीतीने केलेल्या शिफारशीनूसार मुद्दा क्र. १, ७ व १० यांचा विचार करता एकूण ४६३ औषधांकरिता कोणत्याही निविदाधारकांची निविदा प्राप्त झालेली नाही तर १४२ औषधे/ सर्जिकल साहित्याकरीता फेर निविदा मागवाव्या लागणार आहेत सदर एकूण ६०५ औषधे/ सर्जिकल साहित्याकरीता एकूण रक्कम रु.४,८८,६८,५९९/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार सोबतच्या यादीतील एकूण ६०५ औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामीची फेर ई-निविदा करावी लागणार आहे. त्यासाठी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत विविध वर्तमान पत्रात सोबतच्या मसूद्याप्रमाणे जाहीरात द्यावी लागणार आहे.

<u>**अ)**</u> यापूवी सदरचे खरेदीकामी सुरवातीस विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन त्याकामी संस्थान तर्फे सकाळ- पुणे, लोकमत- नागपूर, टाईम्स ऑफ इंडीया- अहमदाबाद, मुंबई, दिल्ली व चंदीगढ या वर्तमान पत्रातून ई निविदा संबंधीत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती व त्यासाठी अंदाजे रु.९,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती व त्याकरीता रक्कम रु.७,२५,०००/- इतका खर्च आलेला होता. सोबतच्या यादीतील औषधांकरीता अंदाजे रक्कम रु.४,८८,६८,५९९/- इतका खर्च येणार आहे. जर सदरच्या खरेदीकामी पुन्हा संस्थानतर्फे वरील वर्तमान पत्रात जाहिरात दिल्यास त्याकामी पुन्हा रक्कम रु.७,२५,०००/- इतका खर्च येईल.

**किंवा**

<u>**ब)**</u> महाराष्ट्र शासनाचे माहिती व जनसंपर्क महा संचनालय महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई या विभागामार्फत जाहिरात दिल्यास त्याकरीता अंदाजे रक्कम रु.१,५०,०००/- पर्यंत खर्च येईल.

तरी उपरोक्त अ किंवा ब प्रस्तावावर निर्णय होणेस विंनती.

**निर्णय क्र.३१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील परिच्छेद अ प्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३० श्री साईनाथ रुग्णालयात मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री प्रकाश गंगवाणी, मुंबई यांचे मोफत योगदानातुन रविवार दिनांक १६ फेब्रुवारी २०१४ ते १९ फेब्रुवारी २०१४ अखेर श्री साईनाथ रुग्णालयात मोफत नेत्रतपासणी, नंबरचे चष्मे वाटप व मोतिबिंदू शिबीराचे आयोजन करणेत आले होते. या शिबीरात शिरडी व परिसरातील एकूण ४५० गरीब/ गरजू रुग्ण नेत्रतपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ३४३ रुग्णांना नंबरचे चष्मे साईभक्त, श्री प्रकाश गंगवाणी, मुंबई यांचेमार्फत मोफत देणेत आले आहे.

तसेच शिबीरात आलेल्या रुग्णांच्या तपासणीतुन एकूण ३१ रुग्णांची मोतिबिंदू शस्त्रक्रियेकरिता निवड करणेत आली होती. त्यातील २५ रुग्णांवर दि.१७/०२/२०१४ ते दि. १९/०२/२०१४ या कालावधीत संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामार्फत मोफत मोतिबिंदु शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहे. अशाप्रकारे गरजू २५ रुग्णांवर संस्थान रुग्णालयामार्फत मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया केल्या असून, संस्थानला याकामी प्रत्येक रुग्णाकरिता खालील प्रमाणे अंदाजे प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रित्या खर्च आलेला आहे.

| Sr.No. | Investigation,Operation& Other | Approx. Expenditure |
|---|---|---|
| 01 | Lab Investigation | Rs. 202.00 |
| 02 | ECG | Rs. 30.00 |
| 03 | Visco | Rs. 120.00 |
| 04 | Goggal Cost | Rs. 20.00 |
| 05 | Operation Cost | Rs. 550.00 |
| 06 | Hospital Accommodation Charges etc. | Rs. 06.00 |
| 07 | Other (Tea, Lunch,Dinner) | Rs. 22.00 |
| | **Per Pts.Expenditure-** | **Rs. 950.00** |

उपरोक्त प्रमाणे २५ रुग्णांकरिता अंदाजे रु.२५,०००/- इतका तसेच याकामी इतर अनुशंगीक (ओषधे, जाहिरात, कनाद/कापड बांधणी, मान्यवरांची निवास व भोजन व्यवस्था, इ.) अंदाजे खर्च रु.७५,०००/- मिळुन एकूण अंदाजे रु. १,००,०००/- इतका प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष रित्या खर्च आलेला आहे.

तरी उपरोक्त शिबीरकामी आलेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अंदाजे रु. १,००,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१ श्री साईनाथ रुग्णालयात किडनी स्टोन शिबीराकरीता तातडीने केलेल्या औषधे/ साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१०/०१/२०१० रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ३३ अन्वये प्रत्येक तीन महिन्यातुन एकदा किडनी स्टोन शिबीराचे आयोजन करणेस व याकामी प्रत्येक शिबीरातील अंदाजे ५० रुग्णांकरिता येणाऱ्या रु. २,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार नेहमीप्रमाणे दि.१७/०१/२०१४ ते दि.१९/०१/२०१४ अखेर तीन दिवस किडनी स्टोन (Kidney Stone) शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते. या शिबीरामध्ये छोटया १ ते १ १/२ c.m साईजच्या स्टोनवर Sound waves च्या (Lithotripsy) साह्याने उपचार करण्यात आलेले आहे. तसेच (Percutaneous Nephrolithotomy) (P.C.N.L) मोठे स्टोन असलेल्या रुग्णांवर दुर्बिणीने शस्त्रक्रिया केलेली आहे. यासाठी ५० रुग्णावर उपचार करणेत आले होते.

त्यानुसार, श्री साईनाथ रुग्णालयाने कळविलेले साहित्य खरेदी करुन देण्यात आलेले आहे. सदरचे शिबिराकामी एकूण रु. २५०००० ची मा. त्रिसदस्यीय समितीची मंजुरी आहे त्यापैकी गुजरात किडनी स्टोन फाऊंडेशन यांना मानधन रु. ६५००० अदा करण्यात आलेली असून त्यापैकी रक्कम रु. १८२९४२ इतकी शिल्लक होती. त्यामुळे रु. १८२९४२ ची औषधे दि. १७/०३/२०१४ चे मंजुर टिपणी अन्वये अदा करण्यात आली आहे. सध्या दोन्ही रुग्णालयात वार्षिक औषधे खरेदीचा पुरवठा आदेश न गेल्यामुळे औषधांचा व सर्जिकल साहित्यचा मोठ्या प्रमाणात तुटवडा आहे. त्यामुळे मुळ मंजूरी व्यतिरिक्त काही साहित्य सदर शिबिरासाठी तातडीने खरेदी करुन द्यावी लागली व त्यासाठी खरेदीकामी रु.६१७०३/- इतका खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | M/s. Hi-Tech surgical System, Mumabi | 8311 | 17/01/2014 | 26063.00 |
| 2. | M/s. Biomedicon System, Mumbai | 3018 | 17/01/2014 | 35640.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **61703.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे रक्कम रु. ६१७०३/- चे जास्तीच्या खरेदीस व खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात किडनी स्टोन शिबीराकरीता तातडीने केलेल्या औषधे/ साहित्य खरेदीकामी मुळ मंजुरीपेक्षा आलेल्या रु.६१,७०३/- मात्रचे जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील संगणकांचे दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये संगणकीय प्रणाली पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत असुन दोन्ही रुग्णालयाचे सर्व कामकाज संगणकीकृत करण्यात आले आहे. सदर संगणक संच कायम वापरात असल्याने त्यात वेळोवेळी बिघाड निर्माण होतात त्यांचे दुरुस्तीकरिता स्पेअर- पार्टस्ची आवश्यकता असते. तसेच संगणक संचामधील वापरात असणारे संगणक व प्रिंटर्स करिता स्पेअर- पार्टस् (Computer Peripherals- SMPS, RAM, mouse,Key board, Battery, Connector, Driver set, Mouse pad, Pen drive, Power card, Cable, Switch, panel, Printer-Head, Cable, pulley, Belt, bush, knob,Tractor, Gear, Refill (Black & Colour), Data Cable, Cartridges, Toner drum, blade, Roller, Connecting spring, Rod, bush, Teflon, sleev, Heater इ.) यांची आवश्यकता असते. दोन्ही रुग्णालयामध्ये सध्या वापरात असणाऱ्या संगणकांचा वॉरंटी कालावधी संपलेला असुन संगणक वेळीअवेळी बंद पडतात दैनंदिन कामकाजात अडचणी येऊ नये याकरिता संगणक दुरुस्तीकामी आवश्यक ते स्पेअर-पार्टस् व साहीत्य खरेदी करणे आवश्यक आहे.

आर्थिक वर्ष सन २०१३-१४ आजपावेतो संगणक दुरुस्तीकामी स्पेअर पार्टस् व इतर किरकोळ साहित्याकरिता रक्कम रुपये १,१२,३८४/- इतका खर्च झालेला आहे. सदरचा खर्च संस्थान नियमानुसार विहीत पध्दतीने करण्यात आलेला आहे. दोन्ही रुग्णालयातील बहुतेक संगणक संच बंद पडलेले आहेत व काही बंद पडणेच्या स्थितीत आहेत, त्याकरिता नवीन संगणक खरेदी प्रक्रिया राबवविणे गरजेचे आहे. तोपर्यंत दैनंदिन कामकाज चालु ठेवणे अनिवार्य असल्याने सदर संगणक दुरुस्ती व देखभाल करिता आवश्यक असणारे स्पेअर-पार्टस् व साहीत्य खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील संगणक देखभाल दुरुस्तीकामी आवश्यक असणारे स्पेअर पार्टस् व साहीत्य वार्षिक कॉन्ट्रॅक्टनुसार खरेदी करणेकामी संस्थानचे विहीत पध्दतीनुसार पुरवठा धारकांकडून कोटेशन मागविणेस व सदरचे कोटेशन हे मा. उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे समक्ष उघडुन त्यातील न्युनतम कोटेशन धारकाकडून संगणकीय साहीत्य खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये एकूण किती संगणके आहेत व त्यांच्या दुरुस्ती व देखभालीकरीता कोण-कोणते संगणकीय साहित्य, किती प्रमाणात खरेदी करावयाचे याचा आकडेवारीसहीत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३ श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आथोपेडीक) या विभागाकरीता Boyles with Ventilator खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडीक) या विभागाने दि.१३/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये Boyles Machine with Ventilator ०१ नगाची मागणी केलेली आहे. कारण जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थो) यांचेकडे सध्या असलेले Boyles Machine without Ventilator हे सन २००० या वर्षात खरेदी केलेले असून दैनंदिन वापरामुळे खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहे. सन २००० या वर्षात दोन नग Boyles Machine without Ventilator हे रक्कम रु.४,१९,६५६/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते, सध्या सदर दोन मशिनची घसारा वजा जाता किंमत रु१५,९९६/- इतकी आहे.

उपरोक्त Boyles Machine with Ventilator ०१ नग खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Excel Corporation, Nashik यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Boyles Machine with Ventilator | 01 | 725000.00 | 725000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **7,25,000.00** |

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडीक) विभाग यांचे दि.१३/०८/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२५/११/२०१३) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडीक) विभाग यांचेकडे सध्या असलेले Boyles Machine without Ventilator हे सन २००० या वर्षात खरेदी केलेले असून सदर मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१३ अखेर किंमत रु.१५,९९६/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु.५००००/- पेक्षा जास्त नसल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम नं. १७(४) अन्वये खरेदीपुर्वी शासनाची पुर्व मान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे नविन मशिन खरेदी करणेस व जुने मशिन Buyback करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे Boyles Machine with Ventilator ०१ नग विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.७,२५,०००/- चे खर्चास तसेच जुने मशिन Buyback करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.३२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आथोपेडीक) या विभागाकरीता आवश्यक असलेले ०१ नग Boyles with Ventilator विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.७,२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच जुने मशिन Buyback करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४** **श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T. ओ.टी. करीता ENT Micro Debrider System खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T ओ.टी करिता वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी E.N.T Micro Debrider System ची आवश्यकता आहे. कारण सध्या त्यांच्याकडे असलेली सदर E.N.T Micro Debrider System ही वारंवार नादुरुस्त होत आहे. सदर System मधील २ Micro Motar ही २००६ मध्ये खरेदी केलेल्या आहे व त्यापैकी १ सतत नादुरुस्त होत आहे तर १ Micro Motar २००५ मध्ये खरेदी केलेले आहे ती सध्या काम करत आहे, परंतु ती कधी कधी बंद पडु शकते. तसेच सदर System करिता वापरावे लागणारे Blades हे देखील १० ते १५ Surgery केल्यानंतर खराब होतात, त्यामुळे सदर सिस्टीमबरोबर Blade देखील लागणार आहे.

त्यामुळे त्यांनी दि.०२/०५/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग E.N.T Micro Debrider System व त्यासाठी लागणारे Blade ची देखील मागणी केलेली आहे.

सदर E.N.T Micro Debrider System खरेदीकामी M/s. Unique Endoservices, Pune यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दि.१३/०१/२०१४ रोजीचे ई-मेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Unique Endoservices, Pune यांनी त्यांचे दि.१०/०१/२०१४ रोजीचे ई-मेलद्वारे सदर E.N.T Micro Debrider System चे दर कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| Sr. No. | Catalogue No. | Name of item | Qty | Rate Per in Rs. |
|---|---|---|---|---|
| **A** | | | | |
| | 18-97102 | E.N.T Micro Debrider System Consisting of :- | 01 | |
| 1. | 18-97101 | Console with Irrigation pump and coolant pump | | 340000.00 |
| 2. | 1898200T | Straightshot M4 High-speed Microdebrider Handpiece | | 445000.00 |
| 3. | 3334800 | Visao High-Speed Otologic Drill | | 395000.00 |
| 4. | 3055601 | SKEETER OTO-TOOL Drill | | 180000.00 |
| 5. | 18-95420 | Multi-Function Foot-Switch | | 110000.00 |
| | | | **Amt. in Rs.** | **1470000.00** |
| **B** | | Blades for above machine reusable | | |
| 6. | 61884004HR | Rotatable Tricut Blade (5/Box) 1 Box = 5 Nos. | | 22500.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7. | 1884002HR | Rotatable Serrated Blade (5/Box) | | 26000.00 |
| 8. | 1884012HR | Rotatable RAD 12 Blade (5/Box) | | 38000.00 |
| 9. | 1884006HR | Rotatable RAD 40 Blade (5/Box) | | 39000.00 |
| 10. | 1884016HR | Rotatable RAD 60 Blade (5/Box) | | 42000.00 |
| 11. | 1883519HR | Rotatable RAD 90 Blade (3/Box) | | 31500.00 |
| 12. | 1883517 | RAD 120 Blade (3/Box) | | 20000.00 |
| 13. | 1882569HS | 2.5mmDiamond DCR Bur (3 Box) | | 38500.00 |
| 14. | 1883070HS | 3 mm RAD frontal finesse bur (3 Box) | | 33500.00 |
| 15. | 1882923HRE | 2.9 mm Skimmer Angle Tip Blade (1 Box) | | 15000.00 |
| 16. | 1884030HR | 4mm Tricut Angle Tip Laryngeal Blade (3 Box) | | 25000.00 |
| 17. | | 10 Nos Drill Beats for Visao Handpiece (Assorted) | | 35000.00 |
| 18. | | Skeeter Drills (2 Nos) | | 7000.00 |
| | | | **Amt. in Rs.** | **373000.00** |
| | | | **Total (A+B) Amt. in Rs.** | **18,43,000.00** |
| | | | **Add. Vat 12.5%** | **230375.00** |
| | | | **Total Amt. in Rs.** | **20,73,375.00** |

वरीलप्रमाणे ०१ नग E.N.T Micro Debrider System खरेदीकामी अंदाजे रु.२०,७३,३७५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालय यांचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे (औषध भांडार प्राप्त दि.२५/०९/२०१३) मागणीपत्रान्वये ०१ नग E.N.T Micro Debrider System ची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी सदरचा ०१ नग E.N.T Micro Debrider System विहीत पध्दतीने ई-निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.२०,७३,३७५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T. ओ.टी. करीता आवश्यक असलेली ०१ नग E.N.T Micro Debrider System विहीत पध्दतीने ई-निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.२०,७३,३७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३५ कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्स दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एक झेनॉन लाईट सोर्स (Model- Luxtec LX ३००) सन २००६ मध्ये एकुण रू.२,८६,०००/- इतक्या खरेदी करणेत आला आहे. कंपनीने सदर लाईटसोर्स करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १९/०४/२००७ रोजी संपलेला असुन लाईटसोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडुन बदलुन घेतले जातात.

सध्या लाईट सोर्स व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार लाईट सोर्सची तपासणी करून बल्ब खराब झाले असल्याचे निदर्शनास आले. सदर लाईट सोर्स कार्डीयाक ऑपरेशन थिएरमध्ये नियमीत वापरात असुन तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. कंपनीचे पत्रानुसार बल्ब साधारणत: ६५० तासांच्या वापरानंतर खराब होतो. सदरचा बल्ब यापुर्वी १५/१०/२०१२ रोजी खराब झालेमुळे बदलणेत आलेला आहे. दि. १५/१०/२०१२ ते ३१/०३/२०१४ या कालावधीत अंदाजे एकुण १,३६६ रुग्णांवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यासाठी सदर लाईट सोर्स ४,३६९ तास वापरला गेलेला आहे (परिशिष्ट-अ)

त्यासाठी कंपनीकडे बल्ब करीता विचारणा केली असता त्यांचे पत्र क्र. BLL/P/Q-१३२/१३-१४, दि. २८/०३/२०१४ अन्वये सर्वकरांसहीत एकुण रू. ४२,००० (अक्षरी रू. बेचाळीस हजार मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रक्कम कंपनीस बल्ब श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा करावयाची आहे. उपरोक्त बल्ब करीता कंपनी ६५० तासांची वॉरंटी देत आहे. सदर लाईट सोर्सचे स्पेअर पार्ट करीता मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई हे एकमेव पुरवठाधारक कंपनी आहे.

तरी कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईटसोर्सचे दुरुस्तीकरीता आवश्यक असलेला बल्ब मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ४२,०००/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईटसोर्सचे दुरुस्तीकरीता आवश्यक असलेला बल्ब मे. बी.एल.लाईफ सायन्सेस प्रा.ली., मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु.४२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३६ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकरिता संगणक संच व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविणेबाबत मान्यता मिळालेली आहे. सदर योजना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वीत झाली असुन पंचक्रोशील रुग्ण या योजनेचा लाभ घेत आहेत तसेच सदर योजना श्री साईनाथ रुग्णालयामध्ये लवकरात लवकर कार्यान्वीत करणे बाबत कार्यवाही चालु आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकरिता सदर योजना कार्यान्वीत करणेकामी खालीलप्रमाणे संगणकीय साहीत्याची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Perticular | Nos |
|---|---|---|
| 1. | 48 Port Switch & Networking | 01 |
| 2. | Desktop | 10 |
| 3. | Scanner | 07 |
| 4. | Printer | 10 |

श्री साईनाथ रुग्णालयामार्फत रुग्णांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा ह्या अत्यंत माफक स्वरुपात असुन गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांना याचा निश्चितच लाभ झालेला आहे. श्री साईनाथ रुग्णालय हे २०० खाटांचे रुग्णालय असुन रुग्णांची संख्या त्या पटीने अधिक आहे. त्यातच शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही रुग्णांसाठी संजीवनी ठरणार असल्याने सदर योजना लवकरात-लवकर कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. सदर योजना ही ऑनलाईन असल्याने त्याकरिता नेवर्कींग करणेही आवश्यक आहे.

उपरोक्त संगणक संच व इतर साहीत्य खरेदी करणेकामी विविध कोटेशन धारकांकडे चौकशी केली असता सदरकामी साधारणतः अंदाजे रक्कम रु. ९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख) मात्र खर्च अपेक्षित असलेबाबत समजते.

तरी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत करणेकामी उपरोक्त नमुद केलेले संगणक संच व इतर साहीत्य विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी पुरवठा धारकांकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संगणक संच व इतर साहीत्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील १० MBPS Internet Lease Line करिता Hardware खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत करणेत आली आहे. सदर योजना बाबतचे सर्व कामकाज ऑनलाईन करण्यात येते.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे कामकाज जनसंपर्क विभागामार्फत केले जाते. सदर विभागातील कर्मचारी व हॉस्पिटलमधील डॉक्टर्स विना परवानगी इंटरनेटचा वापर करुन त्यावर वेब फॅसीलीटीज्, ईमेल, व्हिडीओज्, गेम्स, बघतात यास्तव प्रत्यक्षात चालणाऱ्या कामामध्ये अडचणी निर्माण होऊन संगणक वेळोवेळी हँग होऊन बंद पडते. याबाबत तक्रार केली आहे.

यापुर्वी दि. ०८.१२.२०१२ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं. २६ निर्णय क्र. ९७८ अन्वये सदरचे काम मे. OSM, पुणे या कंपनीस देणेत आले होते परंतु सदर कंपनीने वेळेत काम न केल्यामुळे त्यांचा कार्यादेश रद्द करण्यात आला होता.

हॉस्पिटलमधील संगणक प्रणालीचे सुरक्षेच्या दृष्टीने उपरोक्त प्रमाणे भविष्यात घडु नये याकरिता इंटरनेटद्वारे पुरविण्यात येणऱ्या सेवांपैकी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकरिता आवश्यक

असणाऱ्या सेवा कार्यान्वीत ठेऊन अनावश्यक सेवा ब्लॉक करणे गरजेजे आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे सॉफ्टवेअर व हार्डवेअरची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Description | | Make/Brand | Qty |
|---|---|---|---|---|
| 1 | Router Latest configuration | (3 years on site warranty) | Cisco/Linksys/ Cyberom/ Netgear | 1 |
| 2 | Firewall | | | 1 |
| 3 | IPS / UTM | | | 1 |
| 4 | Other equipment which is required to configure leased line (Modem, Converter etc.) | | - | - |
| 5 | Installation & configuration by Certified Experts | | - | - |

तरी उपरोक्त नमुद केलेले संगणकीय साहीत्य सॉफ्टवेअर व हार्डवेअर विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील १० MBPS Internet Lease Line करिता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संगणकीय साहीत्य सॉफ्टवेअर व हार्डवेअर विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३८** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता CO२ Surgical Laser System ATL १५० Buyback करुन नविन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी CO२ Surgical Laser System ATL १५० ची आवश्यकता असते. सध्या त्यांच्याकडे असलेली CO२ Surgical Laser System ATL १५० ही वापरुन खराब झालेली आहे. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करतांना अडचणी येतात. कारण सदर CO२ Surgical Laser System दि.०३/०६/२००९ रोजी M/s. Shailtech, Mumbai यांनी देणगी दिलेले होते. सदर CO२ Surgical Laser System ची किंमत रु.१,५०,०००/- इतकी आहे. सध्या सदर मशिनची घसारा वजा जाता किंमत रु. ४७४६१/- इतकी आहे. त्यामुळे त्यांनी नवीन CO२ Surgical Laser System ATL १५० ची मागणी केलेली आहे.

सदर CO२ Surgical Laser System ATL १५० खरेदीकामी M/s. Laserbio Optotech LLP, Mumbai यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी ईमेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Laserbio Optotech LLP, Mumbai यांनी दि.०४/०३/२०१४ चे ईमेलद्वारे सदर CO२ Surgical Laser System ATL १५० चे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Surgical CO2 Laser<br>Model CL 020<br>The system includes main unit, articulated arm with focuing handpiece and footswitch<br>In built co2 laser tube<br>Water cooling system in built<br>**Power in CW upto 15w**<br>Modes cw, pulse and super pulse<br>Red aiming beam | 1 | 300000.00 | 300000.00 |
| | | | **Sales Tax** | **1200.00** |
| | | | **Total Amt. in Rs.** | **312000.00** |

उपरोक्त ०१ नग CO२ Surgical Laser System ATL १५० खरेदीकामी अंदाजे रु.३,१२,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालय यांचे दि.०५/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार प्राप्त दि.२४/१०/२०१३)

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील CO२ Surgical Laser System ATL १५० ही सन २००९ या वर्षात देणगी म्हणून प्राप्त झालेले असून, सदर सिस्टिमची घसारा वजा जाता दि. ३१/०३/२०१३ अखेर किंमत रु. ४७,४६१/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त नसल्यामुळे संस्थान अधिनियम, २००४ मधील कलम १७ (०४) अन्वये खरेदीपूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे नवीन System खरेदी करणेस व जुनी System Buyback करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे CO२ Surgical Laser System ATL १५० विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.३,१२,०००/- इतक्या रक्कमेच्या खर्चास व जुनी System buyback करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता आवश्यक CO२ Surgical Laser System ATL १५० विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,१२,०००/- मात्रचे खर्चास तसेच जुनी System buyback करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९ श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागांकरिता Bed Side Locker खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील Male Ortho Ward, ENT Ward, Opthal Ward, Female Medical Ward या विभागांनी Bed Side Locker ची खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे, कारण सध्या त्यांचेकडे असलेले Bed Side Locker हे जुने व वापरुन खराब झालेले आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | मागणी पत्राची दिनांक | नग |
|---|---|---|---|
| १ | Male Ortho Ward | ३१/०१/२०१४ | ३० |
| २ | ENT Ward | २९/०१/२०१४ | २० |
| ३ | Opthal Ward | २९/०१/२०१४ | २० |
| ४ | Female Medical Ward | २०/०१/२०१४ | १३ |
| **एकुण नग संख्या** | | | **८३** |

सदर Bed Side Locker खरेदीकामी M/s. Quali Surge Surgicals Pvt. Ltd., Pune यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी ई-मेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Quali Surge Surgicals Pvt. Ltd., Pune यांनी ई-मेलद्वारे सदर Bed Side Locker चे दर कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of item | Qty | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Bed Side Locker Executive P/C with SS top Size :- 14” x 15.5”x30” Locker made from machine pressed CRCA sheet with S.S. top having edges on three sides. Pretreated & Epoxy powder coated / complete S.S. | 83 | 4140.00 | 343620.00 |
| **Total Amt. in Rs.** | | | | **343620.00** |

वरीलप्रमाणे ८३ नग Bed Side Locker खरेदीकामी अंदाजे रु.३४३६२०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालय विभागातील विविध वॉर्ड यांनी वरीलप्रमाणे मागणीपत्रान्वये ८३ नग Bed Side Locker ची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्डमधील Bed Side Locker वापरुन खराब झाल्यामुळे नवीन Bed Side Locker खरेदी करणेस हरकत नाही.

तरी सदर ८३ नग Bed Side Locker विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३४३६२०/- चे खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्डमधील Bed Side Locker वापरुन खराब झाल्यामुळे नवीन ८३ नग Bed Side Locker विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.३,४३,६२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४० (अ) Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची मागणी केली होती. त्यानुसार M/s. Shivam Trading Company, Mumbai यांचेकडून बील क्र.५११५ दि.११/०२/२०१४ (डिलेव्हरी चलन नं. ३७०० दि.१०/०२/२०१४) अन्वये एक नग रु.१,५४,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.१०/०२/२०१४ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर Stent बसविणेसाठी बोलगमवार सुलोचना सत्यनारायण यांना रु.२,०७,०८८/- इतका खर्च आलेला आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात बोलगमवार सुलोचना सत्यनारायण या पेशंटला दि.१०/०२/२०१४ रोजी Abbott Co. चा Absorb BVS Stent RX ३.०० * १८mm हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग Stent वापरलेला आहे.

सदर Stent करीता सन २०१२-१३ चे वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. कारण वार्षीकमध्ये सदर Stent साठी मागणी नव्हती शिवाय असा Stent हा क्वचित प्रसंगी लागतो. डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची मागणी केली होती.

सदर रुग्णास वरील Stent वापरण्यात आला होता कारण सदर Stent ला Metalic Frame Work असून सदर Stent हा विशिष्ट प्रकारच्या Polymer पासून बनविलेला आहे व तो शरीरात दिड वर्षापर्यंत राहतो व दिड वर्षानंतर तो विरघळतो त्यामुळे रुग्णांस कमीत कमी औषधे घ्यावी लागतात व पुढील Restonosis ची शक्यता देखील खूप कमी असते.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

सदर Stent खरेदीकामी व रुग्णालयातील खर्चाची संपुर्ण रक्कम रु. २,०७,०८८/- ही रुग्णांने संस्थानमध्ये पावती नं. २१०७६२९४ अन्वये रोख भरलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी उपरोक्त प्रमाणे M/s. Shivam Trading Company, Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त Stent चे बीलाची रक्कम रु.१,५४,०००/- चे खर्चाची नोंद घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३२९ (अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(ब) Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची मागणी केली होती. त्यानुसार M/s. Shivam Trading Company, Mumbai यांचेकडून बील क्र.५६५८ दि.१२/०३/२०१४ (डिलेव्हरी चलन नं. ३९७२ दि.११/०३/२०१४) अन्वये एक नग रु.१,५४,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.११/०३/२०१४ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर Stent बसविणेसाठी श्री परदेशी प्रवीण रामदास यांना रु.१,९५,२८०/- इतका खर्च आलेला आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री परदेशी प्रवीण रामदास या पेशंटला दि.११/०३/२०१४ रोजी Abbott Co. चा Absorb BVS Stent RX ३.०० * २८mm हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग Stent वापरलेला आहे.

सदर Stent करीता सन २०१२-१३ चे वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. कारण वार्षीकमध्ये सदर Stent साठी मागणी नव्हती शिवाय असा Stent हा क्वचित प्रसंगी लागतो. डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Stent ची मागणी केली होती.

सदर रुग्णास वरील Stent वापरण्यात आला होता कारण सदर Stent ला Metalic Frame Work असून सदर Stent हा विशिष्ट प्रकारच्या Polymer पासून बनविलेला आहे व तो शरीरात दिड वर्षापर्यंत राहतो व दिड वर्षानंतर तो विरघळतो त्यामुळे रुग्णांस कमीत कमी औषधे घ्यावी लागतात व पुढील Restonosis ची शक्यता देखील खूप कमी असते.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

२) सदर Stent खरेदीकामी व रुग्णालयातील खर्चाची संपुर्ण रक्कम रु. १,९५,२८०/- ही रुग्णांने संस्थानमध्ये पावती नं. २१०७७२८२ अन्वये रोख भरलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी उपरोक्त प्रमाणे M/s. Shivam Trading Company, Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त Stent चे बीलाची रक्कम रु. १,५४,०००/- चे खर्चाची नोंद घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३२९ (ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४१ Pacemaker चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Pacemaker ची मागणी केली होती. त्यानुसार M/s. Advanced Technologies, Bhopal यांचेकडून बील क्र. ३५२ दि.२४/०२/२०१२ (डिलेव्हरी चलन नं. ३६८ दि.२४/०२/२०१२) अन्वये एक नग रु.२,२८,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२४/०२/२०१२ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर Pacemaker बसविणेसाठी श्री.जाधव पांडूरंग लक्ष्मण यांना रु.२,५०,१४५/- इतका खर्च आलेला आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री जाधव पांडूरंग लक्ष्मण या पेशंटला दि.२४/०२/२०१२ रोजी Boston Co. चा Bioventricular Pacemaker हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग Pacemaker वापरलेला आहे.

सदर Pacemaker करीता सन २०१२-१३ चे वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. कारण वार्षीकमध्ये सदर Pacemaker साठी मागणी नव्हती शिवाय असा Pacemaker हा क्वचित प्रसंगी लागतो. डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता Pacemaker ची मागणी केली होती.

कारण सदरचा Bioventicular Pacemaker वापरल्यास रुग्णांच्या ह्दयाचे रक्ताभिसरणाची प्रक्रिया (Heart Pumping) ही व्यवस्थित होते. नियमित वापरण्यात येणारे Pacemaker हे फक्त ह्दयाचे ठोके वाढवते. सदर Pacemaker ची पेशंटला आवश्यकता असल्यामुळे Bioventricular Pacemaker वापरण्यात आला आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१. अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार पावती नं. २१०५०/०५ संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२. सदर Pacemaker खरेदीकामी व रुग्णालयातील खर्चाची रक्कम रु. ८०,१४५/- ही रुग्णाने संस्थानमध्ये रोख भरलेली असून ऊर्वरित रक्कम रु. १,५०,०००/- जीवनदायी योजनेअंतर्गत संस्थानमध्ये जमा करण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** तरी उपरोक्त प्रमाणे M/s. Advanced Technologies, Bhopal यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त Pacemaker चे बीलाची रक्कम रु. २,२८,०००/- ही M/s. Advanced Technologies, Bhopal यांना अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४२ On Consignment Basis वरील Stent चे सम प्रमाणात वापराबाबत.**

**निर्णय क्र.३३२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४३ M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad यांचेकडून खरेदी करावयाचे लॅब केमीकल्सचे खरेदीकामी येणाऱ्या जास्तीच्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागामध्ये तपासण्या करणेकामी लागणाऱ्या केमीकल्सकरीता मे. सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना वार्षिक औषधे खरेदी सन २०१२-१३ या वर्षात इकडील पत्र क्र. ७१९३ दि.२६/११/२०१२ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Item Description | Make | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | AUTOLYSE 500ML | A.G.D. | 200 | 2632.50 | 526500.00 |
| 2. | AUTODIL 20 LITER | A.G.D. | 250 | 1766.25 | 441562.50 |
| 3. | AUTOCLEAN 2 LITER | A.G.D. | 200 | 607.50 | 121500.00 |
| | | | | **Total -** | **1089562.50** |

वरील पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांनी रुग्णालयात जशी जशी आवश्यकता लागेल त्याप्रमाणे पुरवठा केलेला आहे. परंतु वार्षिक ऑर्डरचा कालावधी हा २६/११/२०१३ रोजी संपलेला आहे. त्यामुळे त्यांनी पुरवठा करणेस नकार दिलेला आहे. कारण त्याचे दर वाढलेले आहे. त्यानुसार, त्यांनी नविन दर दि.०७/०२/२०१४ चे पत्रान्वये कळविलेले आहे. सदरचे केमिकल्स हे दोन्ही प्रयोगशाळेत दैनंदिन वापरासाठी नियमित लागतात. तसेच AGD कंपनीचे मशिन असल्यामुळे AGD कंपनीचेच केमिकल्स वापरावे लागतात. सध्या वार्षिक औषधे (सन २०१३-१४) या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून ते उपलब्ध होईपर्यंत खरेदी करणे गरजेचे होते. तेव्हा त्यांनी १० नग नवीन दराने खरेदी केलेले आहेत.

| Sr. No. | Item Description | Make | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. | New Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AUTOLYSE 500ML | A.G.D. | 10 | 2632.50 | 26325.00 | 4037.00 | 40370.00 |
| 2 | AUTODIL 20 LITER | A.G.D. | 10 | 1766.25 | 17662.50 | 2645.00 | 26450.00 |
| 3 | AUTOCLEAN 2 LITER | A.G.D. | 10 | 607.50 | 6075.00 | 975.00 | 9750.00 |
| | | | | **Total -** | **50062.50** | **Total -** | **76570.00** |
| | | **Extra Expenditure** | | | **76570.00 - 50062.50 =26507.50** | | |

वरीलप्रमाणे नविन दराने केमीकल्स खरेदीकामी रक्कम रु.२६,५०७.५० इतका जास्तीचा खर्च आलेला आहे.

तरी मे. सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून वरीलप्रमाणे केमीकल्स खरेदीस व याकामी येणाऱ्या जादा खर्च रु.२६,५०७.५० चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे लॅब केमीकल्स खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.२६,५०७.५० मात्र जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४४ श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.नं.०२ करीता Epoxy Flooring चे कामास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जनरल ओ.टी नं. २ मधील Epoxy Flooring सध्या निघालेले आहे. जनरल ओ.टी नं.२ मध्ये शस्त्रक्रियेच्या कामामुळे ते साधारणत: ३ ते ४ वर्षात खराब होऊन जाते. त्यामुळे त्यात पाणी जाऊन शस्त्रक्रिया गृहात जंतु संसर्ग निर्माण होण्याची शक्यता असते. पर्यायाने याचा त्रास रुग्णांना लवकर बरे न होण्यास (Recover) होतो, त्यामुळे जनरल ओ.टी नं. २ या विभागाने डि.पी नं. ३२५० दि.२१/०३/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि.०३/०४/२०१४) रोजी Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | विभागाचे नाव | साईज | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | जनरल ओ.टी नं. २ | ३१२ ft. | १२०.२४ / sqft. | ३७५१४.८८ |

वरीलप्रमाणे काम करुन घेणेकामी अंदाजे रु.३७५१५/- इतका खर्च अपेक्षित आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ करीता Epoxy Flooring चे काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीकामीचा अंदाजे रक्कम रु.३७,६९५/- चा प्रस्ताव दि.१३/१२/२०१३ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास निर्णय क्र.९५७ अन्वये मान्यता मिळालेली असून त्यानुसार याकामी इकडील पत्र क्र. ६१९१ दि.०३/०१/२०१४ अन्वये ९ कोटेशनधारकांकडून दि.१४/०१/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले असून पुढील कार्यवाही चालु आहे. तेंव्हा सदरचे प्रस्तावामध्ये चर्चा/ वाटाघाटी केल्यानंतर मंजुर झालेल्या दराने सदरचे काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जनरल ओ.टी नं. २ मधील Epoxy Flooring चे काम चर्चा / वाटाघाटीनंतरचे मंजुर दराने करुन घेणेकामीचा प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४५ लॉन्ड्री विभागातील मशिन्सचे दुरुस्ती व देखभालीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय या दोन्ही हॉस्पिटलमधील वापरलेले लिनन धुणेकामी आवश्यक लॉन्ड्री इक्विपमेंटस व मशिनरी पुरवठा आदेश क्र. १२९८७/२००९ दि. २३/१०/२००९ अन्वये मे. रॅमसन गारमेंन्ट फिनीशिंग इक्विपमेंटस (प्रा) लि. बँगलोर यांचेकडुन एकुण रु. २१,१४,४५१.७५ इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहेत. सध्या सदर मशिन्सकरीता दोन वर्षांची वॉरंटी दिली असुन व सदर कालावधीत कंपनीचे इंजिनीअर त्यांच्या नियमीत भेटी देउन मशिन्सची दुरुस्ती करीत होते.

लॉन्ड्री मशिन्सची वॉरंटी कालावधी संपलेनंतर पुरवठा आदेशातील अटीनुसार मशिनचे दुरूस्ती व देखभाल करणे करीता कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CMC) एकुण रू.१०,०००/- (स्पेअर पार्ट+ सर्व्हीस चार्जेससह) करण्यात आले होते. परंतु यापुर्वी कंपनीस देण्यात आलेल्या CMC कार्यादेशानुसार कंपनीने स्पेअर पार्टसह सर्व्हीस दिली असुन सदर CMC ची रक्कम अदा करण्याची आवश्यकता नाहीछअसे कंपनीने कळविले आहे.

परंतु या पुढील कालावधीकरीता सदर इक्विपमेंटसचे (बॉयलर व्यतिरिक्त) स्पेअर पार्ट शिवाय वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेसाठी कंपनीने पत्र क्र. RGFE/AMC/१०५, दि. १९/०३/२०१४ अन्वये तसेच बॉयलर मशिनचे अधिकृत पुरवठाधारक M/s. Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai, यांनी बॉयलर मशिनचे स्पेअर पार्ट शिवाय वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेकामी खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| M/s. Ramsons Garments Finishing Equipment Pvt. Ltd. Pune | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Name of machine | Qty | Price in Rs. | Previous Contract Period (CMC) | CMC Amount in Rs As per P.O | Current Contract Period | AMC Amount In Rs. | % of Total Machine Cost |
| 1 | Washing M/c (RHW-50KG) | 02 | 4,48,576.50 | 01/04/13 To 31/03/14 | 10000.00 | 01/04/2014 To 31/03/2015 | 42,382.00 | 3 |
| 2 | Washing M/c. (RHW-20KG) | 01 | 1,65,657.00 | | | | | |
| 3 | Flat Ironer (1600x400mm) | 01 | 3,76,916.25 | | | | | |
| 4 | Tumble Drier (RTD-50 Kg.) | 01 | 1,90,785.00 | | | | | |
| 5 | Hydro Extractors ( RDD-30Kg) | 02 | 2,30,802.00 | | | | | |
| | + Add Service Tax @ 12.36% | | | | | | 5238.41 | |
| | (A) Total Amount (Incl. of all Taxes)R/o in Rs. | | | | | | **47620.00** | |
| **M/s. Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai** | | | | | | | | |
| 1 | Diesel fired Boiler (400Kg/hr) (ROB-400) | 01 | 6,25,401.00 | | | | 21500.00 | 3.43 |
| | + Service Taxes | | | | | | 2657.40 | |
| | (B) Total Amount (Incl. of all Taxes) R/o in Rs. | | | | | | **24,157.00** | |
| | (A+B) Total Amount (Incl. of all Taxes) in Rs. | | | | | | **71,777.00** | |

वरीलप्रमाणे एकुण सर्व लॉन्ड्री मशिनचे मे. रॅमसन गारमेंन्ट फिनीशिंग इक्विपमेंटस (प्रा) लि. बँगलोर यांचेकडे तसेच बॉयलर मशिनचे M/s. Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai यांचेकडे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी एकुण रू. ७१,७७७/- इतका खर्च येणार आहे. वरीलपैकी मे. रॅमसन यांचे टेक्नीशियन दर महिन्याला एक या प्रमाणे एका वर्षात १२ वेळेस नियमीत भेटी व आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करणार असल्याचे कळविले आहे. तसेच

बॉयलर मशिनचे दुरूस्ती व देखभाली करीता M/s. Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai नियमीत भेट- ०१ व तातडीच्या भेटी- ०५ वेळा देउन मशिनची दुरूस्ती व देखभाल करणार आहेत.

सदर लॉन्ड्री इक्विपमेंटस व मशिनचे स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेली असतात सदर मशिनचे स्पेअर पार्ट करीता मे. रॅमसन गारमेंन्ट फिनीशिंग इक्विपमेंटस (प्रा) लि. व M/s. Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर मशिनचे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात. सदर कॉन्ट्रॅक्टची एकुण रक्कम रू. ७१,७७७/- ही एकुण सर्व इक्विपमेंटसच्या किंमतीच्या अंदाजे ३% आहेत.

तरी लॉन्ड्री इक्विपमेंटस व मशिनरीचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.७१,७७७/- च्या खर्चास मान्यता असावी

**निर्णय क्र.३३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालय विभागाकडील लॉन्ड्री मशिनरीचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७१,७७७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४६ (अ) तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (मार्च-२०१४)**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. कारण वार्षिक औषधे खरेदीकामी पुरवठा आदेश गेलेले नव्हते व राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांना बाहेरुन औषधे लिहून द्यावयाची नाही त्यामुळे ती त्यांना तातडीने खरेदी करुन देण्याची आवश्यकता होती, त्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. सदर मटेरीयल नाशिक व शिर्डी येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे/ केमिकल/ सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु.३१,१३०/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- मार्च मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु.३१,१३०/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

**मागणी :-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik | 3409 | 28/03/2014 | 6,627.00 |
| 2 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 892 | 27/03/2014 | 14,880.00 |
| 3 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 895 | 28/03/2014 | 6,590.00 |
| 4 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 891 | 27/03/2014 | 2,320.00 |
| 5 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 896 | 29/03/2014 | 713.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | 31,130.00 |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात.

त्यानूसार सदर खरेदी करुन बीले अदा करण्यास तसेच सदरचा प्रस्ताव नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३३६ (अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(ब) तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (एप्रिल- २०१४)**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा.त्रिसदरस्य समिती सभा दि.१७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल शिर्डी, नाशिक व संगमनेर येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे/ केमिकल/ सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु. ७८,९४९/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- एप्रिल मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु.७८,९४९/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. वार्षिक पुरवठा आदेशातील जी औषधे पुरवठाधारकांनी पुरवठा केलेली नाही ती तातडने दुसऱ्या पुरवठाधारकाकडून खरेदी करुन जास्तीची फरकाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसूल केलेली आहे.

**मागणी :-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 925 | 12/04/2014 | 6506.00 |
| 2 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 920 | 05/04/2014 | 5698.00 |
| 3 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 921 | 07/04/2014 | 5080.00 |
| 4 | M/s. Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik | 38 | 03/04/2014 | 14077.00 |
| 5 | M/s. Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik | 3430 | 29/3/2014 | 9578.00 |
| 6 | M/s. Vieshvesh Enterprises, Sangamner | 20 | 07/04/2014 | 26607.00 |
| 7 | M/s. Vieshvesh Enterprises, Sangamner | 15 | 05/04/2014 | 11403.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **78949.00** |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात.

त्यानूसार सदर खरेदीच्या बीलाची रक्कम रु.७८,९४९/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३३६** **(ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४७** **श्रीमती भाग्यश्री पांडे यांचा जादा वैद्यकिय बिलाचा परतावा मिळणेबाबतचा विनंती अर्ज.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** १) जा.नं.एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९८ दि.१६/०१/१९९९
२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु.१०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रस्ताविक:-** कै. अजय शिवराम पांडे हे बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत होते, त्यांनी दि.०५/०३/२०१४ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ. मेहरोत्रा यांचेकडे उपचार घेतलेले होते. डॉ. मेहरोत्रा यांनी त्यांना पुढील उपचाराकरीता रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे पाठविलेले होते. श्री पांडे यांनी रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे दि.०३/०४/२०१४ ते १०/०४/२०१४ या कालावधीत अंतर्रुग्ण म्हणून उपचार घेतल्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता. तद्नंतर घरी असतांनी त्यांना दि.१६/०४/२०१४ रोजी पुन्हा त्रास झाल्याने दि.१७/०४/२०१४ रोजी त्यांना तातडीने रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे

उपचाराकरीता दाखल करण्यात आलेले होते. परंतू उपचार चालू असतांनी त्यांचे दि.२४/०४/२०१४ रोजी निधन झालेले आहे.

उपरोक्त कालावधीत उपचारादरम्यान त्यांचेवर रु. २१११५३/- इतक्या रक्कमेचा खर्च झालेला असून सदर वैद्यकिय बिलाचा परतावा मिळणेकामी श्रीमती भाग्यश्री अजय पांडे यांनी दि.२८/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव त्यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रीक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु.२०२८७३/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-**

सदरचे रुग्णालय संस्थानने निश्चित केलेल्या रुग्णालयाचे यादीतील असून संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ प्रमाणे उपरोक्त बीलाची छाननी केली असून देय होणारी रक्कम रु.२०२८७३/- अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४८ सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता सन २०१३-१४ या वर्षाकरिता वार्षीक औषधे खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यामध्ये श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता लागणाऱ्या Thermo कंपनीच्या लॅब केमिकल्सकरिता देखील दर मागविण्यात आले होते. परंतु सदरहू खरेदीमध्ये उपरोक्त केमीकल्सकरिता कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही.

दि. १५/०२/२०१४ व दि.१९/०२/२०१४ रोजीचे मा. तज्ञ समिती सभेत सन २०१३-१४ या वार्षीक औषधे खरेदीमध्ये ज्या Item साठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही त्यासाठी परत ई-निविदा मागवुन खरेदी करावी असा निर्णय झालेला आहे. त्यास दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार प्रयोगशाळा विभागाकरिता लागणारे केमिकल्स व इतर सर्जीकल साहित्य खरेदीकामी फेर ई-निविदा मागविणेकामी कार्यवाही चालू आहे. त्यास साधारणतः दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागेल. प्रयोगशाळा विभागात दैनंदिन रक्त लघवीच्या तपासण्या करणेकामी केमिकल्सचा तुटवडा भासत आहे. प्रयोगशाळा विभागात Thermo कंपनीचे मशिन असल्यामुळे त्याला लागणारे केमिकल्स हे देखील Thermo कंपनीचेच घ्यावे लागतात. त्यामुळे तुर्तास दोन महिने पुरेल इतका केमिकलचा साठा मागील मंजुर दराने (सन २०१२-१३) खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

सदर लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार (सन २०१२-१३) वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ७७४६७७/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ७७४६७७/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४९** **श्री साईबाबा रुग्णालयांकडील ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेल्या स्टाफ नर्स यांची नेमणूकीचा कालावधी संपुष्टात येत असलेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ३०/०३/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७८ नुसार दि. ०३/०५/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये खालील परिचारक/ परिचारीका यांना वेळोवेळी पुढील ११ महिन्याचे कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले आहे. सध्या कार्यरत असलेल्या खालील परिचारक/ परिचारीका यांची ११ महिने कालावधीची तात्पुरती नेमणूक माहे एप्रिल, २०१४ ते माहे ऑगस्ट, २०१४ दरम्यान संपुष्टात येत आहे.

| अ. नं. | नाव | नेमणूक आदेश व दिनांक | हजर तारीख | ११ महिने मुदत संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री विशाल निळकंठ कुलकर्णी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९०/२०१३ दि.०९/०५/२०१३ | ०५/०५/२०१३ | ०४/०४/२०१४ |
| २ | कु. मनिषा स्टिफन आवारे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९१/२०१३ दि.०९/०५/२०१३ | ०७/०५/२०१३ | ०६/०४/२०१४ |
| ३ | कु. आशुमती संपत सदाफुले | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९२/२०१३ दि.०९/०५/२०१३ | ०८/०५/२०१३ | ०७/०४/२०१४ |
| ५ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९३/२०१३ दि.०९/०५/२०१३ | ०९/०५/२०१३ | ०८/०४/२०१४ |
| ६ | कु. कांचन विनायक शिंदे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९४/२०१३ दि.०९/०५/२०१३ | ११/०५/२०१३ | १०/०४/२०१४ |
| ७ | श्री. आशिष शरद सुर्यवंशी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९५/२०१३ दि.०९/०५/२०१३ | १३/०५/२०१३ | १२/०४/२०१४ |
| ८ | श्रीमती सारीका फकीरा बनसोडे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९६/२०१३ दि.०९/०५/२०१३ | २९/०५/२०१३ | २८/०४/२०१४ |
| ९ | सौ. आशा रमेश जगताप | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९७/२०१३ दि.०९/०५/२०१३ | ३१/०५/२०१३ | ३०/०४/२०१४ |
| १० | कु. प्रतिमा रामचंद्र कोळगे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९८/२०१३ दि.०९/०५/२०१३ | ०७/०६/२०१३ | ०६/०५/२०१४ |
| ११ | श्री. राहुल प्रकाश ओहोळ | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/१९९/२०१३ दि.०९/०५/२०१३ | १७/०६/२०१३ | १६/०५/२०१४ |
| १२ | कु. प्राजक्ता दिपक जाधव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७०६/२०१३ दि.०९/०८/२०१३ | १०/०८/२०१३ | ०९/०७/२०१४ |
| १३ | सौ. रुपाली राजेंद्र गवळी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७०७/२०१३ दि.०९/०८/२०१३ | १२/०८/२०१३ | ११/०७/२०१४ |
| १४ | श्रीमती विजया उज्वल शेळके | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७०८/२०१३ दि.०९/०८/२०१३ | १६/०८/२०१३ | १५/०७/२०१४ |
| १५ | सौ. रुथ निलेश श्रीवास्तव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७०९/२०१३ दि.०९/०८/२०१३ | २९/०८/२०१३ | २८/०७/२०१४ |
| १६ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७१०/२०१३ दि.०९/०८/२०१३ | १९/०८/२०१३ | १८/०७/२०१४ |
| १७ | कु. कविता योसेफ पंडीत | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७७७/२०१३ दि.२४/०९/२०१३ | १४/०९/२०१३ | १३/०८/२०१४ |

मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २६/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २३१ अन्वये श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी बिंदुनामावलीनुसार एकूण १०० पदे स्थायी पध्दतीने भरणेच्या मान्यतेस्तव मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. सदर ॲप्लीकेशनवर दि.०२/०८/२०१३ रोजी सुनावणी होऊन रुग्णालयांसाठी आवश्यक स्टाफ नर्स कंत्राटी पध्दतीने घेण्यात यावेत, असा मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने आदेश दिलेला आहे. त्यास अनुसरुन मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.१७/०९/२०१३ रोजीचे सभेमधील निर्णय क्र.६३२ अन्वये संस्थानचे दोन्ही रुग्णालयांत सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या १८ स्टाफ नर्स व्यतिरिक्त ८२ स्टाफ नर्स कंत्राटदाराकडून कंत्राटी पध्दतीने घेणेची कार्यवाही कामगार विभागामार्फत करण्यात आलेली आहे.

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०८ व १३ वरील परिचारीका अनुक्रमे श्रीमती सारीका फकीरा बनसोडे व सौ. रुपाली राजेंद्र गवळी यांना शासकीय रुग्णालयांत नोकरी मिळालेली आहे. त्यामुळे त्या श्री साईबाबा हॉस्पीटलकडे सध्या कार्यरत नाहीत. त्याचे व्यतिरिक्त इतर अ.नं. ०१ ते ०७ व अ.नं. ०९ ते १२ तसेच अ.नं. १४ ते १७ वरील परिचारक / परिचारीका यांचेबाबत प्र. वैद्यकिय अधिक्षक व प्र. वैद्यकिय संचालक यांनी पुढीलप्रमाणे गोपनीय अहवाल दिलेला आहे. सदरचे परिचारक/ परिचारीका यांचे काम समाधानकारक असून ते हुकुमाप्रमाणे कामे करतात. त्यांचेबाबत काहीही प्रकरण चालू अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही.

सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांची मुदत उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र. ५ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे. प्र.वैद्यकिय अधिक्षक व प्र.वैद्यकिय संचालक यांचे गोपनीय अहवालानुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयांत स्टाफ नर्सची आवश्यकता असल्याने सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांना टप्या-टप्याने पुढील ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका देता येईल.

तरी, वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०१ ते ०७ व अ.नं. ०९ ते १२ तसेच अ.नं. १४ ते १७ वरील परिचारक/ परिचारीका यांना टप्या-टप्याने पुढील ११ महिने कालावधीसाठी पूर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरत्या नेमणूका देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका/ परिचारक यांचेबाबत प्र.वैद्यकिय अधिक्षक व प्र.वैद्यकिय संचालक यांचे गोपनीय अहवालाचा विचार करता, उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०१ ते ०७ व अ.नं. ०९ ते १२ तसेच अ.नं. १४ ते १७ वरील परिचारक/ परिचारीका यांना टप्या-टप्याने त्यांची मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीसाठी पूर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वेळेअभावी उपरोक्त अजेंडयावरील सर्व विषयांवर आजचे सभेमध्ये चर्चा होऊ शकली नाही, त्यामुळे या अजेंडयावरील अ. नं.५० नंतरच्या विषयांवर पुढील सभेमध्ये चर्चा करणेत येईल, असे ठरले.

वरील निर्णय क्र.२९० ते ३३९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०१.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (आप्पासाहेब शिंदे) | (अनिल कवडे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| उपकार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | प्रधान जिल्हा न्यायाधीश |
| | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी